''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास''

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील तात्विक व सामाजिकशास्त्र
विद्याशाखा अंतर्गत

एम.फिल. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) या अभ्यासक्रमासाठी
संशोधन प्रकल्प सादर

संशोधक
श्री. संदिप उत्तम चोपडे
बी.ए.,एम.लिब. ॲण्ड आय. एस्सी.

मार्गदर्शक
डॉ. सुनिल एन. कुलकर्णी
मुख्य ग्रंथपाल व विभाग प्रमुख
आघारकर संशोधक संस्था, पुणे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे–३७.

२०१३ –२०१४

संशोधक प्रमाणपत्र

मी **चोपडे संदिप उत्तम (कायम नोंदणी क्रमांक १०४१३००२३७८)** प्रमाणपत्र सादर करतो की, **''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास ''** या विषयी संशोधन प्रकल्प अहवाल **मार्गदर्शक डॉ. सुनिल एन. कुलकर्णी** यांच्या मार्गदर्शनाखाली स्वत: पुर्ण केलेला असून सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली व त्या माहितीचा संदर्भ योग्य त्या ठिकाणी नमूद केला आहे.

हा संशोधन प्रकल्प अथवा त्याचा काही भाग कोणत्याही पदवी परीक्षेस सादर करण्यात आलेला नाही.

संशोधक

चोपडे संदिप उत्तम

पि.आर.एन. १०४१३००२३७८

ठिकाण :

दिनांक :

मार्गदर्शक प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. चोपडे संदिप उत्तम (कायम नोंदणी क्रमांक १०४१३००२३७८)** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून सन २०१३–२०१४ या शैक्षणिक वर्षात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील एम.फिल. पदवी अभ्यासक्रमाच्या अंशत: पुर्ततेसाठी **''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास''** या विषयात संशोधन प्रकल्प अहवाल माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केलेला असून त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहे.

मार्गदर्शक

डॉ. सुनिल एन. कुलकर्णी
मुख्य ग्रंथपाल व विभाग प्रमुख
आघारकर संशोधन संस्था,
पुणे–४११ ००७

ठिकाण :

दिनांक :

ऋणनिर्देश

श्री. गणेशाचे नमन करून प्रथम मी सरस्वती चरणी नतमस्तक होतो. माझी शिक्षणाची आवड, शिकण्याची तळमळ ओळखुन **''टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे'** यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील 'एम.फिल.' संशोधन करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी विद्यापीठाचा आभारी आहे.

संशोधन प्रकल्प पुर्ण करण्यामध्ये अनमोल मार्गदर्शन, संशोधन प्रकल्पाचा विषय निवडी पासून संदर्भ ग्रंथाचे ज्ञान, आशय समजुन घेण्याचे ज्ञान तसेच वेळोवेळी अडचणी समजून घेऊन अतिशय जिव्हाळ्याने मार्गदर्शन करणारे माझे आदरणीय गुरू व मार्गदर्शक डॉ. सुनिल एन. कुलकर्णी ग्रंथपाल व विभाग प्रमुख, आघारकर संशोधन संस्था, पुणे यांचे मी मनापासून आभार मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे मुख्य ग्रंथपाल डॉ. सौ. खंदारे मॅडम व ग्रंथालय माहितीशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी यांनी केलेले सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांचे ऋणी आहे.

शिक्षणाची आवड असणारे, मी ग्रंथालय व माहितीशास्त्रात एम. फिल. पदवी घ्यावी अशी इच्छा आसणारे मा. श्री. अनिल सिताराम गुजर, सचिव–महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर, पुणे–२८. तसेच माझ्या प्रयत्नाला वेळोवेळी प्रोत्साहित करणाऱ्या मा.वै.सौ. निलाश्री प्रधान, प्राचार्या, सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, पुणे–२८. यांचा ही मी मन:पुर्वक ऋणी आहे.

एम.फिल. पदवी अभ्यासक्रमासाठी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन करणारे प्रा. डॉ. भाऊसाहेब पानगे, प्रा. डॉ. सुनिता बरवे, प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. डॉ. राजेंद्र अर्पणा, प्रा. अवधुत कुलकर्णी यांचा मी अत्यंत आभारी आहे.

ज्या ज्या महाविद्यालयाच्या प्राचार्य, ग्रंथपाल, अध्यापक व विद्यार्थी यांनी प्रश्नावल्या भरून दिल्या व संशोधन प्रकल्पासाठी मला मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी आभारी आहे. माझे सहकारी श्री. रामनाथ पाचोरे, सहा ग्रंथपाल यांनी मला खुप सहकार्य केले त्यांचा मी आभारी आहे. तसेच मला प्रकल्प पुण करण्यासाठी स्वत:ची नौकरी व घरातील कामे सांभाळून लेखना मध्ये सहकार्य करणारी माझी पत्नी सौ. मंगल चोपडे व बहुमोल सहकार्य करणारे माझे मित्र राजेंद्र मुळे यांचा आभारी आहे.

संशोधन प्रकल्पाचे उत्कृष्ट रित्या अंतरंग समृध्द व अचुक पणे टायपिंग करणारे साई एंटरप्रायजेस प्रोप्रा राऊत डी. के. यांचा ही मी आभारी आहे.

आलेख सुची

आलेख क्र.	तपशिल	पृष्ठ क्र.
१	महाविद्यालयाचे स्थापना वर्ष	९५
२	समिती मधील सभासद विषयी माहिती आलेख	१२६
३	ग्रंथालय समिती मधील अमंल बजावणी विषयी आलेख	१२९
४	ई–बुक्स विषयी माहिती आलेख	१३१
५	ग्रंथालय सॉफ्टवेअर माहिती आलेख	१४०
६	हरवलेल्या ग्रंथ दंडाविषयी माहिती आलेख	१४२
७	पाने फाटलेली, खराब झालेले ग्रंथ रद्दबातल विषयी माहिती आलेख	१६७
८	ग्रंथ मोठ्या प्रमाणात वापरा विषयी माहिती आलेख	१७०

कोष्टकांची यादी

(अ) ग्रंथपाल

कोष्टक क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्र.
१	ग्रंथालयाची सर्वसाधारण माहिती जाणून घेणे.	९४–९५
२	ग्रंथालयातील ग्रंथाची संख्या	९६–९७
३	ग्रंथालयातील सिडी रोमची संख्या	९७–९८
४	ग्रंथालयातील नियतकालिकांची संख्या	९८
५	सर्वोच्च न्यायलयाने आयुर्वेद डॉक्टरांना ॲलोपॅथी औषध वापरण्याची परवानगीची माहिती	९९–१००
६	सि.सि.आय.एम. अधिसूचनेनुसार आयुर्वेद डॉक्टरांना ॲलोपॅथी औषध वापरण्याची परवानगीची माहिती	१००
७	ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ, संदर्भग्रंथ ॲलोपॅथी ग्रंथ उपलब्ध बाबत माहिती	१०१
८	ग्रंथालयात ॲलोपॅथी नियतकालिक माहिती	१०१–१०२
९	ग्रंथालयात ॲलोपॅथी ग्रंथा बाबत माहिती	१०२
१०	ग्रंथालयातील ग्रंथ वापरा बाबत माहिती.	१०३
११	ग्रंथालयात ॲलोपॅथी सिडी वापरा बाबत माहिती.	१०४
१२	ग्रंथोपार्जन धोरणाची माहिती	१०४–१०५
१३	ग्रंथोपार्जन धोरण लिखित स्वरूपाची माहिती	१०५–१०५
१४	ग्रंथोपार्जन धोरण आढावाची माहिती.	१०६–१०७

कोष्टक क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्र.
१५	ग्रंथोपार्जन धोरणासंबधी ग्रंथ खरेदी माहिती.	१०७
१६	ग्रंथोपार्जन धोरण पारदर्शकता विषयी माहिती	१०८
१७	ग्रंथालयातील ग्रंथाची उपलब्धता विषयी माहिती	१०८–१०९
१८	ग्रंथ खरेदी शिफारस सुचना पेटीची माहिती	११०
१९	ग्रंथाची एकूण फलकावरील माहिती	१११
२०	नवीन प्रकाशित ग्रंथ निवड माहिती	१११–११२
२१	सूचना केलेल्या ग्रंथ खरेदीची माहिती	११३
२२	ग्रंथ खरेदीवर खर्च होणारी माहिती	११४
२३	मागील वर्षामध्ये ग्रंथाची संख्या	११४–११५
२४	ग्रंथ खरेदी विषयक माहिती	११५
२५	ग्रंथ खरेदी प्रकाराची माहिती	११६
२६	ग्रंथखरेदी करतांना दिलेल्या गोष्टींची माहिती	११७
२७	नियमितपणे ग्रंथ विकत घेतल्या विषयी माहिती	११७
२८	इलेक्ट्रॉनिक पुस्तक विषयी माहिती	११८
२९	ग्रंथाच्या जास्तीत जास्त प्रती विषयी माहिती	११९
३०	ग्रंथ खरेदी सहभागाविषयी माहिती	१२०
३१	ग्रंथ प्रदर्शना विषयी माहिती	१२१
३२	ग्रंथ निवड साधनांची माहिती	१२१–१२२
३३	ग्रंथालयातील ग्रंथ ॲप्रुव्हल संबंधी माहिती	१२२–१२३

कोष्टक क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्र.
३४	CCIM व MUHS नुसार ग्रंथनिवडी संबंधी माहिती	१२३–१२४
३५	निवड समिती विषयी माहिती.	१२४–१२५
३६	समितीमधील सदस्या विषयी माहिती	१२५–१२६
३७	ग्रंथाच्या जास्त प्रती घेण्याविषयी माहिती	१२६–१२७
३८	ग्रंथालय समितीच्या सभाविषयी माहिती	१२७–१२८
३९	समितीमधील ठरावाच्या अंमलबजावणी विषयी माहिती	१२८–१२९
४०	ई–बुक्स विकत घेण्या विषयी माहिती	१३०–१३१
४१	ई–बुक्स वापरण्यासंबंधी माहिती	१३१–१३२
४२	ई–बुक्स संग्रहाचे वर्गणीदार विषयी माहिती	१३२
४३	ग्रंथालयातील वाचन साहित्याची वाचकांना दिल्या जाणाऱ्या प्रकाराची माहिती	१३३
४४	ग्रंथालय संदर्भसेवा विषयी माहिती	१३४
४५	ग्रंथालय झेरॉक्स प्रती सेवा विषयी माहिती	१३४–१३५
४६	इतर वाचक सेवा विषयी माहिती	१३५–१३६
४७	अंतर ग्रंथालय देवघेव सेवा विषयी माहिती	१३६
४८	ग्रंथालय इंटरनेट सेवा विषयी माहिती	१३७–१३८
४९	ग्रंथालय कॉम्प्युटरायझेशन द्वारा देवाणघेवाण विषयी माहिती	१३८
५०	ग्रंथालय सॉफ्टवेअर विषयी माहिती	१३९–१४०

कोष्टक क्रमांक	तपशिल	पृष्ठ क.
५१	ग्रंथ रद्दबातल धोरणा विषयी माहिती	१४०–१४१
५२	हरवलेल्या ग्रंथ दंडाविषयी माहिती	१४२
५३	जुने व खराब ग्रंथाविषयी माहिती	१४३
५४	ग्रंथाची ग्रंथबांधणी विषयी माहिती	१४३–१४४
५५	ग्रंथ मोजणी विषयी माहिती	१४४–१४५
५६	ग्रंथालयांच्या वेळे विषयी माहिती	१४५–१४६
५७	ग्रथालयातील वाचकांची संख्या विषयी माहिती	१४६–१४७
५८	नियतकालिक वर्गणीविषयी माहिती	१४७–१४९
५९	ग्रंथालयातील वर्गणी नियतकालिका विषयी माहिती	११४९
६०	ग्रंथालयातील नियतकालिका विषयी माहिती	१५०
६१	ग्रंथालय स्वतंत्र इमारती विषयी माहिती	१५०–१५१
६२	ग्रंथ ठेवण्यासाठी पुरेशी जागेविषयी माहिती	१५२
६३	मागील वर्षी झालेल्या वाढीविषयी माहिती	१५२–१५३
६४	ग्रंथाचे बजेट विषयी माहिती	१५४
६५	महाराष्ट्र शासन ग्रंथालय अनुदानाविषयी माहिती	१५५
६६	ग्रंथालय सुरक्षिततेसाठी उपाय योजना विषयी माहिती	१५६
६७	सुरक्षिततेच्या कोणत्या उपाययोजना विषयो माहिती.	१५६–१५७
६८	ग्रंथालयाच्या भविष्यकालीन योजना विषयी माहिती	१५८–१५९

कोष्टक यादी

(ब) अध्यापक, विद्यार्थी

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१	सर्वोच्च न्यायालयाने आयुर्वेद डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्याची माहिती	१६१
२	सि.सि.आय.एम. अधिसुचने नुसार आयर्वेद डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्याची माहिती	१६२
३	ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ, संदर्भग्रंथ, ॲलोपॅथी ग्रंथ उपलब्ध विषयी माहिती	१६३
४	ग्रंथालयात वाचन साहित्य संग्रह विषयी माहिती	१६४
५	ग्रंथालयात ग्रंथ निवड सहभाग विषयी माहिती	१६५
६	ग्रंथालयात वाचन साहित्य संग्रहाच्या जागे विषयी माहिती	१६५–१६६
७	पाने फाटलेले, खराब झालेले ग्रंथ रद्दबातल विषयी माहिती	१६६–१६७
८	ग्रंथालयात ॲलोपॅथी ग्रंथाविषयी माहिती	१६७–१६८
९	ग्रंथालयात ई–बुक्स वापराविषयी माहिती	१६८
१०	ग्रंथालयात ग्रंथ वापरा विषयी माहिती	१६९–१७०
११	ग्रंथालयात वाचन साहित्य धोरणा विषयी माहिती	१७०–१७१
१२	ग्रंथालयात ॲलोपॅथी सिडी उपलब्ध व वापरा विषयी माहिती	१७१–१७२

अनुक्रमणिका


अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
१	संशोधक प्रमाणपत्र	II
२	मार्गदर्शक प्रमाणपत्र	III
३	ऋणनिर्देश	IV-V
४	आलेख सुची	VI
५	कोष्टक यादी	VII-XI
६	अनुक्रमणिका	XII-XV
७	पुणे आयुर्वेद महाविद्यालयांचे ठिकाण दर्शविणारा नकाशा	XVI
प्रकरण पहिले	**संशोधनाचे प्रस्तावनात्मक विवेचन**	**१–१३**
१.१	प्रस्तावना	१–३
१.२	संशोधनाचा विषय निवड	४
१.३	विषय निवडीची भूमिका	४–५
१.४	संशोधनाची आवश्यकता	६
१.५	संशोधनाची उद्दिष्टे	७
१.६	संशोधनाची व्याप्ती	८
१.७	गृहितके	८
१.८	संशोधन पध्दती	९
१.८.१	संशोधन तंत्रे	१०
१.८.२	माहिती संकलनाची साधने	१०
१.८.३	माहिती विश्लेषण पध्दती व सादरीकरण	११–१२
	प्रकरण पहिले टिपा संदर्भसुची	**१३**

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
प्रकरण दुसरे	**भारतातील शिक्षण, आयुवंद शिक्षणाचा इतिहास**	**१४–४६**
२.१	शिक्षण अर्थ स्वरूप	१४
२.२	भारताच्या संदर्भात शिक्षण	१५
२.३	मध्ययुगीन भारतीय शिक्षण	१६
२.४	ब्रिटीशकालीन भारतीय शिक्षण	१७–१८
२.५	स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण	१९–२०
२.६	आयुर्वेद अर्थ, स्वरूप, व्याप्ती	२०–२१
२.७	आयुर्वेदाचा इतिहास, उदय, वाढ	२१–२५
२.८	आयुर्वेद शिक्षणवाढ व विकास	२६
२.९	आयुर्वेद शिक्षणसंबंधी केंद्रीय समित्या	२७–३०
२.१०	आयुर्वेद शिक्षणांशी संबंधीत प्रमुख संस्था	३१–३२
२.११	आयुर्वेद महाविद्यालयांची ओळख	३३–४३
	प्रकरण दुसरे टिपा संदर्भसुची	४४–४६
प्रकरण तिसरे	**पुर्व अभ्यासाचे समालोचन**	**४७–६३**
	प्रकरण तिसरे टिपा संदर्भसुची	**६४–६७**
प्रकरण चौथे	**वाचन साहित्य धोरणाविषयी माहिती**	**६८–९२**
४.१	प्रस्तावना	६८–६९
४.२	वैद्यकीय शिक्षण विभागाचे धोरण	६९

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
४.३	ग्रंथोपार्जन	७०
४.४	वाचन साहित्य संग्रह विकास	७०–७१
४.५	वाचन साहित्य संग्रह विकासाचे हेतू	७२
४.६	वाचन संग्रह विकासाची पाश्वभूमी	७३
४.७	वाचन साहित्य संग्रह विकासाचे धोरण	७३–७४
४.८	वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचे फायदे	७४–७६
४.९	वाचन साहित्य संग्रह विकासाची मार्गदर्शन तत्वे	७६–७७
४.१०	वाचन साहित्य संग्रहविकास ध्येयधोरणाचे घटक	७७
४.११	वाचन साहित्य संग्रहनिवडीची तत्वे	७८
४.१२	वाचन साहित्य विकास धोरणाचे घटक	७९
४.१३	वाचन साहित्य विकसीत करतांना लक्ष दिलेल्या बाबी	८०
४.१४	वाचन साहित्य रद्दबातल करण्यासंबंधी धोरण	८१
४.१५	रद्दबातल कार्यातील अडचणी	८२–८३
४.१६	रद्दबातल संबधीची मार्गदर्शन तत्वे	८४–८८
४.१७	वाचन साहित्य संग्रह संरक्षण, जतन	८९–९०
	प्रकरण चवथे टिपा संदर्भसुची	९१–९२
प्रकरण पाचवे	**माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण**	**९३–१७२**

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
प्रकरण सहावे	**निष्कर्ष शिफारशी आणि शोध**	**१७३–१९३**
६.१	उद्दिष्टये आणि गृहितके	१७३
६.२	गृहितकाची पडताळणी	१७४
६.३	शोध आणि निष्कर्ष	१७४–१८८
६.४	शिफारशी	१८९–१९१
६.५	शोध	१९२
६.६	समारोप	१९३
	परिशिष्टये	**१९४–२०७**
	परिशिष्टये–१ ग्रंथपाल प्रश्नावली	१९४–२०३
	परिशिष्टये–२ अध्यापक प्रश्नावली	२०४–२०५
	परिशिष्टये–३ विद्यार्थी प्रश्नावली	२०६–२०७
	संदर्भसूची	**२०८–२१०**

पुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे ठिकाण दर्शविणारा नकाशा :–



प्रकरण पहिले

संशोधनाचे प्रस्तावनात्मक विवेचन

१.१ प्रस्तावना :–

पुणे शहर ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर असल्या कारणाने येथे शिक्षणाला वाहिलल्या ध्येयवादी शिक्षण संस्था आहे. आणि येथे उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील मोलाचे कार्य करणारे अनेक समाज सुधारकांचा पाया पुणे शहराने घातला आहे. पत्रकारितेमध्ये आणि संशोधन कार्यात पुण्याचे अनेक मानदंड निर्माण केले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये पुण्याचा औद्योगिक विकास झाला आहे. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये पुणे अग्रेसर बनत आहे. पुण्याला ऐतिहासिक दृष्ट्या खुप महत्व आहे.

पुणे हे विद्येचे माहेरघर असल्याने तेथे शिक्षणाला अत्यंत महत्त्व देण्यात आले आहे. ''शिक्षण म्हणजे मानवाला जी स्वावलंबी व निस्वार्थी बनविते, त्यास शिक्षण म्हणावे.'' अशी ऋग्वेदामध्ये शिक्षणाची व्याख्या करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण हे आयुर्वेदिक, होम्योपॅथिक, ॲलोपॅथिक या वेगवेगळ्या पॅथीतुन देण्यात येते. वैद्यकीय शिक्षणातून उत्कृष्ट वैद्यक घडविणे हा महत्वाचा उद्देश असतो.

वैद्यकीय काळापासुन ऋषो मुनीनी लिहिलेल्या धर्म ग्रंथ, देव, उपनिषेदातून आयुर्वेद शिक्षेणास फार महत्त्व असल्याचे दिसून येते.

आयुर्वेद शिक्षण फार प्राचीन असल्याचा पुरावे मिळतात. तथापी सध्याचे आयुर्वेद शिक्षण फार गतिशिल झाल्याने दिसुन येते. लोकांचा आयुर्वेदाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. तसेच भारतातीलच नव्हे ते परदेशातील देखील विद्यार्थी आयुर्वेदाकडे आकृष्ट झाल्याचे दिसुन येते.

भारतामध्ये आयुर्वेद शिक्षण देणारी तसेच ग्रंथालयात वाचन साहित्य, नियतकालिक सेवा देणारी २४६ आयुर्वेद महाविद्यालये आहेत. यामध्ये आयुर्वेदाच्या अभ्यासासाठी ५००० नियतकालिके उपलब्ध आहेत. संशोधन, आद्ययावत माहिती मिळविणे, नविन माहिती प्रकाशित करणे, यासाठी साधारणत: या वाचन साहित्य सेवा घेणारे हजारो विद्यार्थी आहेत. आयुर्वेदाची पंरपरा जतन करणाऱ्या महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालये आहेत.

सध्या एकूण ६२ आयुर्वेद महाविद्यालये असुन या महाविद्यालयातुन ३००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शासनाच्या मुक्त शैक्षणिक धोरणामुळे आयुर्वेद महाविद्यालयाच्या संख्येमध्ये भरच पडत आहेत. तसेच महाराष्ट्रातील जिल्हा निहाय आयुर्वेद महाविद्यालयाची संख्या पाहता पुणे, नाशिक, मुंबई, अहमदनगर या जिल्ह्यामध्ये सर्वाधिक महाविद्यालये आहेत.

महाराष्ट्रात आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना ३ जून १९९८ मध्ये नाशिक येथे करण्यात आली. या विद्यापीठातून प्रतिवर्षी अंदाजे ३००० विद्यार्थी आयुर्वेदाचा अभ्यासक्रम उत्कृष्टरित्या पुर्ण करतात. या विद्यपीठाचा मुख्य उद्देश आरोग्य विद्यापीठाचा दर्जा उंचविणे, गुणवत्तायुक्त वैद्यकिय शिक्षण देणे आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे हे आहे.

पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास करत असताना पुणे शहरातील ७ आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून सद्यस्थितीचा आढावा घेणे ग्रंथालयांच्या वाचन साहित्य धोरणाचा अभ्यास करणे. आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या भावी योजनेचा अभ्यास करणे याकडे संशोधनाचा मुख्य हेतु आहे.

संशोधन प्रकल्पासाठी निवडलेली आयुर्वेद महाविद्यालयाचा कारकीर्द फार जुनी असून आयुर्वेदामध्ये भरीव कार्य केलेली आहेत. अशा महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह धोरण व सद्यस्थिती अभ्यास करण्यामागचा हेतु आहे. सर्व साधारणपणे मनुष्यापर्यंत आयुर्वेदाने मानवाच्या केलेल्या त्यागाचे महत्व समजावे. वाचन साहित्य संग्रह विकास धोरण हे ग्रंथालय कार्यात महत्वाची भुमिका पार पाडीत असते. वाचन साहित्य संग्रह धोरणाचा महत्व मोठ्या प्रमाणात आहे.

१.२ संशोधनाचा विषय निवड :–

एम.फिल. (मास्टर ऑफ फिलॉसॉफो) ही पदवी मिळविण्यासाठी लेखी परीक्षेबरोबर प्रात्यक्षिक म्हणून एखादया विषयावर संशोधन करुन दीर्घ शोधनिबंध (डिझर्टेशन) सादर करणे आवश्यक असते. कारण एम.फिल. ही पदवी संशोधनावर आधारीत असते.(१) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील एम. फिल. पदवी मिळविण्यासाठी **''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास''** या विषयावर संशोधन सादर करावयाचे ठरविले आहे.(२)

१.३ विषय निवडीची भूमिका :

महाविद्यालयीन ग्रंथालये ही उच्च शिक्षण प्रक्रिये मध्ये माहिती सप्रेषणे करण्याची केंद्रे आहेत. कोणत्याही महाविद्यालयाचे ग्रंथालय त्यांच्या पितृसंस्थेशी संबंधीत सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना, अध्यापकांना व संशोधकांना व संशोधकांना सर्व माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करत असते. यास आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालये अपवाद नाही. म्हणून आयुर्वेद महाविद्यालयांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी वाचन साहित्य संग्रहांचे मुल्यमापन करताना वाचन साहित्याची गुणवत्ता (Quality) विचारत न घेता संख्या (Quantity) विचारात घेतली जाते.

अलीकडे वाचकांना व त्यांच्या गरजांना महत्व दिले जाते . संख्येने अधिक असण्यापेक्षा वाचकांच्या गरजांची पुर्तता करणारा ग्रंथ संग्रह असावा असा मतप्रवाह सध्या दृढ होत आहे. यामधुन वाचन साहित्य विकासाची संक़ल्पना पुढे आली.(३)

संशोधकाने याच विषयाचा विचार करून **''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास''** करण्याचे ठरविले आहे. त्याचप्रमाणे देशातील आयुर्वेद पदवीधारक डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दि. ८ ऑक्टोंबर १९९८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मिळालेली आहे.(४)

''महाराष्ट्र शासनाने दि. २५ नोव्हेंबर १९९२ रोजी निर्णय जारी करून भारतीय चिकित्सा पध्दतीच्या महाराष्ट्रातील व्यवसायींना आधुनिक औषधांचा (ॲलोपॅथी) वापर करण्याची परवानगी दिलेली आहे.''[५] त्याच अनुषंगाने संशोधकास विषय निवडीची भुमिका स्पष्ट करताना आयुर्वेद महाविद्यालयांच्या गथालयात आधुनिक शास्त्रांची (ॲलोपॅथी) ग्रंथ, नियतकालिक व इतर वाचनसाहित्य या बाबत आढावा घेणे सद्यस्थिती जाणून घेणे. वाचन साहित्य संग्रहांचा विकास म्हणजे वाचकांना उपयुक्त वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे होय.

१.४ संशोधनाची आवश्यकता :–

पुणे शहरातील अनेक निरनिराळे विषय घेऊन संशोधन कार्य चालु असते. पुणे हे विद्येचे माहेरघर असे म्हणतात. आयुर्वेद महाविद्यालयाची ग्रंथालये ही उच्च शिक्षण प्रक्रियेमध्ये माहिती संप्रेषणे करण्याची केंद्रे असुन त्याच बरोबर संशोधन ग्रंथालये देखील आहेत. आयुर्वेद महाविद्यालयातील वाचन साहित्य संग्रह विकास करतांना वाचकांच्या गरजा विचारात घेऊन केले पाहिजे व देशातील आयुर्वेद पदवीधर डॉक्टरांना ॲलोपॅथी

औषधे वापरण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाने दिलेली आहे. त्या अनुषंगाने हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाचन साहित्य संग्रह विकास कार्याचे नियोजन करण्यासाठी सहाय्यक ठरेल. वाचन साहित्य निरपेक्षपणे निवड करण्यासाठी व्यवहार्य मार्गदर्शन प्राप्त होईल. सर्वोत्कृष्ठ निवड पध्दती निवडण्यासाठी मदत होईल. वाचन पध्दती निवडण्यासाठी मदत होईल.

वाचन साहित्य संग्रहाची वाढ आणि विकासाची दिशा निश्चित क रून दीर्घकालीन आर्थिक नियोजन करण्यास मदत होणार आहे. कोणते वाचन साहित्य संग्रहित करावे आणि कोणते ग्रंथालयातुन रद्दबातल करावे या बाबत मार्गदर्शन मिळेल. आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहामध्ये आधुनिक शास्त्राचे (ॲलोपॅथी) वाचन साहित्य संग्रह किती प्रमाणात उपलब्ध आहे.

याचा आढावा मिळुन भविष्यकाळासाठी वाचन साहित्य संग्रह विकासाच्या कोणत्या योजना व नियोजनाचा अभ्यास करणे हे संशोधकास आवश्यकता वाटते.

१.५ संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधकाला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक ,डायरी २०१४ मध्ये महाराष्ट्रात एकूण ६२ आयुर्वेद महाविद्यालय असल्याचे दिसून आले . पुणे शहरामध्ये ७ आयुर्वेद महाविद्यालये असल्याने सातही निवड करण्यात आली आहे. संशोधकाने सदरचा शोध निबंध पुर्ण करण्यासाठी सात (७) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकासाच्या धोरणाचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टे ठरविले आहेत.

१) **पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा सद्यस्थितीचा आढावा जाणुन घेणे.**

२) **पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य धोरणाचा अभ्यास करणे.**

३) **पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या भावी योजनांचा अभ्यास करणे.**

१.६ संशोधनाची व्याप्ती :

सदरचे संशोधन हे पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालय विभागातील वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने हाती घेतले असुन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक संलग्न सहा (६) आयुर्वेद महाविद्यालये आहे. भारती विद्यापीठ पुणे संलग्न एक (१) आयुर्वेद महाविद्यालय आहे.

आयुर्वेद महाविद्यालयांची निवड करतांना पुणे शहरातील स्वातंत्र्य पुर्व कालखंडातील २ महाविद्यालये असुन ५ महाविद्यालय स्वातंत्र्या नंतर स्थापन झालेले आहे.

एम. फिल.चा संशोधन अहवाल सादर करण्याचा कालावधी सहा महिण्याचा असतो. या कालखंडात शोध निबंध पुर्ण करण्यासाठी पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांची निवड करून व्याप्ती निश्चित केलेली आहे.

१.७ गृहितके :–

१) पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांतील वाचन साहित्य संग्रह विकास धोरणामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

२) पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांतील वाचन साहित्य संग्रहामध्ये ई–वाचन साहित्याचा (Digital Reading Material) कमी प्रमाणात उपलब्ध आहे.

१.८ संशोधन पध्दती :–

सध्या २१ व्या शतकामध्ये माहितीचा महापुर (Information Overflow) आला असुन जग महाप्रचंड गतीने धावत आहे. या गतिमान जगतात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रभावी व दर्जेदार शिक्षण देण्यासाठीची अत्यंत गरज आहे. वैद्यकीय शास्त्रामध्ये तर अशा दर्जेदार शिक्षणाशिवाय पर्याय नाही. असे देण्याबरोबर त्यांना त्या संदर्भातील वाचन साहित्य संग्रह उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे आणि ते कार्य सध्या महाविद्यालयीन ग्रंथालयांना पार पाडावे लागत आहे.

संशोधन :–

१) ''संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध''[६] चार्ल्स बुशा व स्टिफन हार्टर.

२) ''संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतीशिरपणे घेतलेला सत्याचा किंवा आज्ञानाचा शोध''[७] एम.एच.गोपाल

संशोधनासाठी विषय, कालावधी, स्वरूप व महत्त्व यांच्या आधारे खालील पध्दती वापरल्या जातात.

१) वर्णनात्मक संशोधन पध्दती

२) ऐतिहासिक संशोधन पध्दती

३) प्रायोगिक संशोधन पध्दती [८]

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करून वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास विश्लेषणातुन करण्यात आला आहे.

१.८.१ संशोधन तंत्रे :–

वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये माहिती गोळा करण्यासाठी पाहणी, मुलाखत, प्रश्नावली तंत्राचा वापर केला जातो. अभ्यास करण्यासाठी संपुर्ण योजनाबध्द आखणी करावी लागते. या तंत्राच्या सहाय्याने केलेल्या माहितीचे विश्लेषण आणि त्या माहितीची तर्कशुध्द चिकित्सा यामुळे वर्णन अचुक होते.

१.८.२ माहिती संकलनाची साधने :–

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलन करण्यासाठी मुलाखत व प्रश्नावली ही साधने वापरली आहे. ग्रंथपालांची मुलाखत प्रश्नावली व्दारे घेतली आहे.

त्याचप्रमाणे आयुर्वेद महाविद्यालयांतील अध्यापक व विद्यार्थ्यांच्याकडुन सुटसुटीत प्रश्नावलीद्वारे ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकासाविषयी मते जाणून घेतली आहे. त्याचप्रमाणे ग्रंथालयातील रजिस्टरवरून सांख्यिकी माहिती उपलब्ध केली आहे.

महाविद्यालयाची माहिती संबंधीत महाविद्यालयांचा अहवाल, वेबसाईट, माहिती पुस्तके यांच्या माध्यमातून मिळविली आहे.

१.८.३ माहिती विश्लेषण पध्दती व सादरीकरण :–

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करुन अभ्यास केला आहे. वाचन साहित्य संग्रह विकास वाढी बाबत माहितीचे आवश्यक तेथे आलेख, परिशिष्टे काढून दाखविले असून चिकित्सा व वर्णन सेवांच्या बाबतीत गुणात्मक तंत्र वापरून माहितीचे विश्लेषण सोप्या भाषेत केले आहे,

प्रकरणांची मांडणी पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले – संशोधनाचे प्रस्तावनात्मक विवेचन

प्रस्तावना, संशोधनाचा विषय निवड,विषय निवडीची भूमिका, संशोधनाची आवश्यकता, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती, गृहितके, संशोधन पध्दती, संशोधन तंत्रे, माहिती संकलनाची साधने, माहिती विश्लेषण पध्दती व सादरीकरण,

प्रकरण दुसरे – भारतातील शिक्षण, आयुर्वेद शिक्षणाचा इतिहास

शिक्षण अर्थ स्वरूप, भारताच्या संदर्भात शिक्षण, मध्ययुगीन भारतीय शिक्षण, ब्रिटीशकालीन भारतीय शिक्षण, स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण, आयुर्वेद अर्थ, स्वरूप, व्याप्ती, आयुर्वेदाचा इतिहास, उदय, वाढ, आयुर्वेद शिक्षणवाढ व विकास, आयुर्वेद शिक्षणसंबंधी केंद्रीय समित्या, आयुर्वेद शिक्षणांशी संबंधीत प्रमुख संस्था, आयुर्वेद महाविद्यालयांची ओळख

प्रकरण तिसरे – पुर्व अभ्यासाचे समालोचन

प्रकरण चौथे – वाचन साहित्य धोरणाविषयी माहिती,

प्रस्तावना,वैद्यकीय शिक्षण विभागाचे धोरण, ग्रंथोपार्जन, वाचन साहित्य संग्रह विकास, वाचन साहित्य संग्रह विकासाचे हेतू, वाचन संग्रह विकासाची पाश्वभूमी, वाचन साहित्य संग्रह विकासाचे धोरण, वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचे फायदे, वाचन साहित्य संग्रह विकासाची मार्गदर्शन तत्वे, वाचन साहित्य संग्रहविकास ध्येयधोरणाचे घटक, वाचन साहित्य संग्रहनिवडीची तत्वे, वाचन साहित्य विकास धोरणाचे घटक, वाचन साहित्य विकसीत करतांना लक्ष दिलेल्या बाबी, वाचन साहित्य रद्दबातल करण्यासंबंधी धोरण,

रद्दबातल कार्यातील अडचणी, रद्दबातल संबधीची मार्गदर्शन तत्वे, वाचन साहित्य संग्रह संरक्षण, जतन.

प्रकरण पाचवे – माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण,

प्रकरण सहावे – निष्कर्ष शिफारशी आणि शोध

उद्दिष्टये आणि गृहितके, गृहितकाची पडताळणी, शोध आणि निष्कर्ष,शिफारशी, शोध, भविष्यातील संशोधकास दिशा.

प्रकरण पहिले
टिपा संदर्भ सुची

१) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे एम.फिल. शिक्षणक्रम अभ्यासक्रम पुस्तिका २०१३, पृष्ठ.३२.

२) चोपडे संदिप उत्तम, ''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास'', डिसेंबर २०१४ पृष्ठ.१.

३) बुबा जी. ए. (२००७) ग्रंथालय व माहिती शास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह, पृष्ठ १६५.

४) सुप्रिम कोर्ट ऑफ इंडिया (१९९८) सिविल अपीलेट ज्युरिशडिक्शन सिविल अपील नं ८९ ऑफ़ १९८७, सत्यशोधक समाज डिसबर २००८ पृष्ठ २.

५) महाराष्ट्र शासन राजपत्र,(१९९२) महाराष्ट्र मेडिकल प्रेक्टीशन ॲक्ट १९६१ No.CIM 1091/CR 179/91 (Part-IV) Act. सत्यशोधक समाज (मासिक) डिसेंबर २००८, पृष्ठ. १.

६) चार्ल्स बुशा व स्टिफन हार्टर, (१९८०) रिसर्च मेथडस इन लायब्ररीयनशिप एकेडेमीक प्रेस.

७) Gopal , M.H. (1970) An Introducation to Research Procedure in Social Science, Asia Publication House, P.6.

८) Best and Khan, Research in Education, New Delhi Prentice Hall, P. 20.

प्रकरण दुसरे

भारतातील शिक्षण, आयुर्वेद शिक्षणाचा इतिहास

२.१ शिक्षण अर्थ व स्वरुप :–

सध्याचे युग हे माहितीचे युग असे ओळखले जाते. या युगामध्ये शिक्षण म्हणजे शाळेत जाणे वेगवेगळ्या परीक्षा देणे व पदव्या मिळविणे. पदवी मिळविल्यानंतर कोठेतरी नोकरी मिळविणे असाच अर्थ घेण्यात येतो. आपल्या पाल्याला शाळेत टाकणे व शिक्षण सुरु करणे असे पालकांना वाटते. त्यासाठी शिक्षणांचा अर्थ समजणे महत्त्वाचे वाटते. असे संशोधकाच्या दृष्टीने योग्य वाटते.

१) ''परीपक्व व्यक्तीने अपरिपक्व व्यक्तीच्या वैयक्तिक तसेच सामाजिक गरजा लक्षात घेऊन सूचना व शिस्तीच्याद्वारे व्यक्तीतील शारीरिक, मानसिक, बौध्दिक, सौदर्यात्मक, सामाजिक तसेच अध्यात्मिक शक्तीचा सुसंवादात्मक विकास साधुन मोक्ष प्राप्ती करण्यासाठी नियोजित केलेली पध्दतशीर योजना म्हणजे शिक्षण होय.'' रेडन.[१]

२) ''मानवाला जी स्वावलंबी व निस्वार्थी बनवते, तीच विद्या होय'' अशी ऋग्वेदामध्ये शिक्षणाची व्याख्या करण्यात आली आहे.[२]

२.२ भारताच्या संदर्भात शिक्षण :–

भारताच्या संदर्भात शिक्षणाचा विचार करतांना प्राचीन युगापासून करावी लागेल. या युगामध्ये शिक्षणावरती ऋषीमुनीचे वर्चस्व असल्याचे आपणास दिसून येते. तत्कालीन समाज व्यवस्था ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार विभागात सामावली होती.

शिक्षण घेणे आणि देणे हे फक्त ठराविक लोकांच्या पुरते मर्यादीत होते. साधारण: मुल ८–१० वर्षाचे झाले की त्याला शिक्षणासाठी गुरूग्रही पाठवले जात असे. गुरूचे आश्रम शहरापासून लांब, निर्जन,निसर्गरम्य परिसरामध्ये असत त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना स्वत:ची कामे स्वत: करावी लागत त्यामुळे आपोआप त्यांना स्वावलंबन कष्ट करण्याची सवय लागत असे.

वैशिष्टये :–

''प्राचीन काळी शिक्षण हे गुरूच्या घरी म्हणजेच आश्रमात राहुनच घ्यावे लागत असे. म्हणुन या पध्दतीला गुरूकुल शिक्षण पध्दती मानले गेले आहे.''(३)

शिक्षण घेण्याचे ठिकाण म्हणजे आश्रम हे शहरापासून दुर आसल्याने त्यांचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत नव्हता. विद्यार्थ्यांना शांत एकाग्रतेने अभ्यास करता येत होता.

गुरू आणि शिष्याचे संबंध हे २४ तास असल्याने, चांगल्या आणि चारित्र्य संपन्न गुरूंचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत होता. आश्रमातील दिनचर्या पहाटे सुरू होत असे व रात्रीपर्यंत चालत असे.

तत्कालीन गुरू म्हणजे ज्ञानाचे सागरच होते. तयार छापील मजकुर किंवा पुस्तके त्याकाळी नव्हती पाठांतराला सर्वात जास्त महत्व दिले जात होते. श्रवण, मनन, चिंतन ही अभ्यास पध्दती होती.

सर्वांगांनी विचार करता तत्कालीन शिक्षण पध्दतीचा अभ्यास केल्यानंतर त्यातील प्रत्येक गोष्ट विचार करावयास लावणारी आहे. प्राचीन शिक्षण पध्दतीचा जर पुनश्च अंगिकार केला तर संपूर्ण जगाला शांतीचा, सुखाचा खऱ्या ज्ञानाचा मार्ग दाखवण्याचे श्रेय आपल्या भारत देशात लाभेल यात शंका नाही.

२.३ मध्ययुगीन भारतीय शिक्षण :–

प्राचीन काळामध्ये अत्युच्च शिखरावर असणारी शिक्षण पध्दती मध्ययुगीन काळात मुसलमानांच्या आणि परकीय अक्रमणामुळे खंडीत झाल्याचे दिसुन येते. मोगलांनी भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. अनेक महत्त्वाची ठिकाणे काबीज करुन त्या ठिकाणी आपल्या धर्माचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. इ.स. १२९० मध्ये महम्मद घोरी ने 'मदरसा' सुरू केल्या. अकबराने आग्रा, शिक्रि, गुजरात या ठिकाणी शिक्षणाची केंद्रे सुरू केली.

अकबरकालीन शिक्षण पध्दती ही लवचिक होती यात विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार शिक्षण घेण्याची मुभा होती. पण औरंगजेबाच्या काळामध्ये त्यावर निर्बंध आले.

राजकीय अस्थितरतेमुळे शिक्षणाची पाहिजे होती तशी प्रगती होऊ शकली नाही. गरीब आणि सर्वसामान्य जनता शिक्षणापासुन वंचित राहिल्याचे दिसुन येते. (४)

२.४ ब्रिटीशकालीन भारतीय शिक्षण :–

''ब्रिटीशांनी भारतावर जवळ जवळ दीडशे वर्षे राज्य केले. त्यांचा परिणाम जसा इतर क्षेत्रावरती झाला तसा शिक्षणावरही झाला. ब्रिटीशांनी भारतावर राज्य करण्यासाठी त्यांना, फक्त कारकुनांची आवश्यकता होती. त्यामुळे त्यांनी भारतीयांना फक्त सुशिक्षित करण्याचे धोरण ठेवले. १८५४ मध्ये चार्लस वृड यांनी आपले शैक्षणिक धोरण स्पष्ट केले. प्राथमिक शिक्षणावर भर दिला. इंग्रजी व विज्ञानाच्या अभ्यासासाठी विद्यापीठांची स्थापना केली. १८५९ मध्ये लॉर्ड स्टेनलेची 'भारत मंत्री' म्हणुन नियुक्ती झाली. या शैक्षणिक परिस्थितीची पहाणी करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली.''

१) **हंटर कमिशन :–** ''३ जानेवारी १८८२ रोजी तत्कालीन शिक्षण पध्दतीची पाहणी करण्यासाठी व्हाईस रॉय, लॉर्ड स्टिफन याने विल्यम हंटरच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली तिलाच हंटर किंवा भारतीय शिक्षण आयोग म्हणतात.

यामध्ये २२ सदस्यापैकी ७ भारतीय होते पण ते ब्रिटीशधार्जिण होते. भारतीयांचे खरे प्रतिनिधीत्व करणारा एक ही नव्हता. त्यामुळे हा नावाचाच भारतीय आयोग होता.''(५)

२) **भारतीय विश्वविद्यालय आयोग (२७ जाने. १९०२):–**

''विद्यापीठाचा विकास कसा करता येईल तसेच विद्यापीठाचे संघटन व कार्य पध्दतीचा विचार करून सुचना व शिफारशी करणे हे या आयोगाचे काम हे या आयोगाचे काम होते.''(६)

३) **कलकत्ता विद्यापीठ आयोग (१४ सप्टेंबर १९१७) :–** ''कलकत्ता विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणाचे कार्य होऊ शकते की नाही याची शहानिशा करण्यासाठी कलकत्ता विद्यापीठ आयोगाची मायकेल सॅडलर यांचे अध्यक्षतेखाली स्थापना झाली.''

४) **सार्जट आयोग (१९४४) :–** ''सर जॉन सार्जट यांनी ब्रिटीश सरकारच्या आदेशानुसार १९४४ मध्ये शिक्षणाच्या केंद्रीय मंडळाला आपला अहवाल सादर केला. अहवाल पुर्वप्राथमिक ते उच्च शिक्षणाचा सर्व विचार करून सुधारणा करण्यासाठी सूचना करण्यात आल्या होत्या.''(७)

२.५ स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण :

भारत स्वातंत्र झाल्यावर सर्वच क्षेत्रामध्ये विकासास जोर आला. शिक्षण क्षेत्र हीत्या पासून वेगळे राहीले नाही. भारतीय शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती घड्वून आणण्याच्या दृष्टीने भारत सरकारने वेळोवेळी विविध आयोगाची स्थापना करुन शैक्षणिक विकासाचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

१९४७ ला भारत स्वातंत्र झाला. शिक्षणाच्या पद्धतशीर विकासाकडे लक्ष देण्याचे ठरले आहे. १९५० ला भारताची घटना तयार झाली. देशाच्या विकासासाठी पचंवार्षिक, सामाजिक, व आर्थिक नियोजन सुरु झाले.

१) **विद्यापीठ शिक्षण आयोग :–** उच्च शिक्षणा पुनर्रचना करण्यासाठी डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षते खाली १९४८ मध्ये हा आयोग नेमला या समितीने उच्च शिक्षणातील उणिवांकडे लक्ष दिले व त्यांनी माध्यमिक शिक्षणातील उणिवा दाखवल्या.

२) **माध्यमिक शिक्षण आयोग :–** (मुदलियार आयोग) विद्यापीठ शिक्षण आयोगाने माध्यमिक शिक्षणातील उणिवा दाखवल्या होत्या. त्या दुर करण्यासाठी शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी १९५२ मध्ये या आयोगाची स्थापना करण्यात आली होती.

३) **शिक्षण आयोग (कोठारी आयोग) :–** संपूर्ण शिक्षणाचा समग्रपणे विचार करण्यासाठी भारत सरकारने १४ जुलै १९६४ ला थोर शिक्षणतज्ञ डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग शिक्षणाच्या माध्यमातुन नेमण्यात आला. आर्थिक विकास साधने आणि शिक्षणाचे सुक्ष्म अभ्यास करुन उद्दिष्टे निश्चित केली.

४) **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९४६ :–** सर्व धर्म समभाव, सदृढ लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतीक वारशांची जपनुक, निरंतर शिक्षण, राष्ट्रीय साधन संपत्तीचा योग्य वापर, आरोग्य शिक्षणावर भर, समानतेसासाठी शिक्षण इ. वैशिष्टये या आयोगाची सांगता येतील.

जानेवारी १९८५ मध्ये प्रधान मंत्री श्री. राजीव गांधी यांनी ''नविन शैक्षणिक धोरण'' जाहिर केले. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असतांना आपल्याला सर्वधर्म समभावाची लोकशाही, एकात्म,समाजवादी भारतीय समाजाचे स्वप्न साकार करावयाचे आहे.''(८)

२.६ आयुर्वेद म्हणजे:स्वरूप व्याप्ती :–

प्रस्तुत संशोधनामध्ये आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास करत असतांना आयुर्वेद म्हणजे काय याचा थोडासा परामर्श घेणे महत्त्वाचे वाटते.

१) **आयुर्वेद** : आयु+वेद या ठिकाणी आयुर्वेदाचा साधा आणि सरल अर्थ सांगितला आहे. '' आयु म्हणजे जीवन व वद म्हणजे ज्ञान जीवनाचे सर्वांगिण ज्ञान करून देणार शास्त्र म्हणजेच आयुर्वेद हे केवळ वैद्यक शास्त्र नसुन ते जीवशास्त्र आहे. जीवनविद्या आहे'' म्हणजेच'' ज्याच्यामुळे आयुष्याचे ज्ञान प्राप्त करून घेता येते तो आयुर्वेद.(९)

२) ''आयुर्वेद हे भारताचे वैशिष्टयपुर्ण असे वैद्यकशास्त्र असुन ते पृथ्वीवरील सर्वात प्राचीनतम असे वैद्यक शास्त्र आहे '' तसेच '' आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान देणारे शास्त्र''(१०)

या ठिकाणी आयुर्वेदाचा अभ्यास करत असतांना आयुर्वेदाचा उगम किंवा उदय कसा झाला याचा शोध घेणे आवश्यक आहे. म्हणजेच आयुर्वेदाचा इतिहासाचा थोडासा आढावा घेणे भाग आहे.

२.७ आयुर्वेदाचा इतिहास, उदय, वाढ :–

आयुर्वेद हे शास्त्र म्हणुन कसे उदयास आले या संदर्भातील माहिती आपणास दोन विभागात कळेल.

१) **दैवी परंपरा :–** या सृष्टीची निर्मिती ब्रम्हदेवाने केली असे मानले जाते. ''सृष्टी निर्माण केल्यानंतर त्यामध्ये जी प्राणीसृष्टी उत्पन्न होणार आहे त्याची जीवन सुखी व्हावे. त्यांना कोणतीही व्याधी होऊ नयेत म्हणुन ब्रम्हदेवाने आयुष्याचे ज्ञान असणाऱ्या आयुर्वेद शास्त्राची प्रथमत: रचना केली.'' असे मानले जाते.(११)

२) **लौकीक परंपरा :–** सत्य युगानंतर लोकांचे स्वास्थय नष्ट होऊ लागते. त्यांना अनेक प्रकारचे आजार होऊ लागते त्यासाठी त्यावर उपाय शोधण्यासाठी तत्कालीन ऋष्ज्ञी, शास्त्रज्ञांनी हिमालयाच्या पायथ्याशी एक शास्त्रीय परिसंवाद आयोजित केला यास अनेक शास्त्रज्ञ व भारव्दाज हजर होते. आरोग्य रक्षणाचे शास्त्र इंद्रासच माहीत होते.

तेव्हा इंद्राने भरव्दाजास आयुर्वेदाचे ज्ञान दिले. अशा प्रकारचे आयुर्वेदाची निर्मिती झाली. सरासर सृष्टीच्या आगोदर आयुर्वेदाचा जन्म झाला आणि त्यानंतर सजीव सृष्टीचा जन्म झाला असे तत्कालीन साहित्यावरुन दिसुन येते.

वेद काळामध्ये आयुर्वेदाचा प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने वैद्यक काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. वैदिक साहित्य चार विभागात विभागले जाते. छंदकाळ, थंगकाळ, ब्राम्हण काळ, उपनिषद. अरण्यक सुत्तकाळ, शरीर, गर्भविद्या आणि निदानसह चिकित्सा या तीन शास्त्राचा वेदकाळा मध्ये प्रारंभ झाला होता.'' शपथ ब्राम्हण'' आणि अर्थवेद यात मानवी शरीराची हाडे व अवयव व्यवस्थित रितीने मोजुन सांगितली आहेत. वेदकाळामध्ये युध्द होत हाती त्यांच्या जखमाही होत होत्या त्यामुळे कायचिकित्से बरोबर शल्यचिकित्साही केली जात होती.

आयुर्वेदाला पाचवा वेद म्हणुन समजण्यात येत होते. वेद काळामध्ये जेव्हा ग्रंथ निर्माण होऊ लागले तेव्हापासुन आयुर्वेदाची प्रगती होऊ लागली.

''वेदामध्ये २६०, सुश्रुत अंहिजेने ३८५, चरकामध्ये ५००, धन्वन्तरी निघण्टु मध्ये ३२४, द्रव्ययुगामध्ये ६६६, आयुर्वेदिक वनस्पतींचा उल्लेख केल्याचे दिसुन येते.''(१२)

''पौराणिक काळामध्ये सुध्दा वैद्यक शास्त्र प्रगत होते. रामायणामध्ये लक्ष्मण ज्या वेळी रावणाकडुन जखमी होतो त्यावेळी संजीवनी चिकित्सेचा उल्लेख आढळतो, रामायणामध्ये मृत व्यक्तीला टिकविण्यासाठी तैल–द्रोणी मध यांचा उपयोग करीत. रामायण काळात प्रसुतिशास्त्र देखील अस्तित्वात होते. रामायणात असलेली वनस्पतीची नावे सध्या प्राप्त झालेल्या निघण्टु ग्रंथात आढळतात. महाभारत काळामध्ये काय, बाल, ग्रह, उहर्वीद, शल्य,द्रष्टा,जरा, वृषचिकित्सा ही आयुर्वेदाची आठही अंगे प्रगत होती. या कमी भैषज्य औषध चिकित्सेला अधिक महत्व होते.''(१३)

''कफ, पित्त, आयु हे शरीरात उत्पन्न होणारे धर्म असुन हे सम प्रमाणात असणे हे स्वास्थाचे चिन्ह समजले जाते, अग्रीपुराणात धांतुचा व भस्मांचा उल्लेख आढळतो. गरूड पुराणात १४६ ते २०० पर्यंतच्या अध्यायामध्ये आयुर्वेदाचा अल्लेख आढळतो.

पौराणिक काळात प्रारंभ रामायणापासुन सुरू होतो व याज्ञवल्भ्य काळी संपतो. बौध्द काळामध्ये अहिंसेचा उदय झाल्याने त्याचा परिणाम शल्य तंत्रावर झाल्याचे दिसते बौध्दकालीन आयुर्वेदाचे ज्ञान 'विनयपिटीका' होते. जातक ग्रंथावरुन तक्षशिला विद्यापीठातील विद्यार्थी शिर आणि उदर यावर शस्त्रक्रिया करत आल्याचे दिसून येते. वाग्भट काराचे अष्टांग संग्रह व अष्टांगह्रदय हे दोन्ही ग्रंथ याच काळात समाविष्ठ होतात.

आयुर्वेदामध्ये ज्याचा अल्लेख करणे अनिवार्य अशा चरणा विषयी विचार करून शरीर व मन याना बलवान ठेवणे, वैभव संपादन करणे व मोक्ष प्राप्त करून घेणे ही कर्तव्ये त्यांनी सांगितली आहेत. आहात, निद्रा आणि संयम या तीन गोष्टी शरीर स्वास्थ्यास कशा कारणीभुत आहेत हे सांगितले आहे.

चरकसंहितेमध्ये आठ प्रकरणांचा अल्लेख आढळतो. १) सुत्रस्थान, २) निदानस्थान, ३) शरीर स्थान, ४) विमान स्थान, ५) इंद्रीयस्थान, ६) चिकित्सा स्थान, ७) कल्पस्थान, ८) सिध्दान्त स्थान.

''चरक संहितेप्रमाणे सुऋत संहितेसाठी आयुर्वेदात अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाभारतामध्ये सुश्रुतचा पिता विश्वमित्र होय असा अल्लेख आढळतो.

शस्त्रक्रियेचे प्राचीन काळामध्ये प्रगल्भ तंत्र सांगणारा ग्रंथ म्हणुन सुश्रुत संहितेचा उल्लेख करावा लागेल. अष्टांगसंग्रह आणि अष्टांगहृदयम हे घेत. हे ग्रंथ वाग्भट यांनी सातव्या किंवा आठव्या शतकात लिहिल्याचे उल्लेख आहे.

इसवी सनाच्या आठव्या शतकामध्ये आयुर्वेदाची रसशास्त्र किंवा रसतंत्र शाखा उदयास आली असे, मानतात रस म्हणज पारा, रोग निवारण करण्यासाठी आयुर्वेदात सोने, रूपे, शिरे, लोखंड, तांबे, जस्त इ. धांतुंचा उपयोग केला जात होता.

त्याचबरोबर खनिज प्राणी व वनस्पतीजन्य पदार्थाचा रोग निवारण व शक्तीवर्धक म्हणुन उपयोग केला जात होता असा उल्लेख सापडतो. रसरत्नसमुच्चय, रसप्रकाशसुधाकर, रसेन्द्रयुडामणी इ. रसशास्त्रातील ग्रंथ इ.स. च्या १२ ते १७ व्या शतकापर्यंत लिहिल्याचे आढळते.

धन्वंतरी निघण्टु हा आयुर्वेदाचा सर्वात जुना वैद्यकीय ग्रंथकोश किंवा त्यावेळचे नाव निघण्टु मानला जातो. आयुर्वेदामध्ये निर्माण झालेले 'आश्वआयुर्वेद' व 'गजाआयुर्वेद' हे दोनच ग्रंथ सध्या उपलब्ध आहेत.शरीररचना, शरीरक्रीया यांचाही विचार आयुर्वेदात केलेला आहे.''(१४)

२.८ आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास :–

''स्वातंत्र्यपुर्व काळामध्ये लोकमान्य टिळकाचा स्वदेशी चळवळीचा परिणाम म्हणुन भारतात देशी शास्त्र चिकित्सा पध्दतीला चालना मिळाली १९२० मध्ये नागपुर येथ भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसने भारतीयदेशी चिकित्सा पध्दतीचा प्रोत्साहन देण्याविषयीचा ठराव मंजुर केला. स्वातंत्र्यपुर्व काळामध्ये आयुर्वेदाच्या विकासासाठी विविध समित्या स्थापना झाल्याचे दिसुन येते. त्यामध्ये १९२१ मध्ये मद्रास, बंगाल येथे १९२५, मध्ये उत्तरपदेश १९२८, मध्ये मद्रास १९३८, मध्ये पंजाब १९४०,

मध्ये मुंबई १९४७ मध्ये आसाम येथे विविध प्रांतीय समित्या स्थापन झाल्याचे निदर्शनास येते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील शिफारशी केल्याचे दिसुन येते.

देशी चिकित्सा पध्दतीला राजमान्यता देण्यात यावी देशी चिकित्सा पध्दतीतील पदवीधरांची रजिस्ट्रेशन करण्याची सोय करावी. यासाठी निबंधकाची नियुक्ती करावी आयुर्वेद व अन्य देशा चिकित्सा पध्दतीची विद्यालये सुरू करावीत.

आयुर्वेद व देशी चिकित्सा पध्दतीची रूग्णालये उघडावीत या शिफारशीनुसार १९३८ मध्ये आयुर्वेद वैद्यांच्या रजिस्ट्रेशनची सोय करण्यात आली. या करीता भारतीय चिकित्सा बोर्ड व स्टेट कॅान्सिलची स्थापना करण्यात आली. देशी चिकित्सा पध्दतीची महाविद्यालये व रूग्णालये सुरू करण्यात आली.''(१५)

२.९ आयुर्वेद शिक्षण संबंधी केंद्रीय समित्या :–

देशी चिकित्सा पध्दतीचा विकास घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने विविध समित्यांनी स्थापना केलो. त्याची थोडक्यात माहिती.

१) भोर समिती :–

१९४५ मध्ये डॉ. भोर यांच्या अध्यक्षतेखाली पहिली समिती नेमली तीच ही भोर समिती संपुर्ण भारतामध्ये या समितीला सर्व्हे करता आला नाही. म्हणुन या समितीने देशी चिकित्सा पध्दतीचे सर्व निर्णय प्रांतीय समितीने घ्यावेत अशी शिफारस केली.

२) चोपडा समिती:–

१९४६ मध्ये या समितीची स्थापना करण्यात आली या समितीचे अध्यक्ष कर्नल सर रामनाथ चोपडा हे होते. या समितीने संपुर्ण भारतभर पाहणी केली व १९४८ मध्ये आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला.

शिफारशी :–

१. संपुर्ण भारतामध्ये मिश्र वैद्यक पध्दतीचा एकच पाठ्यक्रम कराव.

२. प्रांतीक भाषावर पाठयपुस्तके निर्माण करण्याकरता राज्य शासनाने एक समिती स्थापना करावी व समिती मिश्र अभ्यास क्रमाची पाठयपुस्तके तयार करावीत.

३. एकाच प्राध्यापकाने प्राचीन व अर्वाचिन विषय शिकवावेत.

४. केंद्र सरकारने भारतीय स्तरावर रजिस्ट्रेशनचा कायदा करावा. एक रजिस्टर तयार करावे, राज्य सरकारने एक समिती नेमुन समितीमाफत वैद्याच्या रजिस्ट्रेशनची व्यवस्था करावे.

५. आयुर्वेदाचा संशोधन विभाग असावा.

६. आयुर्वेद व पाश्चात्य वैद्यकांशी समन्वय साधणा व समन्वित पाठयक्रम तयार करावा.

३) पंडीत समिती :–

डॉ.सी.डी.पंडीत या कमिटीचे अध्यक्ष होते. या कमिटीने १) आयुर्वेद कॅालेज मधील प्रवेश पात्रता इंटर सायन्स व पाठ्यक्रम पाच वर्षाचा असावा. २) सर्व भारतभर आयुर्वेदाचा समान अभ्यासक्रम असावा आणि सर्वांना एकच पदवी असावी अशी शिफारसी केल्या.

४) दवे समिती :–

पंडीत समितीने १९५२ मध्ये केलेल्या सुचना व कार्य लक्षात घेऊन १९५४ मध्ये त्रिवेंद्रम येथे एक केंद्रीय स्वास्थ्य परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये पंडीत संमितीने दिलेल्या अहवालावर विस्तृत विचार करून दवे यांच्या अध्यक्षतेखाली फोर्स हेल्थ ॲण्ड डेव्हलपमेंट कमिटीची स्थापना केली.

या समितीने प्रत्येक राज्यात वैद्यकीय शिक्षणाचे एक बोर्ड व फंकल्टी नेमण्यात यावी. बोर्डान सर्व वैद्यकीय व्यावसायिकांचे रजिस्ट्रेशन करावे व फंकल्टीने शिक्षण विषयक कार्य करावे, इंडीयन मेडीकल कॅान्सिल प्रमाणे सेंट्रल कॉन्सिल नेमुन आयुर्वेद शिक्षणाचे नियोजन करावे. आयुर्वेद पदवी स्नातक स्वरुपाची असावी. स्नातकोत्तर प्रशिक्षण व संशोधनाची सोय करावी इ. शिफारशी केल्या.

५) उडूप समिती : –

आयुर्वेदीक शिक्षण संस्था व संशोधन केंद्रें यांची सध्याची स्थिती कशी आहे. त्यांना जे आर्थिक साहाय्य योग्य प्रकारे मिळते की नाही त्याची त्यांनी आज पर्यत काय प्रगती केली. हे पाहण्यासाठी केंद्रं शासनाने १९५८ मध्ये के. एन. उडूप यांच्या अध्यक्षते खाली ही समिती नेमली होती.

या समितीचा मुख्य अभिप्राय मिक्ष वैद्यक तसेच शुध्द आयुर्वेद वैद्यक निर्माण करण्याकडे होता. या समितीचा अहवाल काही प्रमाणात मान्य केल्याने आयुर्वेद शिक्षण प्रणालीत चालना मिळाली.

६) मुदलियार आयोग :–

१९५९ मध्ये श्री मुदलियार आयोग यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने आयुर्वेदा करीता सेंट्रल कौन्सिल तयार करावे, संपूर्ण भारतात आयुर्वेदाचा एकसारखा अभ्यासकेंद्र सुरू करावी व प्रत्येक राज्यात आयुर्वेदाचा स्थानिकोत्तर अभ्यास क्रम सुरू करावा अशा शिफारशी केल्या.

७) व्यास समिती :–

१९६२ मध्ये गुजरात राज्याचे आरोग्य मंत्री श्री. मोहनलाल व्यास यांच्या अध्यक्षते खाली ही समिती नेमण्यात आली. शुध्द आयुर्वेदाचा अभ्यासक्रम तयार करण्यास या समितीस सांगितले होते. तसा या समितीने अभ्यास क्रम तयार केला व काही शिफारशी केल्या.

१९७० साली केंद्र सरकारने एक अध्यादेश काडुन बी.ए.एम.एस. हा शुध्द आयुर्वेदाचा अभ्यास क्रम संपुर्ण भारतामध्ये लागु करण्यात आला. त्यावर निंयत्रण ठेवण्यासाठी सेंट्रल कॉन्सिल इंडियन मेडिसीनची स्थापना करण्यात आली. (१६)

२.१० आयुर्वेद शिक्षणाशी संबंधित प्रमुख शाखा :–

१) सेंट्रल कॉन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, नवी दिल्ली : –

१९७१ मध्ये या केंद्रीय परिषदेची स्थापना करण्यात आली ही परिषद खालील कार्य करते.

अ) देशी चिकित्सा पध्दतीवर नियंत्रण ठेवणे.

ब) देशी चिकित्सा पध्दतीचे अभ्यासक्रम निश्चित करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

क) पदवी निश्चित करण्याबाबत निर्णय घेणे.

ड) देशी चिकित्सा पध्दतीची नवीन महाविद्यालये व औषधी कंपन्या सुरू करण्यास परवानगी देणे. इ कार्ये या परिषदेस करावी लागतात. त्यांच्या नियमा प्रमाणे महाविद्यालयामध्ये सोयी सुविधा आहेत किंवा नाहीत त्यांच्या वरती योग्य ती कारवाई केली जाते. (१७)

२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक : –

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना ३ जून १९९८ मध्ये नाशिक येथे करण्यात आली. या विद्यापीठाच्या मुख्य उद्देश आरोग्य विद्यापीठाचा दर्जा उंचावणे, गुणवत्तायुक्त वैद्यकिय शिक्षण देणे आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे हे आहेत.

सध्या या विद्यापीठाअंतर्गत वैद्यकीय, दंत आयुर्वेद युनानी, होमिऔपयी, फार्मसी, ॲक्युप्रेशर, थेरेपी, फिजिओ थेरेपी, ॲडीओलॉजी इ. अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे. (१८)

वरोल शिक्षण क्रमावरील संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रवेश परीक्षा घेऊन विविध अभ्यासक्रमासाठी विविध वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे काम हे विद्यापीठ करत असते. प्रवेश देणे, परीक्षा घेणे, नियंत्रण ठेवणे ही देखील काम करत असतात.

''या विद्यापीठांतर्गत पदवी व पदव्युत्तर एकूण महाविद्यालयाची संख्या ३३० असून या संपुर्ण महाविद्यालयातील एकुण १९१३७ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ही सर्व महाविद्यालये महाराष्ट्रातुन ३५ जिल्हयात कार्यरत आहेत.

या विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाने ५१ एकर जागा दिली आहे. तसेच प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी ३० कोटी रूपयाची तरतुद करण्यात आली आहे. या विद्यापीठामध्ये सध्या ११७ कर्मचारी कार्यरत आहेत. आताच या इमारतीचे काम पुर्ण होऊन विद्यापीठ नवीन इमारतीत स्थापन झाली आहे.

या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डी.जी. डोणगावकर हे होते तर सध्या या विद्यापीठाच्या कुलगुरू पदी डॉ. अरूण जामकर हे आहेत.(१९)

आयुर्वेद महाविद्यालयांची ओळख

१) राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे–टिळक आयुर्वेद महाविद्यालय :–

''स्वातंत्र्यपूर्व काळात देशभक्तीने भारावलेली आणि पारंपारीक वैद्यक व संस्कृतीच्या प्रेमापोटी ९ फब्रुवारी १९२४ साली डॉ. बा. चिं. लागू, वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल साहित्य सम्राट, न. चि. केळकर आदी मान्यवरांनी ही संस्था स्थापन केली. आज आयुर्वेद रसशाळा, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, सेंटर फार पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च, रिसर्च इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्सेस ॲण्ड मॅनेजमेंट, आयुर्विद्या मासिक, मेहंदळे दवाखाना व संलग्न संस्था शेठ ताराचंद रामनाथ हॉस्पिटल कार्यरत आहेत.

आयुर्वेद रसशाळेची स्थापना १९३५ मध्ये झाली. गेल्या ७७ वर्षात प्रारंभी गुटी, वटी, काढे, भस्मे यांचे उत्पादन केले. नंतर आसव–अरिष्टे, सुवर्ण युक्त औषधे, प्रशम आसव व गोळ्या, व्हॅसोसिन, फार्टेक्स, रक्तवर्धक, शतावरी कल्प, आदि उत्कृष्ट प्रतिची औषधे बनविले जातात. या औषधांना अनेक राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. टिळक आयुर्वेद महाविद्यालय २६ जून १९३३ साली सुरू झाले. आयुर्वेदाच्या शिक्षणासाठी भारतातील स्नातक पदवी, पदव्युत्तर व

पी.एच.डी. आदि पदव्या मिळवुन समाजासाठी दवाखाने व रूग्णालयांमधुन वैद्यकीय सेवा देत आहेत. अनेकांनी देश व विदेशात विविध पदे भुषविली आहेत.

आयुर्वेदाचार्य पुरूषोत्तम शास्त्री नानल रूग्णालय ५ फब्रु. १९६५ रोजी सुरू झाले. आयुर्वेद क्षेत्रातील पंचकर्म चिकित्सा, बाह्य रूग्ण व प्रवेशित विभाग, सुसज्ज शस्त्रकर्म मंदिर, प्रसुतीगृह, याव्दारे रूग्णसेवा करीत आहे, आधुनिक वैद्यकातील प्रगत असणाऱ्या एंडोस्कोपीच्या अद्यायावत सुविधा रूग्णालयात उपलब्ध आहेत. राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे मुखपत्र असणारे आयुर्विद्या मासिक आयुर्वेद शिक्षण, संशोधन आणि रा.शि. मंडळाच्या विविध कामांची माहिती देते. रिसर्च इन्स्टिटयुट ऑफ हेल्थ सायन्सेस ॲण्ड मॅनेजमेंट तफ पोस्ट ग्रॅज्युएट प्रोफिशिअन्सी इन पंचकर्म, पि.जी. प्रोप्रिशिअन्सी इन आयुर्वेदिक डायटेटीक्स, सर्टिफिकेट कोर्स इन मसाज थेरपी, डिप्लोमा इन योग, पी.जी.डी.बी एम. व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अन्य अभ्यासक्रम चालविले जातात. रा. शि मंडळाच्या संलग्न संस्था टिळक आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेद रसशाळा, वैद्य पुरूषोत्तमशास्त्री नानल रूग्णालय, मेहेंदळे दवाखाना, आयुर्विद्या मासिक, सेंटर फॉर पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज ॲन्ड रिसर्च इन आयुर्वेद, रिसर्च इन्स्टिटयुड ऑफ हेल्थ सायन्सेस ॲण्ड मॅनेजमेंट , शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय रुग्णालय आहेत. (२०)

२) आयुर्वेद शिक्षण मंडळ, पुणे–अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय :–

'' आयुर्वेद शिक्षण या उद्देशाने आयुर्वेद शिक्षण मंडळ, पुणेची स्थापना १ एप्रिल १९३६ रोजी थोर स्वातंत्र सेनानी कै. वैद्यराज हरिभाऊ परांजपे यांनी केली.

त्यांना वैद्य श्री. मुळे, वैद्य श्री. किंजवडेकर शास्त्री यांनी विशेष सहकार्य केले. तर १ जून १९३६ साली अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना होऊन आता पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण करीत आहे या कालावधीत आयुर्वेद क्षेत्रात अनेक विद्यार्थी घडवून नामवंत वैद्यराज, आयुर्वेदाचार्य नावलौकिक मिळवीत आहेत. या काळात संस्थेने सामाजिक बांधिलकीतून विविध उपक्रमाद्वारे आपल्या कार्याचा बहुमान मिळवून विविध पारितोषिके मिळविली आहेत. या कार्याने संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचली आहे. आज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्याशी सलग्न असून बी.ए.एम.एस. बरोबरच एम .डी. (आयुर्वेद) हे अभ्यासक्रम शिकविले जातात पी.एचडी. आयुर्वेदासाठी केंद्र म्हणून मान्यता आहे. दरवर्षी श्री. अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान येथे मोफत आरोग्य शिबिर, कोकणातील दुर्गम भागात १० दिवसांचे आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. दि. ७ फब्रुवारी रोजी संस्थापक जयंतीदिन निमित्ताने राष्ट्रीय पातळीवर वकृत्व व निबंध स्पर्धाचे आयोजन केले जाते .

तर आयुर्वेदोक्त स्वास्थ, रक्षण व्याख्यानमाला दरमहा चालविली जात असुन त्यास उत्तम प्रतिसादर मिळत आहे, संस्थेत स्त्रीरोग प्रसुतीतंत्र, कुटुंब नियोजन, गर्भिणी परिक्षा, बालरोग, शल्यविभाग, शालाक्य विभाग. प्रयोगशाळा, पंचकर्म चिकित्सा विभाग अशा अद्ययावत सुविधांनी विभागवार सुविधा दिली जात असुन शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने नागरीक लाभ घेत आहे. (२१)

३) भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय वाघोली:–

प.पु.प्रा.के. सरदेशमुख (महाराज) यांनी १९५४ मध्ये ४ वेद, ६ शास्त्र, १८ पुराणे,१४ विद्या यांचे जतन व पुनरुज्जीवन व्हावे या हेतुने भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्टची स्थापना केली. या माध्यमातुन आजपर्यंत विविध प्रकल्प साकार केले. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात पुणे, मुंबई, सोलापुर, कोल्हापुर, गुडगाव (दिल्ली) या ठिकाणी संस्थेचे प्रकल्प कार्यरत आहेत. त्यात आयुर्वेद रूग्णालय व संशोधन केंद्र, कॅन्सर संशोधन प्रकल्प, एडस् संशोधन प्रकल्प, अस्थिभग्न व विलंबित अस्थिसंधान प्रकल्प, माता– बाल संगोपन प्रकल्प, पंचकर्म केंद्र, आयुर्वेद महाविद्यालय, अथर्व आयुर्वेद फॉमास्युटिकल्स, संजीवनी वनौषधी विभाग, योग केंद्र साम संगीत सभा केशव आबाजी शैक्षणिक संस्था या होय.

इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर, वाघोली पुणे (महाराष्ट्र, भारत)

कॅन्सरसाठी एकाच ठिकाणी आयुर्वेदिक व ॲलोपॅथीक चिकित्सा उपलब्ध करून देणारे नाविन्यपुर्ण सेंटर असून त्यात आयुर्वेदिक चिकित्सा पंचकर्म चिकित्सा आयुर्वेदिक पथ्यकर आहार, योगचिकित्सा, कॅन्सर, केमोथेरॅपी, रेडियोथेरॅपी, कॅन्सर शस्त्रकर्म, सर्व सुविधानी सुसज्ज कॅन्सर प्रयोगशालेय तपासण्या, कॅन्सर निदान, ओझोन चिकित्सा इ. सुविधांना समावेश आहे, याचा मोठ्या प्रमाणात रूग्ण लाभ घेत आहेत.(२२)

४) महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय:–

पुज्य साने गुरूजींच्या विचाराने प्रेरित होऊन ११ जुन १९६० मध्ये डॉ. दादा गुजर यांनी संस्थेची स्थापना केली. प्रामुख्याने सामाजिक, बांधिलकीतून आरोग्याचे शिक्षण प्रसार व प्रचार व्हावा. आता संस्था ५५ व्या वर्षात पदार्पण करत असताना २५० खाटांने सुसज्ज साने गुरुजी रुग्णालय ग्रामीण भागातील लोकांचे आधारस्तंभ बनले आहे. या संस्थेने चिकित्सा, कुटूंबकल्याण, माता बाल संगोपन, लसीकरण, आरोग्य प्रबोधन अशा विविध पुरस्काराने बहुमान मिळविले आहे. दादांच्या कार्याने व आचारणातून एक सेवाभावी पिढी उभे राहीली आहे.

आता सचिव मा. अनिलभाऊ गुजर संस्थेचे काम पहात आहेत. सुमतीभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय हे १ ऑगस्ट १९९० पासून कर्मयोगी डॉ. दादा गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली आपली अविरत सेवा,

शिस्त व संशोधन वृत्ती या त्रिसूत्रीद्वारा विनाअनुदानित महाविद्यालयात महाराष्ट्रातील एक अग्रगण्य महाविद्यालय म्हणून नावलौकिक मिळवित आहे. महाविद्यालयात बी.ए. एम.एस्. साडे पाच वर्षाची पदवी शिक्षण असून विद्यार्थी क्षमता ६० आहे. याशिवाय पदव्युत्तर एम.डी./ एम.एस. या एकूण तीन वर्षाच्या शिक्षणासाठी १३ विविध विषयात दरवर्षी ६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तज्ञ अध्यापक, सुसज्ज ग्रंथालय, उत्तम प्रयोगशाळा, म्युझियम, औषधी वनस्पती उद्यान, विद्यार्थी–विद्यार्थीनी वसतीगह आदी सुविधांसह २५०बेडचे अद्यायावत साने गुरुजी रुग्णालयामुळे येथे विद्यार्थी प्रवेशासाठी प्राधान्य देतात. साने गुरुजी आरोग्य केंद्र, आयुर्वेद रुग्णालय– ग्रामीण जनतेचे आधार केंद्र, दरवर्षी एक लाखाहून अधिक रुग्णांचे बाह्यरुग्ण सेवा देण्यात येते.

प्रशिक्षीत व कुशल वैद्यकिय सेवा देणारा तज्ञवर्ग, आय.सी.यु. पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, कुटूंब कल्याण केंद्र , ॲनीमिया, संशोधन प्रकल्प, इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग एज्युकेशन , दादा गुजर आयुर्वेद पदव्युत्तर अध्ययन संशोधन संस्था हे सर्व मंडळातफ चालविले जात आहेत. १ ऑगस्ट २०१५ रोजी महाविद्यालयास २५ वर्षे पुण होवून रौप्यमहोत्सवी वर्षे साजरे करण्यात येणार आहे. [२३]

५) भारती विद्यापीठ अभिमत विश्वाविद्यालयाचे कॅालेज ऑफ आयुर्वेद, पुणे : –

मा. नामदार डॉ. पतंगरावजी कदमसाहेब यांनी उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या उदात्त हेतुने दि. १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. ''गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन'' हे संस्थेचे ब्रीदवाक्य. नंतर संस्थेच्या प्रत्येक शाखांच्या कार्यप्रणालीचा मूलमंत्र बनले. २६ एप्रिल १९९६ रोजी या विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारसीनुसार भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मत्रालयाने ''अभिमत विश्वविद्यालय '' असा दर्जा देवून गौरव केला. मा. कुलगुरु डॉ. शिवाजीराव कदम हे या अभिमत विश्वविद्यालयाची धुरा समर्थपणे सांभाळीत आहेत. कार्यवाही मा. डॉ. विश्वजीत कदम यांच्या खंबीर नेतृत्वाखाली भारती विद्यापीठ सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे. आजमितीला वैद्यकीय, दंतवैद्यक, आयुर्वेद , होमिओपॅथी, नर्सिग, औषधीनिर्माण, जैवंतत्रज्ञान, अभियांत्रिकी विधी अशा सुमारे २९ शाखांमाफत भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे ज्ञानदानाचे कार्य अखंडितपणे करीत आहे.

१६ ऑगस्ट १९९० रोजी सुरु झालेले आयुर्वेद महाविद्यालय, पुणे ही शाखा गेल्या २४ वर्षापासून आयुर्वेद शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव काम करीत आहे. सेंट्रल कॅान्सिल ऑफ इंडियन मेडिसिन (सी.सी.आय.एम.)

नवी दिल्ली व डिपार्टमेंट ऑफ आयुष, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मान्यताप्राप्त असलेल्या या महाविद्यालयामध्ये बी.ए.एम.एस. एम.डी./एम.एस. (आयुर्वेद), पी.एच. डी. (आयुर्वेद) व डी.एन.वाय.एस. हे कोर्सेस उपलब्ध आहेत. पदवी अभ्यासक्रम प्रवेश क्षमता १०० असून पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश क्षमता ५७ आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील, विविध राज्यातील व परदेशातील विद्यार्थीही या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहेत. अनुभवी अध्यापक, सुसज्ज ग्रंथालय, सर्व सोयीनियुक्त रुग्णालय, वनौषधी उद्यान, औषधनिर्माण शाळा, द्रव्य संग्रहालये, लॅबोरेटरीज, शवविच्छेदन कक्ष, मुलामुर्लीचे स्वतंत्र वसतीगृह, खेळांचे मैदान, सभागृह, कॅन्टीन, बँक़ इ. सुविधांमुळे विद्यार्थी या महाविद्यालयाकडे आकर्षित होत आहेत.

आयुर्वेद शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने महाविद्यालया मध्ये विविध प्रकारच्या क्रिडास्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव, श्लोक पाठांतर स्पर्धा आयोजित केल्या जातात.

तसेच राज्यात व राज्याबाहेर होणाऱ्या विविध स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थांना प्रोत्साहीत केले जाते. राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) च्या साहाय्याने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी दिली जाते. प्राचार्य डॉ. अभिजीत पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली हे महाविद्यालय आयुर्वेद क्षेत्रामध्ये नावलौकिक प्राप्त करीत आहे. (२४)

६) पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, निगडी :–

भारतीय केंद्रीय चिकीत्सा परिषद, नवी दिल्ली, आयुष विभाग, नवी दिल्ली, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडिया मेडिसीन, मुंबई आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेशी संलग्नीत तसेच महाराष्ट्र राज्य शासन मान्यताप्राप्त. पीएच.डी. अभ्यासक्रम व पंचकर्म, क्षारसूत्र आणि सौंदर्यप्रसाधन शास्त्राचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदवी– बी.ए.एम.एस (६० प्रवेश क्षमता) व पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.डी./एम.एस. (२४ प्रवेशक्षमता) शरीर रचना–४, कायचिकित्सा–४,स्वस्थवृत्त–२, रोगनिदान–२, स्त्रीरोगप्रसूतीतत्र–२, शरीर क्रिया–२, शल्यतंत्र–२, पंचकर्म–२, संहिता–२, द्रव्यगुण–२, आयुर्वेद रिसर्च डेटाबेस (अे. आर. डी.बी.) संशोधन प्रकल्प. ६४ अनुभवी व तज्ञ अध्यापक,

सुसज्ज ग्रंथालये (पदवी व पदव्युत्तर) डिजीटल, इंटरनेट सुविधासह , राष्ट्रीय सेवा योजना, क्रिडा विभाग, संशोधन विभाग, वनौषधी उद्यान व औषधी निर्माण विभाग, अश्वमेध, इंद्रधनुष्य, अविष्कार, स्पंदन, बहि:शाल, स्नेहसंमेलन इ. उपक्रमांचे यशस्वी आयोजन व सहभाग, आयुर्वेद प्रसार व प्रसाराकरीता ''आरोग्य मित्र'' त्रैमासिकाचे प्रकाशन. विद्यार्थी व विद्यार्थींनी करिता वसतिगृहांच्या सर्व सोयींनीयुक्त प्रशस्त इमारती . (२५)

७) डॉ. डी. वाय. पाटील विद्याप्रतिष्ठान सोसायटीचे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, पिंपरी :–

ज्ञानदान हे सर्व श्रेष्ठ असून त्यातून समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास होत आहे. या कल्पनेतून डॉ. डि.वाय. पाटील विद्यापीठाची स्थापना झाली. आज या शिक्षण संकुलात मेडिकल, डेन्टल, आयुर्वेद, होमिओपॅथी, फिजिओथेरपी, नर्सिंग, इंजिनिअरींग, एम.बी.ए., एम.सी.ए., डी.एड., कॉम्प्युटर सायन्स, आर्ट, कॉमर्स, सायन्स, बायोटेक, हॉटेल मॅनेजमेंट बरोबरच इतर सर्व विभागांचा समावेश असून एक उत्कृष्ट शैक्षणिक समुह म्हणून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळवत आहे. त्यामागे उत्तम नियोजन व मार्गदर्शक म्हणून डॉ. पी. डी. पाटील हे आहेत. विद्यापीठाचे कुलपती आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्या प्रतिष्ठान सोसायटीचे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत.

या कार्यामुळे विद्यापीठ व शैक्षणिक संस्था प्रगतीकडे वाटचाल करीत असून यांना विविध पारितोषिकांचा बहुमान मिळालेला आहे. सन २००४ मध्ये राष्ट्रीय एकता अॅवार्ड, सन २००५ मध्ये समाजश्री अॅवार्ड, २००७ मध्ये बहुजन पुरस्कार अॅवार्ड आणि अॅवार्ड ऑफ एक्सलन्स यांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि उद्योग क्षेत्रांत भारत एक महासत्ता व्हावी, ही डॉ. पी.डी. पाटील यांची इच्छा आहे. तेव्हा भावी पिढीला ज्ञान देणे आपले कर्तव्यच आहे, असे त्यांना वाटते व तशी वाटचाल सुरू आहे.

या संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय एका नव्या भव्य वास्तूत उभारत असून प्रशस्त आवार आहे. तर आयुर्वेद महाविद्यालयाची पदवी अभ्यासक्रम प्रवेश क्षमता–७५, पदव्युत्तर अभ्यासक्रमाची एकूण प्रवेश क्षमता–२० आहे. या महाविद्यालयात आयुर्वेद, संहिता, शरीर रचना, कार्यचिकित्सा, स्त्री रोग प्रसुतीतंत्र, शल्यतंत्र सामान्य या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे. सुसज्ज व डिजीटल ग्रंथालय, इंटरनेट व संगणक सुविधा, प्रशस्त सर्व सोयींनी सुसज्ज प्रयोगशाळा, लेक्चर हॉल व प्रात्यक्षिक हॉल, राष्ट्रीय सेवा योजना, आयुर्वेदीक वनौषधी उद्यान, औषध निर्माण विभाग, तज्ञ व अनुभवी अध्यापक वर्ग आहे. तर संस्थेचे पदाधिकारी सौ. भाग्यश्री पी. पाटील, व्हा. चेअरमन श्री. सोमनाथ पी. पाटील, सचिव डॉ. डी. डी. पाटील, संचालक–आयुर्वेद आहेत. [२६]

प्रकरण दुसरे

टिपा–संदर्भ सुची

१) देवघर , स.क्र. ऐतरेय, लैतिरिय व प्रश्नोपनिषद पुणे: प्रसाद प्रकाशन, १९९०. पृ. २७८.

२) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५, पृ.३

३) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५, पृ.३५.

४) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५,

५) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५,

६) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५,

७) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५,

८) आहेर, हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर: श्री विद्या प्रकाशन, १९९५,

९) पलंगे, म.पा, देशपांडे राजेंद्र, शरिर क्रिया विज्ञान, भाग १ पुणे: आनंद प्रकाशन,१९९२ पृ.९.

१०) रानडे, सुभाष परांजपे, गो. रा. आयुर्वेदाचा इतिहास व परिचय, पुणे: अनमोल प्रकाशन, १९८१, पृ.२१७,२१८.

११) रानडे, सुभाष पराजपे , गो.रा. आयुर्वेदाचा इतिहास व परिचय, पुणे : अनमोल प्रकाशन १९८१, पृ.७.

१२) 'आयुर्वेद' भारतीय संस्कृतीचा कोष भाग १ संपा. पृ. ४६१.

१३) वडोदकर, शि. वी. आयुर्वेदाचा इतिहास, पुणे कॉन्टिनेन्टर प्रकाशन, १९८०, पृ. २२५

१४) 'आयुर्वेद' भारतीय संस्कृतीचा कोष भाग १, सपा. पृ. ४६३.

१५) पडाडे, दिनकर व्यावहारिक आयुर्वेदाचा इतिहास, मांडगाव (वर्धा): व्यावहारिक प्रकाशन, १९९३. पृ.२६३

१६) ओहर, हिरा उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपुर : श्री. विद्या प्रकाशन. १९९५, पृ. ३१.३२.३४.

१७) www.ccimindia.org.in.

१८) जामकर, अरूण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ वार्ता विशेष वैदमासिक – नाशिक : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, पृ. १७,१८.

१९) जामकर. अरूण ''महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ वार्ता विशेष द्वैमासिक नाशिक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, पृष्ठ, १७–१८. www. muhs. ac.in

२०) राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे टिळक आयुर्वेद महाविद्यालय, माहिती पुस्तिका, पुणे www. tilakayuvved.org

२१) आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय माहिती पुस्तिका, पुणे www. ashtangayurved. com

२२) भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय वाघोली माहिती पुस्तिका, पुणे www. ayurvedcollegewagholi com.

२३) महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सुमतिमाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर. पुणे माहिती पुस्तिका. www. ssayurved. org

२४) भारती विद्यापीठ अभिमत विश्व विद्यालयाचे कॅालेज ऑफ आयुर्वेद, कात्रज, पुणे माहिती पुस्तिका www. coayured. bharatidyapeeth. edu.

२५) पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, निगडी पुणे माहिती पुस्तिका. www. pdeacarcayu. com

२६) डॉ. डी. वाय. पाटील विद्या प्रतिष्ठान सोसायटिचे पद्मश्री डॉ. डी.वाय पाटील आयुर्वेद माहाविद्यालय व संशोधन केंद्र, पिपरी, पुणे माहिती पुस्तिका.

www. dypatilayurved. co .in

प्रकरण तिसरे

पुर्व अभ्यासाचे समालोचन

(वाचन साहित्य शोध)

प्रस्तावना :–

कोणत्याही संशोधन प्रक्रियेत साहित्य शोध म्हणजे पुर्वी झालेल्या सबंधीत विषयासंदर्भात माहिती घेणे. या (पुर्वाभ्यास) फार महत्व आहे. संबंधित विषयाचे पुर्वी झालेले संशोधन समजु शकते तसेच पुर्वीचे संशोधन व आता करण्यात येणार संशोधन यातून ग्रंथालयाच्या विविध पैलुवर प्रकाश पडतो. संशोधनाची पुनरावृत्ती टाळली जाते. विषयाची प्राश्र्वभूमी समजण्यास मदत होते. त्याच प्रमाणे या विषयातील तज्ञ व्यक्तीचे विचार अनुभव याचा उपयोग होतो.

पुर्वी झालेले संशोधन नियतकालिके, ग्रंथ इत्यादी साहित्यातून संशोधकाला आपल्या विषयासबंधी माहिती मिळते. गृहितके निश्चित करण्यासाठी संशोधकाला पुर्व अभ्यासाचो मदत होते. संशोधकाला आपल्या विषयासबंधी प्रकाशित साहित्याचा शोध घेता येतो.

उदा. नियतकालिके, लेख, वृत्तपत्रे, मासिके इत्यादीचा चिकीत्सक अभ्यास करावा लागतो. संशोधकास माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणासाठी माहिती कशी शोधावी हे समजून घेऊन संशोधकाला अभ्यासाविषयी असणारे साहित्य वापरणे जरुरीचे आहे. संशोधन प्रकल्प हाती घेण्यापुर्वी त्या विषयात पुर्वी कोणत्या स्वरुपातील काय केले आहे हे पाहणे आवश्यक आहे.

एस.आर. रंगनाथ यांच्या पाचव्या सिद्धान्ता नुसार ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था आहे. ग्रंथालयाचा अभ्यास करतानी दिसुन येते की, लेख, प्रबंध, नियतकालिके, अहवाल इ. अमुद्रित वाचन साहित्य प्रकाशित होत आहे. संशोधकाने निवडलेल्या विषयासंबधी व्यवस्थापन व वाचन साहित्याचा विकास संग्रह विकासास दिशा देणारी वाचन साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध असुन तरी देखील उपलब्ध असलेल्या वाचन साहित्यापैको महत्वाचा वाचन साहित्याचा परामर्श घेण्याची संशोधकास दृष्टी असणे गरजेचे आहे.

प्रस्तृत संशोधनामध्ये या विषयाच्या सबंधीत काही प्रकारच्या सुची, प्रबंध, संदर्भग्रंथ, आढावे, परिषदेतील निबंध, मासिक वा वर्तमानपत्रातील लेख, शासनाचे निर्णय तज्ञांची मते, ग्रंथ यांचा वापर करुन सदर विषयात किंवा क्षेत्रात पुर्वी कोणत्या स्वरुपाचे काम केलेले आहे याचे संशोधकाने आपल्या विषयाच्या संबंधित मुलभूत संशोधनाचा आढावा घेतला आहे.

१) **राऊत, प्रतिभा– २००८.**

यांनी लिहलेल्या "Collection Development and Services of Goverment College libraries in mumbai city and subuvrbah." हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठात सादर केला. या प्रबंधामध्ये मुंबई शहर व परिसरातील शासकिय महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा वाचन साहित्य संग्रह विकास याचा सखोल अभ्यास करुन ग्रंथालयात कोणकोणत्या सेवा दिल्या जातात या विषयी आपले मत प्रवाह व्यक्त करण्यात आले आहे. वाचन साहित्याचा विकास सेवा देत असतांनी ग्रंथपालाला आपल्या वाचकांच्या गरजाचा अंदाज घेता येतो. त्या अंदाजानुसार ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह विकासाला गती मिळण्यास सदर प्रबंधावरून मदत होते.[१]

२) **नागरे, शिवाजी ज्ञानदेव–२००४.**

यांनी लिहिलेल्या ''पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाचा अभ्यास'' हा प्रबंध नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर करण्यात आला. सदर प्रबंधामध्ये पुणे व पिंपरी चिंचवड मधील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाची सखोल व चिकित्सक अभ्यास करतांनी ग्रथालयाची ओळख, ग्रंथालयाच्या विविध विभागाची उदा. इमारत, वाचन साहित्य संग्रह विभाग, नियत कालिक, संगणक विभाग, कर्मचारी, इंटरनेट, अंज्ञावली, विविध सेवा यांची सखोल माहिती देण्यात आली आहे. संशोधकाने केलेल्या सुचना मुळे ग्रंथालयास वाचनसाहित्य संग्रह विकास करण्यास दिशा मिळते.(२)

३) **चव्हाण, माया रमेश–२००३.**

यांनी लिहिलेल्या ''पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाच्या वाचकांना मिळणाऱ्या सेवांचा अभ्यास '' हा प्रबंध नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केला असून या प्रबंधामध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा चिकित्सक अभ्यास करुन ग्रंथालयातून वाचकांना कोण कोणत्या सेवा उदाहरणार्थ संदर्भ सेवा, प्रतिलीपी सेवा, देवघेव सेवा, नियतकालिक सेवा, संगणक सेवा, इंटरनेट सेवा ई – बुक्स सेवा, सिडी रोम सेवा अंतर ग्रंथालय देवघेव इ. देण्यात येतात. वाचकांच्या गरजाचा विचार करून वाचन साहित्याचा विकास, संग्रह करणे व वाचकांना वेळेत सेवा पुरविने ही महत्वाची बाब लक्षात येते.(३)

४) चोपडे, संदीप उत्तम –२००६.

यांनी लिहिलेल्या ''आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात माहिती साधन म्हणुन होत असलेल्या नियतकालिकांचा उपयोग'' नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर करण्यात आलेल्या आपल्या प्रबंधामध्ये ग्रंथालयात माहितीचे मिळविण्याचे साधन म्हणुन नियतकालिकाचा उपयोग वाचकांना कशा प्रकारे होतो. व सपुर्ण नियतकालिक विभागाचा सखोल व चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे. वाचकांच्या नियतकालिक विषयक गरज, सुचनांचा नियतकालिक वाचन साहित्य संग्रह विकाससाठी उपयोग करण्यात आला आहे. नियतकालिक विभागाची माहिती, वापर, दिल्या जाणाऱ्या सेवा, बजेट या सर्वांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. (४)

५) टेकाळे, दत्तात्रय रंगनाथ–२०१३

यांनी आपल्या एम फिल प्रबंध लिहिलेल्या ''सिंहगड टेक्निकल एज्युकेशन संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या अभियांत्रिकि महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास'' हा प्रबंध पुणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करण्यात आला आहे या प्रबंधामध्ये अभियांत्रिकि महाविद्यालयांचा ग्रंथालयाची ओळख, वाचन साहित्य, संग्रह विकास धोरणाची पाश्वभुमी विषयी विविध पैलुचा अभ्यास, ग्रंथोपार्जन धोरणाचे महत्व, पारदर्शकता, वाचन साहित्य संग्रहाचा विकास करतांनी वाचकांच्या गरजा विचारात घेण्यात याव्यात. यासाठी संशोधन करण्याची गरज आहे भविष्यात वाचन साहित्य संग्रह विकासाची धोरणे, प्रकार, विकास विविध योजना या विषयावर संशोधकाने संशोधन होण्याची शिफारस करण्यात आली आहे. (५)

६) भालेराव, अरूण ल.–२०१०.

यांनी लिहिलेल्या ''पुणे शहर व संलग्न परिसरातील गेल्या दहा वर्षात नव्याने स्थापन झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील नियतकालिक संग्रह विकास अभ्यास.'' हा प्रबंध पुणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करण्यात आला. दहा वर्षातील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात नियतकालिक संग्रह विकास संद्यस्थिती, विविध विभागाची माहिती चिकित्सकपणे अभ्यास करण्यात आली. नियतकालिकाचे प्रकार, निवड, सेवा, इंटरनेट द्वारे नियतकालिक सेवा या बाबीचा संशोधकाने प्रामुख्याने मांडल्या आहे. तर अभियांत्रिकी ग्रंथालयात नियतकालिके खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. (६)

७) मिसाळ , रंजना महादेव–२०१२.

यांनी लिहिलेल्या आपल्या प्रबंधामध्ये ''पुणे (वडगाव बु॥) येथील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या सिंहगड कॅालेज ऑफ इंजिनियरींग महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकासाचा अभ्यास.''नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर केलेला आहे.

या प्रकल्पामध्ये इंजिनियरींग कॉलेज मधील ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रह विकासाचा अभ्यास केलेला आहे. त्याच्या संशोधन प्रकल्पाचा अभ्यास करतांनी एक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह कशा प्रकारे विकसित केलेला आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासवरुन असा निष्कर्ष निघतो की वर्षातून ग्रंथ संग्रहात किती प्रमाणात वाढ केली जाते व माहिती तंत्र ज्ञानावर आधारीत माहिती विद्यार्थ्यांना किती प्रमाणात देण्यात येते. या गोष्टीचा संशोधकाने अभ्यासात मांडले आहे. (७)

८) नातू,एस.आर.–१९८१.

यांनी लिहिलेल्या "Juniour College Library Collection" या शोध निबंधामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील आवश्यक ग्रंथसंग्रहा बाबत माहिती देण्यात आली आहे.

यामध्ये प्रामुख्याने पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ, साहित्यावरील माहिती व व्यावसायिक मार्गदर्शन करणारे साहित्य इ. प्रकारचे वाचन साहित्य असे सुचविले आहे हे सुचवित असतांना महाविद्यालयातील ग्रंथालयात आवश्यक ते व अद्ययावत माहिती जर ग्रंथालयातफ वाचकांना साहित्य स्वरुपात पुरविण्यासाठी नियतकालिकाची निवड करुन नियत कालिके वाचकांसाठी ग्रंथालयात उपलब्ध कशा प्रकारे पध्दतीने करुन देता येतील हे शोध निबंधातून संशोधकाने उत्कृष्ट पध्दतीत मांडले आहे. (८)

९) कांबळे, दयानंद फलचंद–२००४.

यांनी लिहिलेल्या '' भारती विद्यापीठाच्या एरंडवणे शैक्षणिक परिसरातील सद्य विविध महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह विकास हा एक अभ्यास '' हा प्रबंध नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठास सादर केला आहे. या प्रबंधामध्ये त्यांनी ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह विकास करण्यासाठी कोणकोणत्या आवश्यक साधने आहेत. याची माहिती व वाचकांच्या गरजाचा विचार करुन वाचनसाहित्य संग्रहाचे नियोजन व्यावस्थापन केल्यास चांगला वाचन साहित्य संग्रह विकसित होऊ शकतो. असे मत मांडले आहे. (९)

१०) कुलकर्णी व.वि.–१९७४.

यांनी लिहिलेल्या 'ग्रंथालय प्रशासन' या ग्रंथात ग्रथोपार्जन विभाग यामध्ये ग्रंथ निवड विभाग प्रमुखाची जबाबदारी व कार्यात, अपेक्षित गुग, ग्रंथोपार्जनाचे धोरण, वाचकांच्या गरजा कळण्याचे मार्ग, संग्रहाची काही वैशिष्टये, ग्रंथनिवड समिती, ग्रंथ निवडीची कार्यपध्दती या बदल माहिती दिलेली आहे.

ग्रंथ खरेदी बाबत जबाबदारी प्रश्न, करार, समस्या, भारतातील ग्रंथ खरेदी करण्याबाबतच्या अडचणी, कामाचे स्वरुप, ग्रंथविक्रेत्याची निवड करणे, ग्रंथखरेदोच्या अटी ठरविणे, तोच ग्रंथ पुन्हा घेतला जाऊ नये म्हणून तपासणी करणे, घेण्याजोग्या ग्रंथाची यादी करणे, दुर्मिळ ग्रंथाची खरेदी करणे, आवश्यक कामाचे नित्यक्रम ठरविणे, मागविलेला ग्रंथ मिळाल्यानंतरचा नित्यक्रम ठरविते ही वाचन साहित्य संग्रहाचे व्यावस्थापन, विकास, नियोजन करण्याची उपयुक्त माहिती दिलेली आहे. (१०)

११) पाटील, सी. श्री.–२००३.

यांनी लिहिलेल्या 'वाचन साहित्य रद्दबातल धोरण' या वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणावर चर्चा व मार्गदर्शन करणाऱ्या महाराष्ट्रातील पहिल्या पुस्तकात वाचन साहित्य रद्दबातल धोरण, अर्थ, गरज व हेतु याची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

त्याच प्रमाणे ग्रंथालयात घेतले जाणारे वाचन साहित्य रद्दबातल करावयाचे वाचनसाहित्य, वाचनसाहित्य रद्दबातल कार्यातील अडचणी व उपाय याची देखील सखोल माहिती दिलेली आहे. वाचन साहित्य, रद्दबातल करण्यासबंधी मार्गदर्शन तत्वे, तसेच शेवटी सर्व ग्रंथपालांना वाचनसाहित्य रद्दबातल धोरणाबाबत तज्ञांची मते व सरकारी स्वायत्त संस्थाची मार्गदर्शक सुत्रे, शेवटी सर्व विद्यापीठाचे आदेश, शासकीय निर्णय दिलेले आहे. (११)

१२) पडाडे, दिनकर मुंकूद–१९९३.

यांनी लिहिलेल्या 'व्यावहारीक आयुर्वेदाचा इतिहास' या ग्रंथात आयुर्वेदाचा उदय कसा झाला. त्याचा वैदिक वाङःमयापासूनचा इतिहास आहे. आयुर्वेदाचे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आयुर्वेदाची प्रगती, नियतकालिकाचे आयुर्वेदामधील महत्व व उपयोग विकास कसा होत गेला या विषयी महत्वपुर्ण माहिती दिलेली आहे. (१२)

१३) कुंभार, राजेंद्र–१९९४.

यांनी लिहिलेल्या 'ग्रंथालय व्यावस्थापन, वाचन साहित्य, संग्रहाचा विकास.' या ग्रंथामध्ये वाचनसाहित्य संग्रहाचा विकास या ग्रंथामध्ये वाचन साहित्य संग्रहाचा विकास कोणत्या प्रकारे होऊ शकेल त्याची व्यवस्थापन या विषयी माहिती दिली आहे. लेखकाने वाचन साहित्य संग्रह समतोल आणि अद्ययावत ठेवणे, उपार्जित करणे , वाचन साहित्याचे विविध प्रकार, वैशिष्टे त्याचप्रमाणे वाचन साहित्य निवड, खरेदी उपार्जन इ. येणाऱ्या अडचणीचे व विविध उपार्जन पध्दतीने सविस्तर विवरण यात केलेले आहे.

नियतकालिकांच्या उपार्जनासाठी वेगळी पध्दत त्याबाबत येणाऱ्या अडचणी सविस्तर चर्चा या ग्रंथात आहेत. (१३)

१४) आहेर, हिरा– १९८०.

यांनी लिहलेल्या 'उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक' या ग्रंथामध्ये शिक्षणाचा अर्थ, शिक्षणाची उद्दिष्टे, राष्ट्रीय शिक्षणाची भुमीका, भारतीय समाजाचे शिक्षणाचे सिहावलोकन इ. विषयाची सखोल चर्चा व माहिती दिलेली आहे. (१४)

१५) श्रीधर, एम.एस. :–

"Problems of Collection Development in Special Libraries". या ग्रंथाचे लेखन करतांनी Content च्या Aritical मध्ये चांगल्या पध्दतीने मांडणी आहे. त्या ग्रंथात एकुण १० Content दिलेले आहे.

ग्रंथ निवड करण्याची प्रक्रिया आणि नियतकालिक निवड करतांना घेण्यात येणाऱ्या काळजी अत्यंत चांगल्या पध्दतीने आणि सुरेख शब्दात लेखकाने केलेली आहे. (१५)

१६) Rahjit Kumar-२०११.

यांनी लिहिलेल्या 'Research Methodology a step by step quick for beginner' या ग्रंथामध्ये ३ स्टेप मध्ये Content a selecting method of data collection data using attitudinal seales हा संग्रह विकास करताना निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली या पध्दतीचा वापर करुन वाचन साहित्य विषयी वाचकांच्या गरजांचा विचार करुन संग्रह विकास करावा असे सुचविले आहे. (१६)

१७) **Sexsena, R. S.-१९८९.**

यांनी लिहिलेल्या ''Academic and special Libraries" या ग्रंथामध्ये एकुण १९ कॅन्टेंन्ट आहेत आणि यामधील कॅन्टेंन्ट नंबर २ मध्ये 'Ethics of Collection development in university Libraries' Content title दिलेले आहे. यामध्ये संग्रह विकासाची तत्वे सांगितली आहेत. ग्रंथपालन व्यावसायासाठी अशी पूरक संग्रहण साठवण, पाठवणे या तीन ही प्रक्रिया व्यवस्थित सांगितल्या आहेत. त्यांना या बदलाचे ज्ञान चांगल्या प्रकारे लेखन केलेले आहे. कमीत कमी वेळात वाचकांना ग्रंथ उपलब्ध करुन दिला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणजेच प्रक्रियासाठी सुध्दा जास्त वेळ जाता कामा नय या पुस्तकाचे प्रकाशन Yogehdra kumar jaihy,k. publishers. 8- poransuram magor shahgalh, agra up thdia. 1989. (१७)

१८) **Rama, devi Tella, 2006**.

यांनी लिहिलेल्या 'Access and use of gorey literature in special science problem are prosperut' या ग्रंथामध्ये personal collection development हा content दिलेला आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, यामध्ये प्रत्येक संशोधकाला संशोधन कार्य करण्यासाठी वेळोवेळी त्यांना पुर्ण माहिती घेतली पाहिजे, म्हणजे त्यांला त्याच्या विषयाचे ज्ञान येते असे मत मांडले आहे. (१८)

१९) महाजन, शा. ग. – २०११

यांनी लिहिलेल्या 'Loss of Books in Libraries' या ग्रंथामध्ये ग्रंथालयाचे कार्य, पुस्तके हरवु नयेत यासाठी उपाय, खबरदारी घेणे, कोणते ग्रंथ हरवतील, वाचकांना मार्गदर्शन, ग्रंथालय सेवकाची जबाबदारी, ग्रंथमोजणी, युजीसी नियम व शासकिय आदेश, गहाळ ग्रंथाची किंमत वसुल करणे इत्यादी प्रश्नांची सांगोपान चर्चा (सरकारी परिपत्रकासह). महाराष्ट्र शासन परिपत्रक, पुणे विद्यापीठ परिपत्रक, भारत सरकार परिपत्रक, त्याच प्रमाणे ग्रंथ पडताळणी या विषयी संखोल माहिती दिलेली आहे. (१९)

२०) Information studies :-

Klalia Paramjeet and Gupta Monica यांनी लिहिलेल्या "Collection Development in Delhi public library system in India-A case study" या प्रबंधामध्ये वाचन साहित्य विकास करताना प्रत्येक सोसायटीचा विचार करत संग्रह विकास केला पाहिजे. त्यांच्या मध्ये जात, धर्म, वय आणि भाषा या सर्वाचा विचार करून संग्रह विकास केला पाहिजे असे त्याचे म्हणणे आहे. त्यांनी दिलेल्या पब्लिक लायब्ररी चे उदाहरण दिले आहे की, ज्या लायब्ररी मध्ये वाचकांच्या गरजानुसार वेळोवेळी बदल केले गेले आहे, असे सुचविले आहे एकूण वाचन साहित्य संग्रह विकास धोरण लिखित स्वरुपात तयार करणे गरजेचे आहे. (२०)

२१) **Indian Streams Research Journal – August 2011**

vol–I, Issue V–library Science या मासिकामध्ये "classification schemes in ayueved college Libraries in Maharashtra : A study" या आर्टीकल चे लेखन Jamdade Mohan Laxman, Jamdade Pramila Mohan, Pahage Bhausaheb Murlidhar यांनी महाराष्ट्रातील आयुर्वेद कॉलेजच्या ग्रंथालयात वर्गीकरण योजनाचा अभ्यास करत असतांनी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. 1) Facted Classification, 2) Universal Decimal Classsification, 3) Colon Classification यांची आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालय सद्यस्थिती चे वर्णन सांगितले आहे.

या आर्टिकल मध्ये लेखकास अभ्यास करतानां असे निरीक्षण केले की, ४३ आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयापैकी ३० (६९.७७ %) ग्रंथालयात कोणत्या ही प्रकारे वर्गीकरण पद्धती ग्रंथाचे वर्गीकरण करण्यास वापरत नाही. त्यापैकी १३ आयुर्वेद कॉलेजच्या ग्रंथालयात वर्गीकरण पध्दतीचा वापर केलेला आहे. १२ ग्रंथालयात Dewey Decimal classification या वर्गीकरण पध्दतीचा वापर करतात ग्रंथालयात colon clssification पध्दतीचा वापर करतात.

या लेखात शेवटी लेखकाने आयुर्वेद महाविद्यालयाच्या नवीन वर्गीकरण पध्दती विकसित करून ग्रंथालयाचे वर्गीकरण करावे अशी शिफारस केलेली आहे. (२१)

२२) **महाजन, शा. ग.–२००४.**

यांनी लिहिलेल्या ''पुणे शहराचा ज्ञानकोश खंड–१'' या ग्रंथामध्ये पुणे शहराविषयी भौगोलिक , सांस्कृतिक, राजकीय इत्यादी पुणे शहराची सखोल माहिती दिलेली आहे. पुणे शहराविषयी विकासाचा आढावा सध्याचे पुणे इ. माहिती देण्यात आलेली आहे. (२२)

२३) **Library Trender**

"Library Desing from Past to Present" Auttort Alistain Black and Nen Dahililel Issue Editiors. यामध्ये त्यांनी एक Articalti दिलेले आहे. त्या Article Title आहे "Collection to Connections Choosing Spaces and new choblenges in Academic library building" या title चे लेखक Karen Latimar यांनी लिहिलेले आहे. यामध्ये ऐतिहसिक पार्श्वभूमी घेऊन साहित्य संग्रह विकास केला पाहिजे असे त्यांनी सुचविले आहे आणि वाचकांच्या गरजांचा विचार करुन त्या पध्दतीने त्यांची समस्या सोडवण्यासाठी त्यांना मदत केली पाहिजे. नवीन प्रवाह याचा उल्लेख केलेला आणि त्या पध्दतीने साहित्य संग्रह विकास केला पाहिजे. (२३)

२४) **World Digital Libraries, An International** Journal, Vol-1 Issue-2 December 2010, या जर्नलमध्ये Project Noming what it is good digital collection असे Article चे title आहे. या Article चे लेखक cobi Faleconer असे आहेत.

सध्याच्या काळामध्ये अंकीय साहित्य संग्रह खुप प्रमाणात उपलब्ध होत आहे. याचे जतन करणे, वाचकांना उपलब्ध करुन देणे, या आर्टीकल मध्ये खुप चांगल्या प्रमाणात माहिती दिलेले आहे. आजच्या काळात वेबसाईटवर सुद्धा मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. साहित्य विशिष्ट फांरमॅटमध्ये जतन केलेले आहे आणि फोटोच्या स्वरुपात माहिती येते. माहिती वाचकांसाठी महत्वाची आहे. (२४)

२५) Goverment of India, Ayush in India, 2003 New Delhi.

यांनी प्रकाशित केलेल्या माहिती पुस्तकामध्ये सर्व भारतातील आयुर्वेद महाविद्यालयाची सखोल माहिती, विद्यार्थी संख्या व आवश्यक बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. सांख्यिकी माहिती सदर पुस्तकामध्ये चांगल्या पद्धतीने मांडण्यात आली आहे. (२५)

२६) **www.muhs.ac.in**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी प्रकाशित केलेल्या इंटरनेटच्या वेबसाईटवर विद्यापीठ व महाविद्यालयाच्या सबंधी खुप महत्व पुर्ण माहिती दिलेली आहे. उदा. महाविद्यालयाची यादी, फोटो, सांख्यिकी माहिती डीजीटल लायब्ररी पुस्तक पेढी योजना, डीजीटल लायब्ररीतील ग्रंथ, जर्नल डिजीटल स्वरूपात इत्यादीची अध्ययावत माहिती देण्यात आलेली आहे. [२६]

२७) **ढाणे, सुधीर–२००८.**

यांनी प्रकाशित केलेल्या 'सत्यशोधक समाज मासिक', अकोला, वर्ष ८ वे आवृत्ती २ री २४ डिसेंबर २००८ या मासिकामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र व सेंट्रल कॅान्सिल ऑफ इंडियन मेडिसीन चिकित्सा प्रणालीच्या (आयुर्वेद, युनानी, सिद्ध) डॉक्टरांना ॲलोपॅथी, औषधे वापरण्यात परवानगी देण्याचा अधिकार सबंधीत राज्य शासनास असल्याचा महत्वपुर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्याचप्रमाण याच पध्दतीचा निकाल सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया यांनी देखील दिल्याचे पत्र छापण्यात आलेले आहे. [२७]

२८) **www.ccimindia.org.in**

या सेट्रॅल कॅान्सिल ऑफ इंडियन मेडिसीनच्या वेबसाईटवर भारतातील आयुर्वेद, युनानी होमोपॅथी, मेडिकल, डेंटल, नर्सिंग या सर्व आरोग्य पॅथीची सखोल व अध्ययावत माहिती मिळ्ते. भारतातील सर्व आयुर्वेद महाविद्यालयाची यादी, विद्यार्थी संख्या सर्व महाविद्यालयाचे फोन नंबर पत्ता, फंक्स नंबर इत्यादी माहिती देण्यात आली आहे. [२८]

२९) रिसवडकर, म. रा.– २००५.

यांनी लिहिलेल्या ''माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण'' नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथामध्ये सशोधनासाठी माहिती संकलित कशा प्रकारे करावी माहिती संकलनाची साधने आणि तंत्रे, प्रश्नावली मुलाखत निरीक्षण ही संकलनाची तंत्रे आणि नमुना निवड यांची मार्गदर्शन मिळते. तसेच संशोधनातील अनुमान किंवा अंदाज कसा बांधावा व निष्कर्ष कसा काढावा या बाबत सखोल माहिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आकृत्या, तक्ते, संख्या, आलेख, छायाचित्रांचा वापर निष्कर्षाची मांडणी, परिशिष्ट, सारांश याची चर्चा केली आहे. (२९)

३०) महाजन, शा. ग.–२०१३.

यांनी लिहिलेल्या ''हसत खेळत एफ. फिल करा'' पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथालयाचे एम.फिल सर्वसाधारण माहिती , पुर्वतयारी, शिक्षणक्रम, संशोधन अहवाल, संशोधन अहवाल आशय, सर्व प्रकरणाची सविस्तर माहिती साहित्य शोध, संशोधन पध्दती आणि तथ्य संकलन, लेखन पध्दती, टंकलेखन, प्रक्रिया, कृती नियोजन आणि प्रत्यक्ष कार्य, चर्चा, सारांश संदर्भ साधने माहिती इत्यादी सविस्तर माहिती याची चर्चा केली आहे. (३०)

प्रकरण तिसरे

टिपा संदर्भसुची

१) Raut, Pratibha (2008) Collection Development and services of Governent College libraries in Mumbai City and Suburbah, Pune Tilak Maharashtra Vidyapeeth.

२) नागरे, शिवाजी ज्ञानदेव (२००४) ''पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाचा अभ्यास'' यशवंतराव चव्हाण माहराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक : २००४.

३) चव्हाण, माया रमेश–''पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाच्या वाचकांना मिळणाऱ्या सेवांचा अभ्यास'', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ : नाशिक.

४) चोपडे, संदिप उत्तम (२००६) ''आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात माहिती साधन म्हणून होत असलेल्या नियतकालिकांचा उपयोग'', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक .

५) टेकाळे, दत्तात्रय रंगनाथ (२०१३) ''सिंहगड टेनिक्ल एज्युकेशन संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास'' टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे .

६) भालेराव, अरूण ल.–''पुणे शहर व संलग्न परिसरातील गेल्या दहा वर्षात नव्याने स्थापन झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील नियतकालिक संग्रह विकास धोरण, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ : पुणे.

७) मिसाळ, रंजना महादेव (२०१२)''पुणे (वडगाव बु॥) येथील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिररींग महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकासाचा अभ्यास'' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

८) नातू, एस. आर. (१९८१) ''Juniour College Library Collection'' शोध निबंध.

९) कांबळे, दयानद फलचंद (२००४) ''भारती विद्यापीठाच्या एंरडवणे शैक्षणिक परिसरातील सद्य विविध महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह विकास हा एक अभ्यास'', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

१०) कुलकर्णी, व. वि. (२००४) ग्रंथालय प्रशासन, नागपुर : सुविचार प्रकाशन मंडळ.

११) पाटील, सी. श्री. (२००३) वाचन साहित्य रद्दबातल धोरण, देवगड : पाटील छाया सिताराम, आ. १ ली.

१२) पडाडे, दिनकर मुकुंद (१९९३) व्यावहारिक आयुर्वेदाचा इतिहास, भाडगाव (वर्धा) : व्यावहारिक प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

१३) कुंभार, राजेंद्र (१९९४) ग्रंथालय व्यावस्थापन, वाचन साहित्य संग्रह विकास, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, आ. १ ली.

१४) ओहर, हिरा–उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षण, नागपुर : विद्या प्रकाशन.

१५) Shridhar, M. S. "Problems of Collection Development in Special Libraries"

१६) Rahjit Kumar (2011) "Rearch Methodology a step by step quick for beginner".

१७) Sexeha, R. S. (1889) "Academic and special Libraries" Yogendra Kumar Jaihy, K. Publishers & Poramsuram Magar Shangalah, Agra up India.

१८) Rama, devi Tella (2006) -Access and use of gorey literature in special seinence problem are prosperat.

१९) महाजन, शा. ग. (२०११) ग्रंथालयातून गहाळ होणारी पुस्तके, आ. १ ली, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

२०) Information Studies, Klalta Parhmjeet and Gupta. Monica Collection Development in Delhi Public Library System in India-A Case Study"

२१) Jamadade, Mohan & Panage Bhausaheb, (2011 August) Indian Streams Research Jourhal, Vol-I, Issue V. T. Library Seience"

२२) महाजन, शा. ग. (२००४) पुणे शहराचा ज्ञानकोश खंड–१, आ. २ री : ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे.

२३) Kaen Latimar editor by Auttort Alistain Block and Nen Dahiliel-library Desing from past to present : Collection to Connection chcosing spaces and New Choblenges In Academic library building"

२४) Cobi, Faleconer (2010) world Digital Libraries An International Journal, Vol1, Issue 2, December 2010 : Project Nomining what it is good digital Collection"

२५) Government of India (2004) Ayush in India, 2003. New Delhi : Government of India Press, P-272.

२६) www.muhs.ac.in website Maharashtra Univeristy Health Scienc.Nasik.

२७) ठाणे, सुधीर (२००८) सत्यशोधक समाज पाझिक, अकोला : वर्ष ८ वे, अंक २ रा, २४ डिसेंबर २००८.

२८) www.ccimindia.org.in: website of Central Council of Indian Medicine, New Delhi.

२९) रिसवडकर, म. रा. (२००५) माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण नाशिक: यशवतंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आ. १ ली. पृ ७६.

३०) महाजन, शा. ग. (२०१३) हसत खेळत एम. फिल. पुणे : युनिव्हर्सल आ. १ ली, पृ. १६४.

प्रकरण चौथे

वाचन साहित्य धोरणा विषयी माहिती

४.१ प्रस्तावना :–

अद्याप आपनाकडे बहुतेकांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ६०–७० वर्षापुर्वीचाच आहे. आजच्या काळात सर्वच ग्रंथालयामध्ये तातडीने विविधंती सुधारणा घड्वून आणणे अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानाचा प्रसार झपाट्याने होत आहे. रोज नवीन नविन ज्ञानशाखा निघत आहेत. त्यांची वाटचाल स्थूलाकडून सुक्ष्माकडे व परस्पर संबधांकडे झपाट्याने चालु आहे. वाचन साहित्याचे उपार्जन, त्याचे संकलन, संग्रहन, जतन व वितरण ह्या सर्व प्रक्रियांना महत्व येत चालले आहे. वाढत्या व्यापामुळे जागेचाही प्रश्न निर्माण होत चालला आहे. या वस्तुस्थितीची जाणिव असूनही याचा कोणी गांभीर्याने विचार केलेला दिसत नाही.

वाचन साहित्य अध्ययावत ठेवण्यासाठी ज्ञान साहित्य संग्रह विकास करण्यासाठी व वाचन साहित्याचा प्रभावीपणे उपयोग होण्यासाठी अनावश्यक वाचन साहित्य रद्दबातल केले जाते. त्यात सुसूत्रता येण्यासाठी रद्दबातल प्रक्रिया लिखित स्वरुपात केली जाने आवश्यक आहे. ज्ञान साहित्य साठा अद्ययावत ठेवण्याच्या हेतुने व नवीन वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाच्या हेतुने अनाश्यक व निरोपयोगी वाचन साहित्य ग्रंथालयातुन काढुन टाकणे योग्य असते.

ग्रंथालयाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी वाचन साहित्य विकास धोरण राबविणे आवश्यक आहे. विशिष्ट ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी निश्चित केलेला कृती कार्यक्रम म्हणजेच 'वाचन साहित्य संग्रह विकास धोरण' होय. मात्र हे ग्रंथालय समितीने मान्य केलेले व लिखित स्वरुपातील असले पाहिजे.

'वाचन साहित्य विकास धोरण' लिखित स्वरुपात असल्यास त्यात लहरीपणा व एककल्लीपणा येत नाही. त्याचा गैर फायदाही घेता येत नाही. वाचन साहित्य संग्रह विकास धोरण ठरविताना वाचन साहित्य एक महत्वाचा घटक आहे. वाचकांची गरज पुर्ण करणारे वाचन साहित्य असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे मातृसंस्थेची ध्येय धोरणे विचारात घेणे आवश्यक असते. व निरोपयोगी वाचन साहित्य रद्दबातल करण्यासाठी योग्य धोरणाची आवश्यकता असते.

४.२ वैद्यकीय शिक्षण विभागाचे धोरण :–

वाचन साहित्य संग्रह विकास करण्यासाठी सी.सी.आय.एम. मान्यता अभ्यासक क्रमासाठी लागणारी व अभ्यास क्रमाची मान्यता असलेल्या पुस्तकांची ग्रंथालयात संग्रह करण्यात यावे. व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या अभ्यास क्रमामध्ये ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, चार्ट, यांना अभ्यास क्रमासाठी उपयुक्त व मान्यता दिलेली असते. अशा सर्व वाचन साहित्य सर्व आयुर्वेद महाविद्यालयातील वाचक, विद्यार्थी, अध्यापक यांना अभ्यासासाठी उपलब्ध करुन देणे हेच वैद्यकीय शिक्षण विभागाचे वाचन साहित्य विकास धोरण म्हणता येईल.

४.३ ग्रंथोपार्जन धोरण :–

ग्रंथोपार्जन धोरणामुळे ग्रंथ निवड धोरण ग्रंथ मिळवण्याचे धोरण नियतकालिकांच्या वर्गणीचे धोरण इ. असावेत. प्रत्येक ग्रंथालयाचे लिखित स्वरुपात उपार्जनाचे धोरण असावे त्यामुळे वाचन साहित्य मिळवण्याचा सतत प्रयत्न केला जातो. आर्थिक वर्षाच्या अखेरीस घाई घाईने ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथजत्रा इ. माध्यमातून वाचनसाहित्य निवड करणे टाळावे. वाचकांच्या गरजा पालक संस्थेची उद्दिष्टे आणि आर्थिक तरतूद हया सर्वांचा समन्वय साधून उत्कृष्ट वाचन साहित्य निवडावे. (१)

४.४ वाचन साहित्य संग्रह विकास :–

वाचन साहित्य संग्रहाचे मुल्यमापन करतांना वाचन साहित्याची गुणवत्ता (Quality) विचारात न घेता संख्या (Quantity) विचारात घेतली जाते. अलीकडे वाचकांना व त्यांच्या गरजांना असण्यापेक्षा वाचकांच्या गरजांची पुर्वता करणारा ग्रंथ संग्रह असावा असा मत प्रवाह सध्या दृढ होत आहे. यातून वाचन साहित्य विकासाची संकल्पना पुढे आली.

Glossary of Herold (7 th edi) या ग्रंथानुसार ग्रंथालयांचा हेतु साध्य करण्यासाठी सुसंगत आणि विश्वसनीय वाचन साहित्य उपार्जित करण्याची सतत चालणारी प्रर्किया म्हणजे वाचन साहित्य संग्रह विकास होय.''(२)

वाचन साहित्य संग्रहाचा विकास करताना सर्वसाधारण पणे

१) वाचन साहित्य एक महत्वाचा घटक आहे, कारण वाचन साहित्य शिवाय ग्रंथालय असणे शक्य नाही.

२) वाचकांची गरज पुर्ण करणारे वाचन साहित्य सर्वच ग्रंथालयांनी आपल्या प्रत्यक्ष व संभाव्य वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन वाचन साहित्य व त्यातील माहिती ही वाचकांची गरज पुर्ण करणारी अद्यावत व अधिकृत असावी.

३) मातृ संस्थेची ध्येय धोरणे : वाचन साहित्य संग्रहाचा विकास करतांना ग्रंथालयाची आपल्या मातृसंस्थेची ध्येय धोरणे विचारात घेतली पाहिजे. आर्थिक साधनाची तरतूद करण्यासाठी निश्चित मर्यादा घालून घेतली पाहिजे. त्यानुसार उपलब्ध होणारी रक्कम विचारात घेतली पाहिजे.

४) निरूपयोगी वाचन साहित्य : ग्रंथालयातील काही वाचन साहित्याची उपयुक्तता कालांतराने संपुष्टात येते. तर काही वाचन साहित्य वापरण्या योग्य राहत नाही. असे वाचन साहित्य रद्दबातल करावे लागते. अशा प्रकारचे वाचन साहित्य रद्दबातल करण्यासाठी योग्य धोरणाची आवश्यकता असते. (३)

वाचन साहित्य संग्रहाचा विकास करतांना या सर्व पाश्वभुमीचा विचार करावा लागतो.

४.५ वाचन साहित्य संग्रह विकासाचा हेतू :–

दिवसें दिवस ग्रंथालयाची संकल्पना बदलत चालली आहे. ग्रंथालय समृध्द करण्यासाठी ग्रंथ संपादन प्रक्रिया त्यांचे जतन व त्यांचे वाचकास वितरण ही पांरपारिक कार्यप्रणाली विस्तारित होउन माहिती संकलन व संपादन प्रक्रिया तिचे संचयन व योग्य प्रकारे जतन आणि विनाविलंब वितरण अशी प्रणाली परिस्थितीनुरुप ओघानेच पुढे येत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे ग्रंथालयाची व्याख्या विस्तारीत झाली आहे. थोडक्यात ग्रंथाची जागा विविध प्रकारची ज्ञान साधने घेत आहेत. (४)

वाचन साहित्य सग्रंह विकास प्रक्रियेमध्ये निवड व उपार्जन तसेच संग्रहातील वाचन साहित्याचे उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून मुल्यमापन करणे या कार्याचा समावेश होतो. संग्रह विकसित करतांना वाचन साहित्याची निवड विचारपुर्वक केली जाते. संग्रहातील वाचन साहित्यांचे नियमित मुल्यमापन केले जाते. जुने, अनावश्यक, असंबंधित वाचनसाहित्य संग्रहातून रद्दबातल केले जाते. नवीन वाचन साहित्य संग्रहाचा विकास करतांना वाचकांच्या गरजा विचारात घेऊनच निवड करुन वाचन साहित्य खरेदी केले जाते. वाचन साहित्य संग्रहाचा विकासाचा हेतु वाचनसाहित्याची गुणात्मक वाढ अभिप्रेत असते.

४.६ वाचनसाहित्य संग्रह विकासाची पार्श्वभूमी :–

''विशिष्ट ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी निश्चित केलेली कृती कार्यक्रम म्हणजेच वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण होय. अमेरीकन लायब्ररी असोसिएशनच्या वाचनसाहित्य संग्रह विकास समितीच्या धोरणानुसार वाचनसाहित्य संग्रह विकास धोरण लिखीत स्वरूपात असावे वाचन साहित्य संग्रह विकासा मागची पार्श्वभूमी खालील प्रमाणे.

१) वाचकांना उपयुक्त असे वाचनसाहित्य उपलब्ध करुन देणे.

२) उपलब्ध आर्थिक साधनांचा योग्य वापर करणे.

३) जुने, अनावश्यक वाचनसाहित्य संग्रहातून रद्दबातल करण्यासाठी वाचनसाहित्य संग्रहाचे नियमितपणे मुल्यमापन करणे.

४) वाचनसाहित्य संग्रह अद्ययावत ठेवणे.

५) संग्रहीत वाचन साहित्यावर आधारीत वाचकांना प्रभावी सेवा देणे.''(५)

४.७ वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण : –

'' विशिष्ट ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी निश्चित केलेली कृती कार्यक्रम म्हणजेच वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण होय. ग्रंथालयाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी वाचनसाहित्य विकास धोरण राबविणे आवश्यक आहे. ग्रंथालय समितीने मान्य केलेले व लिखित स्वरुपातील असले पाहिजे.''

त्यामुळे वाचन साहित्य निवड कार्यामध्ये सातत्य राखता येते, उत्तम वाचनसाहित्य संकलित करणे शक्य होते. तसेच उपलब्ध मंजूर रक्कमेचा योग्य वापर करणे शक्य होते. (Katz) आणि इतर लेखकांनी ही वाचनसाहित्य संग्रहाचा विकासाचे धोरण लिहित स्वरुपात असावे असे सांगितले आहे. फटास (Futas) यांच्या मतानुसार वाचन साहित्य संग्रह विकास धोरण लिखीत असल्यामुळे वाचनसाहित्य विकास कार्यामध्ये स्थेर्य आणि सातत्य येते. फग (Feng) यांच्या मतानुसार लिखित धोरणाच्या सहाय्याने समतोल वाचनसाहित्य संग्रह विकसित करता येतो.

वाचन साहित्य संग्रह धोरण ठरवितांना सर्व साधारण पणे आवश्यक बाबींचा विचार करावा लागेल.

१) वाचनसाहित्य एक महत्वाचा घटक आहे.

२) वाचकांची गरज पूर्ण करणारे वाचन साहित्य

३) मातृसंस्थेची ध्येय धोरणे विचारात घेतली पाहिजे.

४) निरूपयोगी किंवा अनावश्यक वाचनसाहित्य रद्दबातल करण्यासाठी योग्य धोरणांची आवश्यकता असते. (६)

४.८ वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचे फायदे : –

वाचन साहित्य संग्रह विकास धोरणाचे काट्झ, मॅगरील आणि हिकी या तज्ञांनी नमुद केलेले विविध फायदे सांगता येतील.

१) संस्थेची उद्दिष्टये आणि वाचन साहित्य संग्रह विकासाचे धोरणे यातील परस्पर संबंध स्पष्ट करता येतो.

२) वाचन साहित्य संग्रह, विकास कार्याचे नियोजन करण्यासाठी सहाय्यक ठरते.

३) व्यक्तिगत कल अथवा आवड निवड विचारात न घेता वाचनसाहित्याची निरपेक्षपणे निवड करण्यासाठी व्यवहार्य मार्गदर्शन प्राप्त होते.

४) वाचनसाहित्य उपार्जनाची सर्वोत्कृष्ट पध्दती निवडण्यासाठी मदत होते.

५) निवड केलेल्या संग्रहीत केलेल्या वाचन साहित्याची उपयोगिता सिध्द करुन त्याचे समर्थन करण्यास सहाय्यभूत ठरते.

६) ग्रंथालयासाठी मंजूर केलेल्या रक्कमेची विभागणी करण्यासाठी मार्गदर्शन करते. खर्चासंबंधीचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी मदत होती. वाचन साहित्य संग्रहाची वाढ आणि विकासाची दिशा निश्चित करुन दिर्घकालीन आर्थिक नियोजन करण्यास मदत होते.

७) उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी मदत होते.

८) अंतर ग्रंथालयीन देवघेव, इतर ग्रंथालयीन साधनसंपत्तीची देवघेव आणि ग्रंथालय जाळे यासारखे सहकाराचे उपक्रम राबविण्यास मदत होते.

९) वाचन साहित्य खरेदी करण्या पुर्वी त्यांचे परीक्षण, तपासणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असणारी पध्दती निश्चित करण्यासाठी वाचन साहित्य संग्रह विकास धोरण सहाय्यभुत ठरते.

१०) कोणते वाचन साहित्य संग्रहीत करावे आणि कोणते वाचन साहित्य ग्रंथालयातुन रद्दबातल करावे या बाबत मार्गदर्शन प्राप्त होते.

११) ग्रंथालयाचा गुणात्मक दर्जा वृध्दिगत करण्यास उपयुक्त ठरते. (७)

४.९ वाचन साहित्य संग्रहाची मार्गदर्शन तत्वे :–

ग्रंथालयाच्या विकासाची काही वाचन साहित्य संग्रह विकासाची मार्गदर्शन तत्वे आहेत.

१) वाचन साहित्य संग्रहाचे मुल्यमापन वाचन साहित्याची संख्या (Quantity) लक्षात न घेता त्याची गुणवत्ता (Quality) लक्षात घेतली पाहिजे.

२) वाचकांच्या गरजांची पूर्तता करणारा ग्रंथ संग्रह असावा.

३) वाचकांच्या गरजा जाणून घेण्यासाठी कायम स्वरुपाची यंत्रणा उभी करावी.

४) आवश्यक वाचनसाहित्य उपार्जित करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करावी.

५) वाचनसाहित्याची निवड करण्यासाठी तज्ञांचा व समिक्षकांचा आधार घ्यावा.

६) कालबाह्य व निरोपयोगी वाचनसाहित्य रद्दबातल करावे. (८)

वरील वाचन साहित्य संग्रह विकासाची आदर्श मार्गदर्शन तत्वे ग्रंथालयाच्या वाचनसाहित्याची वाढ, विकास करणे गरजेचे आहे.

४.१० वाचनसाहित्य संग्रह विकास ध्येय धोरणाचे घटक :–

वाचनसाहित्य संग्रह विकासाची ध्येय धोरणाचे महत्वाचे घटक आहेत.

१) मातृसंस्थेची ध्येय धोरणे.

२) वाचकांच्या गरजा.

३) साधनांची उपलब्धता.

४) वाचनसाहित्य निवड

५) वाचनसाहित्य वितरण.

६) ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवा.

७) पारंपारिक वाचन साहित्याचे भौतिक स्वरुप.

८) प्रतींची संख्या.

९) आर्थिक उपलब्धता.

१०) किंमत.

११) कॉपीराईट कायदा.

१२) प्रकाशक, वितरण/पुरवठादार.

१३) वाचनसाहित्याची अधिकृतता. (९)

४.११ वाचन साहित्य निवडीची तत्वे : –

वाचन साहित्य संग्रह विकासाचे धोरण ठरवितांना पुढील प्रकारचा वाचन साहित्य संग्रहित करण्यासाठी ग्रंथपालांची नेहमी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१) अध्ययन व संशोधनासाठी उपयुक्त असे वाचन साहित्य निवडणे.

२) विदेशी वाचनसाहित्य.

३) प्रचलित आणि जुने वाचनसाहित्य.

४) संशोधनासाठी उपयुक्त वाचनसाहित्य.

५) क्रमिक पुस्तके.

६) लाकप्रिय वाचनसहित्य.

७) दुर्मिळ वानचसाहित्य व हस्तलिखिते.

८) लोकसंस्कृती, इतिहास या संदर्भातील स्थानिक वाचन साहित्य.

९) मायक्रोफॉर्म्स व तत्सम स्वरुपातील वाचन साहित्य इ. स्त्रोत इत्यादी बाबत धोरण ठरवितांना विचार करणे आवश्यक आहे. (१०)

४.१२ वाचनसाहित्य विकास धोरणाचे घटक : –

१) ग्रंथालयाची उद्दिष्टे.

२) ग्रंथालयाचे तत्वज्ञान अथवा भूमिका.

३) ग्रंथालयाचा हेतु वाचक वर्गाचा आणि इतर उपभोक्त्यांचे प्रकार निश्चित करणे.

४) ग्रंथालयाच्या दैनंदिन कारभाराला कायदेशीररीत्या कोण जबाबदार आहे.

५) ग्रंथ निवडीच्या पध्दती, त्यासाठी निधीचे वाटप वाचकवर्गाचे वयोगटानुसार वर्गीकरण आणि इतर माहिती.

६) ग्रंथ निवडी बाबत कायदेशीररित्या कोन जबाबदार आहे.

७) वाचनसाहित्य कोणत्या भाषेतील असावा? कोणत्या भूप्रदेशाविषयीचे वाचनसहित्य असावेत ? कोणत्या काळातील असावे ? त्याचे वाड:मयीन स्वरुप कसे असावे ? काव्य, नाटक, कथा, गद्य,कांदबरी, आयुर्वेदिक, आधुनिक इ.

८) देणगी दाखल आलेल्या वाचन साहित्याचे काय करायचे याचा स्पष्ट निर्देश करणे. जसे ग्रंथालयाला उपयुक्त असतील असेच वाचन साहित्य संग्रहीत करण्यात येतात. उपयोगी नसलेली दुसऱ्या ग्रंथालयात देणगी देण्यात यावेत.

९) वाचनसाहित्य रद्दबातल करण्याविषयीचे धोरण आणि कार्यपध्दती सांगण्यात येईल.

१०) बौध्दिक स्वातंत्र्य ग्रंथ निवड राहिल. या बाबतचे विधान वाचनसाहित्य विकास धोरण तयार करताना वरील मुद्यांचा समावेश असावा. (११)

४.१३ वाचनसाहित्य विकसीत करतांना लक्ष दिलेल्या बाबी : –

वाचनसाहित्य विकसीत करतांना ग्रंथालयानी प्रामुख्याने खालील बाबीकडे लक्ष देणे अपेक्षीत असते.

१) ग्रंथालयाचा प्रकार.

२) ग्रंथालय अधिकारी.

३) सद्यस्थितील वाचनसाहित्य संग्रह.

४) मनुष्यबल व्यावस्थापन.

५) अर्थपुरवठा.

६) वाचक वर्ग.

७) वाचनसाहित्य उपार्जन धारण.

८) वाचनसाहित्य संग्रह मूल्यमापन.

९) वाचनसाहित्य व्यापार.

१०) ग्रंथालय सहकार.

११) माहिती तंत्रज्ञान.

१२) नेटवर्क.

१३) रिसोर्स शेअरिंग.

१४) व्यापारी संघ.

१५) राष्ट्रीय ग्रंथालय धोरण.

१६) ग्रंथपालाची वैचारिक प्रगल्भता /भूमिका. (१२)

४.१४ वाचनसाहित्य रद्दबातल करण्यासंबंधी धोरण : –

''ग्रंथसंग्रह अद्ययावत ठेवण्यासाठी ज्ञानसाहित्य संग्रह विकास करण्यासाठी व वाचनसाहित्याचा प्रभावीपणे उपयोग होण्यासाठी अनावश्यक वाचनसाहित्य ग्रंथालयातून रद्दबातल केले जाते. त्यात सुसूत्रता येण्यासाठी रद्दबातल प्रक्रिया लिखित स्वरुपात केली जाणे आवश्यक आहे. यासाठी पहिली पायरी म्हणजे वाचनसाहित्य रद्दबातल धोरण होय.''

वाचन साहित्य रद्दबातल धोरणात खालील बाबींचा समावेश होतो.

१) धोरणाबाबत निवेदन.

२) ग्रंथालयातील कोणते वाचनसाहित्य रद्दबातल करावे.

३) ते केव्हा रद्दबातल करावे.

४) ते कोणी रद्दबातल करावे.

५) रद्द बातल करण्याची प्रक्रिया काय असेल.

६) रद्दबातल केल्यानतर त्या साहित्याचे काय करावे.

७) ग्रंथालयानी त्यांच्या नोंदी कशा ठेवाव्यात. (१३)

४.१५ रद्दबातल कार्यातील अडचणी : –

ग्रंथालयातील वाचनासाहित्य अद्ययावत ठेवण्यासाठी त्यातील निरुपयोगी वाचनसाहित्य नियमितपणे रद्दबातल करणे आवश्यक आहे याबद्दल दुमत नाही. वस्तुरुपाने अस्तित्वात आलेल्या अशा वाचनसाहित्याबाबत रद्दबातल करण्यासाठी निकष लावण्याची वेळ आलेली आहे.

वाचनसाहित्याच्या प्रकारानुसार त्याचे स्पष्टपणे आयुर्मान ठरविले पाहिजे. त्यामुळे सर्व प्रकारच्या व सर्व स्थरातील ग्रंथालयाचे रद्दबातल बाबतचे प्रश्न आपोआपच सुटतील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ग्रंथालय समितीने स्पष्टपणे म्हटले आहे, की बऱ्याचशा वाचनसाहित्याचे उपयोग मुल्य साधारण पणे २५ वर्षात नष्ट होते.

काही तज्ञांच्या मते चांगल्या कागदाची व चांगल्या बांधणीची पुस्तके सुमार २०० वेळा देवघेव करीपर्यंत टिकु शकतात. पुर्नबांधणी करुन वापरायचे म्हटले तरी अशी बांधणी जास्तीत जास्त दोन –तीनच वेळा करता येते. शिलाई टाक्यामुळे व पुन्हा त्याला आकार देण्यासाठी केलेल्या कटाईमुळे दोन तीन वेळा बांधणी केलेली पुस्तके नीट वाचताही येत नाही.

अशी वस्तुस्थिती असताना बहुताशी ग्रंथालय निरुपयोगी वाचनसाहित्य सुद्धा रद्दबातल करण्यास तयार नसतात. याला काही विद्यापीठ ग्रंथालये सुद्धा अपवाद नाही. ही प्रवृत्ती जगभर असली तरी आपल्या देशात त्याचेप्रमाणे जरा जास्तच आहे. त्याची कारणे पुढील म्हणता येतील.

वाचन साहित्य रद्दबातल न करण्यामागील अडचणी :–

१) वाचनसाहित्य संख्या कमी होण्याची भिती.

२) वाचनसाहित्य पावित्र्य.

३) क्रमिक/ पाठयपुस्तके पुन्हा अभ्यास क्रमाला लागण्याची भिती.

४) वाचकांची टीका.

५) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४.

६) महाराष्ट्र शासनाचे निर्णय.

७) हिशोब तपासणीसाचे भय.

८) कामाचा वाढता व्याप व रद्दबातल बाबत अज्ञान.

९) मुख्य कार्यालयाकडून योग्य निर्देशनाचा अभाव.

१०) सार्वजनिक ग्रंथालयाबाबत शासनाच्या अटी.

११) केंद्र सरकारच्या निर्णयांची अनभिज्ञता. (१४)

४.१६ रद्दबातल संबंधीची मार्गदर्शन तत्वे :–

''वाचनसाहित्य रद्दबातल करण्याची आवश्यकता वाटूनही व महत्व पटवूनही ग्रंथापालांना विविध कारणांमुळे वाचनसाहित्य रद्दबातल करण्याच्या कार्यात अडचणी निर्माण होत आहेत. या अडचणीत प्रामुख्याने वाचनसाहित्य कमी होणे, हिशेब तपासणीचे पर्यायाने मातृसंस्थेचे भय, व वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शनाचा व निर्देशनाचा अभाव, रद्दबातल बाबत अज्ञान इत्यादी कारणांचा समावेश होतो. मात्र वाचनसाहित्याचे महत्व टिकून राहण्यासाठी त्याचा प्रभावीपणे उपयोग होण्यासाठी त्याची उपयुक्तता दीर्घ काळ टिकण्यासाठी व नवीन नवीन ज्ञान उपर्जित करण्यासाठी वाचन साहित्य रद्दबातल धोरण ठरविणे व त्याची नियमित पणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.

याबाबत या क्षेत्रातील तज्ञांची मते व मार्गदर्शन फार मोलाचे आहे. त्याच प्रमाणे मातृसंस्थेच्या वरिष्ठ किंवा मुख्य कार्यालयाने वाचनसाहित्य रद्दबातल बाबत स्पष्टपणे निर्देश देऊन सबंधिताकडून त्याची अमंलबजावणी होत आहे की नाही हे पाहणे गरजेचे आहे. यामुळे ग्रंथपालाचे मनोधैर्य वाढवण्यास मदत होईल. तसेच वाचनसाहित्य रद्दबातल धोरणात सुसूत्रताही येईल. शिवाय ग्रंथालय खऱ्या अर्थाने अद्ययावत ठेवण्यास मदत होईल.

१) सुप्रसिद्ध ग्रंथालय शास्त्रज्ञ विलियम ए. काटझ म्हणतात.

''कोणत्याही वाचनसाहित्य संग्रहाची उपयुक्तता दीर्घकाळ टिकविण्यासाठी वाचनसाहित्य रद्दबातल करणे अत्यंत आवश्यक आहे.''

२) वाचनसाहित्य संग्रह अद्ययावत ठेवण्यासाठी कोणकोणते वाचनसाहित्य रद्दबातल करावे

याबाबत श्री. मिओनेल आर. मॅक्कोलवीन म्हणतात.

"Books which are shabby, dirty, no longer in use, no longer of appeal, are a libility when retained on the open selves. They create an impression of cut-of -dateness repel readers andivove unnecessary labour in keeping them in readers.''

३) नाशिक येथील हं. प्रा. ठा. महाविद्यालयातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील अधिव्याख्याता प्रा. राजेंद्र कुंभार म्हणतात.

''रद्दबातल कार्यात बऱ्याच अडचणी असल्या तरी ग्रंथपालाने निराश होऊ नये. वाचनसाहित्य रद्दबादलासंबंधीचे स्पष्ट, सुनियोजित व नि:पक्ष असे धोरण ठरवावे.

धोरणास ग्रंथालय समितीचे मान्यता घ्यावी व त्या धोरणानुसार वाचनसाहित्य रद्दबातल करावे. निश्चित धोरणानुसार वाचनसाहित्य रद्दबातल केले तर रद्दबादल कार्यामध्ये कोणत्याही अडचणी येत नाहीत.''

४) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ग्रंथालय समितीच्या विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालये या इ.स. १९६५ च्या अहवालात वाचनसाहित्य रद्दबातलाची आवश्यकता पुढील शब्दात स्पष्ट केली आहे.

''बऱ्याचशा वाचनसाहित्याचे उपयोग– मूल्या साधारणपणे २५ वर्षात नष्ट होते. एवढ्या काळामध्ये या वाचनसाहित्यातील आशय चुकीचे सिद्ध होण्याचीही शक्यता असते. असे कालबाह्य वाचन साहित्य ग्रंथालयात ठेवल्यामुळे ग्रंथालयाचा कोणताही हेतू साध्य होत नाही. उलट कपाटातील जागा मात्र अडवली जाते. म्हणून जुने अनावश्यक ग्रंथ नियमितपणे रद्दबातल करुन नवीन ग्रंथाना कपाटामध्ये जागा उपलब्ध करुन देणे हेच योग्य धोरण आहे.''

५) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने काढलेल्या शासन निर्णय क्रमांक म.आ.क्र. १०८८/प्र.क्र. ३० विनिमय मुंबई–३२ दिनांक २ डिसेंबर १९९१ च्या परिपत्रकामध्ये कलम ५.२ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे.

''कालबाह्य निरुपयोगी /खराब झालेली पुस्तके/ग्रंथ कार्यालयाचे (ग्रंथालयाचे) हित लक्षात घेऊन रद्दबातल करण्यासाठी ग्रंथालयाच्या नोंदीवरुन काढून टाकण्यासाठी किंवा अन्य तऱ्हेने विल्हेवाट लावण्यासाठी त्या–त्या शासकीय विभागातील/ कार्यालयातील तीन जबाबदार सभासदांची एक समिती नेमण्यात यावी. व सदर समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी. (परिशिष्ट क्र.८)''

६) भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे परिपत्रक क्र. No.F 23 (7) E II (A)/83 Dated 07/02/1984 मध्ये ग्रंथ रद्दबाबत खालीलप्रमाणे निर्देश दिलेली आहेत.

"Loss of three volumes per thousand volumes issued/consulted in a year may be taken as reasonable provided such loss cannot be attributed to dishonesty or negligence on the part of librarian... "

७) " Timeless Fellowship" मध्ये पृष्ठ क्र. ११९ वर स्पष्टपणे म्हटले आहे की,

" The loss of 2-3 books for every thousand books used or issued should be regarded as normal loss and should straight way be written off."

८) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई या विद्यापीठाने आपल्या विद्यापीठाच्या व आपल्या अखत्यारीतील महाविद्यालयासाठी कायम स्वरुपी ग्रंथालय साहित्य रद्दबातल धोरण सविस्तर ठरविले आहे. त्यात त्यांनी ग्रंथालय साहित्य रद्दबातल धोरणाची उद्दिष्टे, महत्व व मर्यादा रद्दबातल करावयाच्या साहित्याचे गट व रद्दबातल करण्याची पद्धत सविस्तर दिली आहे. त्या धोरणात सुरुवातीसच म्हटले आहे. "weeding is as important an activity as selection and acquisition since it helps to keep the collection fresh alive current and relevant ."

९) पुणे विद्यापीठाने आपल्या विद्यापीठाच्या अखत्यारीत संस्थांना व महाविद्यालयांना आपल्या परिपत्रक क्र. RC १११०३२ ता. २८ सप्टेंबर १९७२ नुसार खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"It becomes urgent and even necessary that Librarian should not be held reponsible for the normal loss of books."

१०) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादने आपल्या परिपत्रक क्र. MUL/3557-3647 ता. १५/१०/१९८२ द्वारे व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेडने आपल्या परिपत्रक क्र. SRTMUN/Lib १९९६-९७ /६७५-७८० ता. १५/१०/१९९६ द्वारे आपल्या विद्यापीठाशी संलग्न संस्थाना व महाविद्यालयांना खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"The Librarians should not held resposnible for the normal loos of book (one book to the issue of 500 books)"

वाचनसाहित्य रद्दबातल करण्याबाबतची तज्ञांची व स्वायत्तसंस्थांची वरील मते पाहता वाचनसाहित्य अद्ययावत ठेवण्यासाठी ज्ञानसंग्रह विकास करण्यासाठी व वाचनसाहित्याचा प्रभावीपणे उपयोग होण्यासाठी कालबाह्य अनावश्यक वाचनसाहित्य ग्रंथालयातून रद्दबातल करुन नवीन उपयोगी साहित्याला जागा करुन देणे किती आवश्यक आहे याची कल्पना येते.(१५)

४.१७ वाचनसाहित्य संग्रह संरक्षण, जतन :–

पारंपारिक ग्रंथालयातील वाचन साहित्य सुरक्षिततेच्या पध्दती आता कालानुरुप बदलल्या आहेत. पारंपारिक सुरक्षा व्यवस्थेत जास्त करुन छापील वाचन साहित्याच्या सुरक्षिततेवर भर होता. वाचन साहित्य संग्रहाचे संरक्षण व जतन करण्यासाठी पाऊस, ऊन, वारा, प्रकाश, धुळ, सुर्यप्रकाश, हवेतील आर्द्रता याच बरोबर कीटक, कसर, वाळवी, उंदीर आणि वाचकांच्या सवयी यासाठी अनेक प्रकल्प राबविले जातात. परंतू आता वाचन साहित्याचे स्वरुप छापील ते अंकीच अशा स्वरुपाकडे गेलेले आहे. त्यामुळे छापील व अंकीय स्वरुपाच्या वाचन साहित्याच्या सुरक्षिते बरोबर अंकीय स्वरुपातील माहितीची सुरक्षितताही महत्वाची ठरली आहे.

१) वाचकांना चुंबकीय परिचय पत्र दिले जाते आणि त्याचबरोबर वाचकाचे जैवमापन ज्यात हाताचा अंगठा किंवा डोळ्यांचे बुबुळ यातून वाचकांची ओळख प्रस्थापित होते.

२) ग्रंथालयाबाहेर अनाधिकृतरित्या वाचनसाहित्य नेण्याच्या प्रकारास आता आळा बसला आहे. रेडिओ फिक्वेन्सि आयडेंटीफिकेशन आर.एफ.आय.डी. दंडसंहितेपेक्षा प्रगत असलेल्या या तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयात होत आहे.

३) विद्युत पुरवठातील धोके.

४) सि.सि.टी.व्ही. च्या कक्षेत ग्रंथालयांना आणणे .

५) संगणक आता जाळ्यात वापरात अनेक अनावश्यक नको असलल्या आणि धोकादायक घटना होण्याचे प्रसंग येतात. ते टाळण्यासाठी आता फायरवॉल या सुरक्षा कवचाचा वापर केला जात आहे. (१६)

प्रकरण चौथे

टिपा संदर्भसुची

१) बुवा, जी. ए. ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावस्थापनाचे नवे प्रवाह: सावंतवाडी, श्री. साई प्रकाशन २००७ पृ. १७३

२) बुवा, जी. ए. ग्रंथालय व माहितीशास्त्र व्याव्स्थापनीय नवे प्रवाह: सावतवाडी, श्री. साई प्रकाशन, २००७ पृ. १६५

३) पाटील,. सी. श्री., वाचन साहित्य रद्दबातल धोरण: देवगड, सौ. छाया सीताराम पाटील, २००३ पृ. ६८,६९.

४) पाटील, सी. श्री. वाचन साहित्य रद्दबातल धोरण: देवगड, सौ. छाया सीताराम पाटील, २००३, पृ.१५.

५) बुवा, जी. ए., ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावस्थापनाचे नवे प्रवाह: सावतवाडी, श्री. साई प्रकाशन, २००७, पृ. १६५,१६६.

६) पाटील, सी. श्री. वाचन साहित्य रद्दबातल धोरण देवगड: सौ. छाया सीताराम पाटील, २००३, पृ. ६८,६९,७०.

७) बुवा, जी. ए., ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावस्थापनाचे नवे प्रवाह: सावतवाडी, श्री. साई प्रकाशन, २००७, पृ. १६६, १६७.

८) पाटील, सी. श्री. वाचन साहित्य रद्दबातल धोरण देवगड: सौ. छाया सीताराम पाटील, २००३, पृ. ७०.

९) बुवा, जी. ए., ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावस्थापनाचे नवे प्रवाह: सावतवाडी, श्री. साई प्रकाशन, २००७, पृ. १६७ ते १७२.

१०) बुवा, जी. ए. ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावस्थापनाचे नवे प्रवाह: सावंतवाडी श्री. साई प्रकाशन, २००७ , पृ. १६९–१७०.

११) महाजन, शा. ग. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयाचे व्यावस्थापन : पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन, २०१३, पृ. १८– १९.

१२) बुवा, जी. ए. ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावस्थापनाचे नवे प्रवाह : सावंतवाडी, श्री. साई प्रकाशन, २००७, पृ. १७२–१७५.

१३) पाटील, सी. श्री. वाचन साहित्य रद्दबातल धोरण: देवगड, सौ. छाया सीताराम पाटील, २००३, पृ. १४.

१४) पाटील, सी. श्री. वाचन साहित्य रद्दबातल धोरण: देवगड, सौ. छाया सीताराम पाटील, २००३, पृ. ३५–४५.

१५) पाटील, सी. श्री. वाचन साहित्य रद्दबातल धोरण: देवगड, सौ. छाया सीताराम पाटील, २००३ पृ. ७४–८०.

१६) देवधर, विजय, सुरक्षितता ग्रंथालयाची: नाशिक, ज्ञानगंगोत्री मासिक, सप्टेंबर–नोव्हेंबर २०१०, पृ. ४७.

प्रकरण पाचवे

माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण

प्रस्ताविक :–

''पुणे शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या वाचन साहित्य संग्रह विकास धोरणांचा अभ्यास'' हा संशोधनाचा विषय असून या संशोधनाच्या विषयासाठी पुणे शहरातील एकूण सात आयुर्वेद महाविद्यालये आहेत. ६ महाविद्यालये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संलग्नित असून १ महाविद्यालय हे भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाशी संलग्न आहे. या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची सद्यस्थिती जानून घेण्याकरीता त्या त्या ग्रंथालयातील ग्रंथपाल व महाविद्यालयातील अध्यापक प्रश्नावली व विद्यार्थी प्रश्नावली भरून सर्वांची मते जानून घेण्यात आली असून त्याद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे. विश्लेषण करतांना विचारलेल्या प्रश्नाचे प्रथम प्रयोजन सांगून त्यापुढे परिच्छेदामध्ये मिळालेल्या माहितीचे कोष्टक व आवश्यक त्या ठिकाणी आलेखाच्या सहाय्याने विश्लेषण केलेले आहे. शेवटी त्या माहितीच्या आधारावर आढळून आलेल्या तथ्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

(अ) ग्रंथपाल प्रश्नावली

विभाग क्र. १ : ग्रंथालयाची सर्वसाधारण माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रश्न क्रमांक १ ते ५ मधील माहिती मध्ये ग्रंथालयाचे नाव, स्थापना वर्ष, ग्रंथालयाचा पत्ता व फोन नंबर आणि फॅक्स नंबर तसेच ग्रंथालयाच्या वेबसाईटचा पत्ता असे प्रश्न विचारलेले आहेत.

वरील सर्व प्रश्नावरून ग्रंथालयाचे नाव, स्थापना वर्षा वरून ते ग्रंथालय किती जुने आहे ही माहिती मिळते. ग्रंथालयाचा पत्ता व फोन नंबर आणि फॅक्स नंबर, वेबसाईटचा पत्ता असे प्रश्न विचारलेली आहे. सदर माहितीवरून ग्रंथालय कोणत्या ठिकाणी आहे आणि त्याचे फोन नंबर, फॅक्स नंबर, वेबसाईटचा पत्ता यावरून वाचकांना ग्रंथालयाशी संपर्क साधण्यास मदत होते.

कोष्टक क्र. १


अ.क्र.	महाविद्यालयाचे नाव	स्थापना वर्ष
१	भारती विद्यापीठाचे आयुर्वेद महाविद्यालय, कात्रज, पुणे	१९९०
२	सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, पुणे	१९९०
३	टिळक आयुर्वेद महाविद्यालय, रास्तापेठ, पुणे	१९३३
४	अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, सदाशिवपेठ, पुणे	१९३६
५	डॉ. डि. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालय, पिंपरी, पुणे	२००१
६	भारती संस्कृती दर्शन ट्रस्ट आयुर्वेद महाविद्यालय, वाघोली, पुणे	१९९८
७	आयुर्वेद कॉलेज व संशोधन केंद्र आकुर्डी, पुणे	१९९०

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १ मधील माहितीनुसार असे दिसून येते की अनुक्रमांक ३ व ४ मधील महाविद्यालये व त्यांच्या स्थापना १९३० ते १९४० या स्वातंत्र्य पुर्व कालावधीमधील आहे. त्यांची संशोधनाची कारकीर्द फार जुनी आहे. तसेच अनुक्रमांक १,२,५,६,७ मधील आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना ही स्वातंत्र्य नंतरच्या काळातील म्हणजेच १९९० ते २००१ कालावधीमध्ये स्थापना झाल्याचे दिसून येते

आलेख क. १

महाविद्यालयाचे स्थापना वर्ष



वरील कोष्टकाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसुन येते की, टिळक आयुर्वेद महाविद्यालय व अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय ही दोन महाविद्यालयाची स्थापना १९३० ते १९४० या स्वातंत्र्य पुर्व काळातील असुन आयुर्वेदाचे अभ्यासक्रम देणारी ही सर्वात जुने महाविद्यालये आहेत. तसेच इतर ५ आयुर्वेद महाविद्यालयांची स्थापना ही १९९० ते २००१ म्हणजे स्वातंत्र्य नंतरच्या काळातील असल्याचे दिसुन येते.

विभाग क्र.२ : ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहा विषयी सर्वसाधारण माहिती.

ग्रंथसंग्रह हा सर्वच ग्रंथालयाचा आत्मा आहे, ग्रंथालयास महत्व हे ग्रंथसंग्रहा शिवाय येणे शक्य नाही. ग्रंथाशिवाय ग्रंथालय शक्य नाही. वाचकांना हवे असलेले वाचन साहित्य पुरविने हे ग्रंथालयाचे कर्तव्य आहे. ग्रंथाची मागणी होणे म्हणजेच ग्रंथसंग्रह मोठ्या प्रमाणात गरज असुन त्या प्रमाणात ग्रंथसंग्रह वाढविण्यात आलेला आहे.

प्रश्न क्रमांक २.१ : ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथाची संख्या असा प्रश्न विचारलेला आहे.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात संशोधन व अध्ययन हे नियमितपणे होत असते. वाचक आपल्या संशोधन व अध्ययनासाठी मोठ्या प्रमाणात ग्रंथांचा उपयोग करतात म्हणुन ग्रंथालयाचा असणाऱ्या ग्रंथाची संख्या विषयी वरील प्रश्नांचो सर्व उत्तरे उत्तरदात्यांनी दिलेली आहे.

कोष्टक क्र.२

ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	१०,००० ते १५,०००	५	७१%
२	१५,००१ ते ३०,०००	२	२९%
३	३०,००१ ते ५०,०००	०	०%

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २ मधील माहितीनुसार ७१% ग्रंथालयात १०,००० ते १५,००० एवढी ग्रंथसंख्या आहे.२९% ग्रंथालयात १५००१ ते ५०,००० ग्रंथसंख्या असल्याचे दिसुन येते. या माहितीवरुन अशी स्पष्ट होते की आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ग्रंथसंख्या वाढविणे आवश्यक आहे.

प्रश्न क्रमांक २.२ : ग्रंथालयात असणाऱ्या सि.डी. रोमचो संख्या असा प्रश्न विचारला आहे.

सध्याची ग्रंथालये ही छापील माध्यमांच्या मर्यादांमुळे डिजीटल ग्रंथालयाकडे वाटचाल करत आहेत. कॉम्प्युटर, इंटरनेट, सी.डी. रोम, डेटाबेस, नेटवर्क डेटाबेस वापरण्यांचा मोठा कल आहे. छापील वाचन साहित्या बरोबर वाचकांच्या गरजांची पुर्तता करण्यासाठी आधुनिक इलेक्ट्रॉनिक साहित्याचा समावेश करणे क्रमप्राप्त आहे. हे जाणुन घेण्यासाठी हा प्रश्न विचारला आहे.

कोष्टक क्र.३
ग्रंथालयातील सी.डी. रोमची संख्या

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	००	२	२९ %
२	३००	५	७१ %
३	५००	–	० %
४	१०००	–	० %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.३ मधील माहितीनुसार असे दिसुन येते की.२९% ग्रंथालयात. एक ही सी. डी रोम ची संख्या नाही. ७१% ग्रंथालयात ३०० पेक्षा कमी सी.डी. रोम उपलब्ध आहे. ५०० ते १००० सी.डी रोम कोणत्याही ग्रंथालयात नाही.

प्रश्न क्रमांक २.३ : ग्रंथालयात असणाऱ्या नियतकालिक संख्या

नियतकालिके हे अद्यायावत ज्ञान व आवश्यक माहिती देण्याचे प्रयत्न करतात नियतकालिकामध्ये एखाद्या विषयासंबंधी नव्याने उपलब्ध होणारी माहिती किंवा नव्याने होत असलेले संशोधन हयाचा प्रामुख्याणे समावेश होतो. त्याकरीता ग्रंथालय किती प्रमाणात ते उपलब्ध करून आयुर्वेदिक, मॉर्डन, इतर नियतकालिके येण्याबाबत माहिती विचारण्यात आली आहे.

कोष्टक क्रमांक. ४

ग्रंथालयातील नियतकालिकेची संख्या

नियतकालिक संख्या	०	५०	१००
टक्केवारी	१४%	७२%	१४%

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क. ४ मधील माहिती नुसार १४ % महाविद्यालयाच्या ग्रंथालयात एक ही नियतकालिक घेतले जात नाही. ७२ % ग्रंथालयात ५० नियतकालिक घेतली जातात. तर १४ % ग्रंथालयात १०० पर्यत नियतकालिके विकत घेतली जातात.

विभाग क्र. ३ : आयुर्वेद डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्या विषयी माहिती:

देशातील आयुर्वेद पदवीधारक डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दि. ८ ऑक्टोबर १९९८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मिळालेली आहे. सर्वोच्च न्यालयाचे न्यायमुर्ती श्री. एम. एम . पुंछी यांच्या अध्यक्षते खाली न्या. थॉमस व न्या. कादर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिलेला आहे. त्या अनुषगाने खालील प्रश्न विचारला आहे.

प्रश्न. क्र. ३.१ : आयुर्वेद डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्याविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णया विषयी आपणास कल्पना आहे का?

कोष्टक क्र. ५

आयुर्वेद डॉक्टराना ॲलोपॅथो औषधे वापरण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या माहिती विषयी

अ.क्र	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	७	१००%
२	नाही	०	०%
३	सांगता येत नाही	०	०%
एकुण		७	१००%

संदर्भ: सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते कि, आयुर्वेद डॉक्टराना ॲलोपॅथी औषधे वापरण्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविषयी १००% ग्रंथालयास कल्पना आहे. त्यामुळे ग्रंथालयानी ॲथोलॅथीची ग्रंथ मोठ्या प्रमाणात विकत घेतली पाहिजे.

प्रश्न क्र. ३.२ : सि.सि.आय. एम. अधिसुचने नुसार आयुर्वेद डॉक्टराना आधुनिक चिकित्सा पद्धतीचा अवलब व ॲलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी बाबत आपणास माहिती आहे का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता पुढील माहिती प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ६

सि.सि. आय. एम. अधिसुचने नुसार आयुर्वेद डॉक्टराना ॲलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी माहिती

अ.क्र	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	७	१००%
२	नाही	०	०%
३	सांगता येत नाही	०	०%
एकुण		**७**	**१००%**

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ६ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते कि, सि.सि.आय एम. अधिसुचने नुसार आयुर्वेद डॉक्टराना आधुनिक चिकित्सा पद्धतीचा अवलंब व ॲलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी बाबत माहिती १००% ग्रंथालयास आहे. नाही व सांगता येत नाही ०% उत्तर दात्यानी माहिती दिली.

प्रश्न क्र. ३.३ ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ,ॲलोपॅथी ग्रंथ उपलब्ध आहे का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ७

अ.क्र	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	६	८६%
२	नाही	०	०%
३	समाधानकारक	१	१४%
एकुण		**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ७ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते कि,ग्रंथालयात पुरेसे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, ॲलोपॅथी ग्रंथ ८६ % ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तर १४% ग्रंथालयात समाधानकारक असल्याचे दिसुन आले.

प्रश्न क्र. ३.४ : ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथी नियतकालिके असावी असे वाटते का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ८

ग्रंथालयातील ॲलोपॅथी नियतकालिक विषयी माहिती

अ.क्र	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	७	१००%
२	नाही	०	०%
३	काही प्रमाणात	०	०%
एकुण		**७%**	**१००%**

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ७ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते कि,ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथी नियतकालिके असावी असे १०० % ग्रंथालयाना वाटते त्यामुळे त्यानी नियतकालिके खरेदी करुन उपलब्ध करुन दिली पाहिजे.

प्रश्न क्र. ३.५ : ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथी ग्रंथ असावी असे वाटते का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढीलप्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ९

ग्रंथालयात ॲलोपॅथी ग्रंथा विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	होय	५	७२ %
२	नाही	१	१४ %
३	काही प्रमाणात	१	१४ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ९ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथी ग्रंथ असावी असे ७२ % ग्रंथालयांना वाटते. १४ % ग्रंथालयांना मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथी ग्रंथ नसावी असे वाटते. तर १४ % ग्रंथालयांना असे वाटते की ॲलोपॅथी ग्रंथ काही प्रमाण असावी.

प्रश्न क्र. ३.६ : ग्रंथालयातील कोणती ग्रंथ मोठया प्रमाणात वापर करतात ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. १०

ग्रंथालयातील ग्रंथ वापरा विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	आयुर्वेदिक	४	५७ %
२	ॲलोपॅथी	०	० %
३	दोन्ही	३	४३ %
४	इतर	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १० मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ५७ % ग्रंथालयात आयुर्वेदिक ग्रंथाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. तर ४३ % ग्रंथालयास आयुर्वेदिक व ॲलोपॅथीक ग्रंथाचा वापर करण्यात येतो. आयुर्वेदिक ॲलोपॅथी ग्रंथाचा वापर ग्रंथालयात होतो ही खुप महत्वाची गोष्ट आहे.

प्रश्न क्र. ३.७ : ग्रंथालयात ॲलोपॅथीच्या सिडी उपलब्ध असल्यास आपण वापरली आहे का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ११

ग्रंथालयात ॲलॉपेथी सिडी उपलब्ध व वापरा विषयी माहिती.

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	६	८६ %
२	नाही	१	१४ %
३	सांगता येत नाही	०	० %
४	काही प्रमाणात	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ११ मधील माहितीचा अभ्यास करताना असे दिसून येते की, ८६ % ग्रंथालयात ॲलोपॅथीच्या सिडी उपलब्ध असून त्यांचा वापर ग्रंथालयात होतो. तर १४ % ग्रंथालयात ॲलोपॅथीच्या सिडी उपलब्ध नसल्याने वापर देखील केला जात नाही. आधुनिक ग्रंथालयांनी सिडीचा वापर मोठ्या प्रमाणात करावा..

विभाग क्रमांक ४ : ग्रंथोपार्जन धोरणाविषयी माहिती

ग्रंथोपार्जन धोरणामध्ये ग्रंथ विक्रेत्यांकडून माहिती मागविणे, ग्रंथ विक्रेत्यांची निवड करणे, ग्रंथ खरेदीच्या अटी ठरविणे, ग्रंथाची पुर्नवृत्ती होऊ नये म्हणून तपासणी करणे, रक्कम उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे, घेण्या योग्य ग्रंथाची यादी तयार करणे, आदेशाच्या कामाचे नित्यक्रम ठरविणे. मागविलेल्या परंतू न मिळालेल्या ग्रंथाची पाठपुरावा करणे, ग्रंथ खरेदीचा हिशोब ठेवणे इत्यादी नियोजन या ग्रंथोपार्जन धोरणा विषयी माहिती मध्ये ग्रंथोपार्जन करताना विचार करणे जरूरीचे आहे. म्हणून विभाग क्र. ४ मध्ये या अनुषंगाने प्रश्न विचारले आहे.

प्रश्न क्र. ४.१: ग्रंथोपार्जन धोरणाची आपणास आवश्यकता वाटते का ? सर्व उत्तरदात्यांनी माहिती दिलेली आहेत. कारण ग्रंथोपार्जन केल्या शिवाय वाचकांसाठी ग्रंथ देवघेव करणे शक्य नाही.

कोष्टक क्र. १२

ग्रंथोपार्जन धोरणांची माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	आवश्यकता वाटते	७	१०० %
२	आवश्यकता वाटत नाही	०	० %
३	सांगता येणार नाही	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

सर्व ग्रंथालयाच्या ग्रंथपाल यांना प्रत्येक ग्रंथालयांना ग्रंथोपार्जनाची आवश्यकता वाटते आहे. ती गरज आहे असे वरील अभ्यासावरून दिसून येते.

प्रश्न क्रमांक ४.२ : आपल्या ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन लिखित स्वरूपाचे आहे का ? असा प्रश्न विचारला आहे.

कोष्टक क्र. १३

ग्रंथोपार्जन धोरण लिखित स्वरूपाची माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	७	१०० %
२	नाही	०	० %
३	विचारधीन आहे	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १३ मधील माहिती नुसार असे स्पष्ट होते की, सर्व ग्रंथालयात ग्रंथोपार्जन सर्व धोरण लिखित स्वरूपाचे असणे जरूरीचे आहे. कारण त्या शिवाय ग्रंथालयाची संख्या व हिशोब ठेवणे कठीण होईल. त्याचसाठी हे ग्रंथोपार्जन धोरण लिखित स्वरूपाचे १०० % असल्याचे दिसून येते.

प्रश्न क्रमांक ४.३ : आपल्या ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन धोरणाचा आढावा घेतला जातो का? बदल सूचविले जातात का ?

कोष्टक क्र. १४

ग्रंथोपार्जन धोरण आढावाची माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमितपणे	६	८६ %
२	कधीतरी	०	० %
३	गरजेनुसार	०	० %
४	नाही	१	१४ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १४ मधील माहितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, ८६ % ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन धोरणाचा नियमितपणे आढावा घेऊन बदल सुचविले जातात. ग्रंथालय वाचन साहित्य संग्रहाचा विकास करण्याच्या दृष्टीने ही खुप आवश्यक प्रक्रिया आहे. केवळ १४ % ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन धोरण आढावा घेत नाही व कोणतेही बदल सुचवित नाही.

प्रश्न क्रमांक ४.४ : ग्रंथोपार्जन धोरणाचा आपणास ग्रंथखरेदी करतांना उपयोग होतो का?

कोष्टक क्र. १५

ग्रंथोपार्जन धोरणासंबंधी ग्रंथ खरेदी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	चांगला उपयोग होतो.	६	८४%
२	थोडाफार उपयोग होतो	१	१४%
३	उपयोग होत नाही	०	०%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १५ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की ग्रंथोपार्जन धोरणा लिखित स्वरूपाचे असल्याने व नियमित पणे आढावा घेऊन बदल सूचवुन ग्रंथाची खरेदी केल्यास ८६% ग्रंथालयात चांगला उपयोग झाल्याचे दिसुन येते. व १४% ग्रंथालयात थोडाफार उपयोग होतो.

प्रश्न क्रमांक ४.५ : ग्रंथोपार्जन धोरणामुळे पारदर्शनकता येते का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. १६

ग्रंथोपार्जन धोरण पारदर्शकता विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	७	१००%
२	नाही	०	०%
३	सांगता येत नाही	०	०%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १६ मधील माहिती नुसार असे स्पष्ट होते की, १००% ग्रंथालयात ग्रंथोपार्जन धोरणामुळे कामकाज करताना पारदर्शकता येते. यामुळे ग्रंथोपाजन धोरण खुप गरजेचे असुन वाचन साहित्य संग्रहाचा विकास होण्यास मदत होते.

विभाग क्र. ५ : ग्रंथालयातील ग्रंथ खरेदी विषयी माहिती

वाचन साहित्य संग्रह विकासाचे धोरण ठरविताना वाचक हा ग्रंथालयाचा महत्वाचा घटक आहे. वाचकांच्या गरजांचे समाधान करेल असे वाचन साहित्याची निवड करून खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रंथालयीन कर्मचारी यांनी केलेल्या सुचना, वाचकांच्या सुचना विषयी तज्ञांनी दिलेल्या वाचन साहित्याची यादी, विषयाच्या अभ्यास ग्रंथ क्रमानुसार संच निवडणे, संशोधकांची माहिती, संदर्भ ग्रंथ, इत्यादी बाबी विचारात घेणे गरजेचे आहे. यासाठी योग्य धोरण ठरविण्यात यावे.

पाठ्यपुस्तकाच्या प्रती किती घ्यायच्या मराठी, हिन्दी व इंग्रजी भाषेची ग्रंथ घेण्याबाबत धोरण ठरविण्यात यावे. संदर्भ ग्रंथासाठी किती रक्कम खर्च करायची, संशोधकास उपयुक्त वाचनसाहित्य, दुर्मिळ वाचनसाहित्य व हस्तलिखित निवड करणे. क्रमिक पुस्तके इत्यादी माहिती जाणुन घेण्यासाठी संशोधकांनी ग्रंथालयातील ग्रंथ खरेदी विषयी माहिती विचारण्यात आली आहे.

प्रश्न क्रमांक ५.१ : ग्रंथ खरेदी करतांना ग्रंथालयातील ग्रंथाची उपलब्धता तपासली जाते का? असा प्रश्न विचारला असता पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

कोष्टक क्र. १७

ग्रंथालयातील ग्रंथाची उपलब्धता विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमितपणे	७	१००%
२	कधीतरी	०	० %
३	नाही	०	० %
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १७ मधील माहिती नुसार असे स्पष्ट दिसून येते की सर्व म्हणजे १०० % ग्रंथालयांनी ग्रंथ खरेदी करतांना नियमितपणे ग्रंथाची उपलब्धता तपासली जाते ग्रंथ खरेदी करतानी सर्व ग्रंथालय खुप काळजी घेतात.

प्रश्न क्रमांक ५.२ : ग्रंथ खरेदी शिफारस करण्यासाठी ग्रंथालयात सूचना पेटीची सोय उपलब्ध आहे का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. १८

ग्रंथ खरेदी शिफारस सूचना पेटीची माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	होय	६	८६ %
२	नाही	१	१४ %
३	विचाराधीन आहे	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १८मधील माहितीनुसार असे स्पष्ट होते को. ८६% ग्रंथालयात ग्रंथ खरेदी शिफारस करण्यासाठी सुचना पेटीची सोय उपलब्ध करून देऊन वाचकांच्या शिफारशींचा विचार करून ग्रंथ खरेदी करण्यात येतात. तसेच १४% ग्रंथालयात अशा प्रकारची सोय उपलब्ध नाही.

प्रश्न क्रमांक ५.३ : ग्रंथ खरेदी नवीन प्रकाशित झालेल्या ग्रंथाची यादी सुचना फलकावर लावली जाते का? असो प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढीलप्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र.१९

ग्रंथाची एकुण सूचना फलकावरील माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमित	६	८६%
२	कधीतरी	०	०%
३	गरजेनुसार	०	०%
४	नाही	१	१४%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. १९ मधील माहिती नुसार असे दिसुन येते की. ८६% ग्रंथालयात ग्रंथ खरेदी नवीन प्रकाशित झालेल्या ग्रंथाची यादी सूचना फलकावर नियमितपणे लावण्यात येते. व १४% ग्रंथालयात ग्रंथ खरेदी नवीन प्रकाशित झालेल्या ग्रंथाची यादी सुचना फलकावर लावली जात नाही.

प्रश्न क्रमांक ५.४ : नवीन प्रकाशित झालेल्या ग्रंथाची निवड करण्यासाठी खालील पैकी कोणाला प्राधान्य दिले जाते ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २०

नवीन प्रकाशित ग्रंथ निवड माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	प्राचार्य	४	५६ %
२	अध्यापक	५	७० %
३	ग्रंथालय समिती	४	५६%
४	विद्यार्थी	३	४२ %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.२० मधील माहितीचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की. नवीन प्रकाशित झालेल्या ग्रंथाच्या ग्रंथ निवड करण्यासाठी प्राचार्य यांना ५६% ग्रंथालयात प्राधान्य दिले जाते. तर अध्यापक यांना ७०% प्राधान्य देण्यात येते. व ग्रंथालय समितीस ५६% प्राधान्य देण्यात येते. तर विद्यार्थीयांना ४२% प्राधान्य देण्यात येते. एकुण कोष्टकाचा अभ्यास केल्यास असे दिसुन येते की सर्वात जास्त फक्त अध्यापकांना नवीन प्रकाशित झालेल्या ग्रंथाची निवड करण्यासाठो प्राधान्य देण्यात येते. सर्वात कमी विद्यार्थांना प्राधान्य देण्यात येतो.

प्रश्न क्रमांक ५.५ : सूचना केलेल्या ग्रंथाची खरेदी किती प्रमाणात केली जाते ? अस प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र.२१

सूचना केलेल्या ग्रंथ खरेदीची माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	सर्वच	०	०%
२	थोडेफार	०	०%
३	बजेटनुसार	४	५७%
४	ग्रंथालय समितीच्या आदेशानुसार	३	४३%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.२१ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, सुचना केलेल्या ग्रंथाची खरेदी ५७% ग्रंथालयात बजेटनुसार करण्यात येते. व ४३% ग्रंथालयात ग्रंथालय समितीच्या आदेशानुसार खरेदी करण्यात येते. सुचना केलेल्या ग्रंथाची खरेदी करण्यामध्ये व थोडेफार देखील ग्रंथालयात खरेदी करण्यात येत नाही.

प्रश्न क्रमांक ५.६ : ग्रंथाची खरेदीवर खर्च होणारी रक्कम पुरेशी वाटते का ? असा प्रश्न विचारला असता त्यांची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र.२२

ग्रंथ खरेदीवर खर्च होणारी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	पुरेशी आहे	४	५७ %
२	पुरेशी नाही	३	४३ %
३	सांगता येत नाही	०	०%
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.२२ मधील माहिती नुसार असे दिसुन येते की, ग्रंथ खरेदीवर खर्च होणारी रक्कम ५७% ग्रंथालयांना पुरेशी वाटते.४३% ग्रंथालयांना मात्र पुरेशी वाटत नाही ज्या ग्रंथालयात रक्कम पुरेशी वाटत नाही त्यांनी रक्कम वाढविण्यासाठी प्रर्यत्न केला पाहिजे.

प्रश्न क्र. ५.७ : मागील शैक्षणिक वर्षामध्ये खरेदी केलेल्या ग्रंथाची संख्या समाधानकारक होती का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २३

मागील वर्षामध्ये खरेदी केलेल्या ग्रंथाची संख्या

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	समाधानकारक	५	७२ %
२	असमाधानकारक	२	२८ %
३	सांगता येत नाही	०	०%
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २३ मधील माहिती नुसार असे दिसुन येते की, मागील वर्षामध्ये खरेदी केलेल्या ग्रंथाची संख्या ७२% ग्रंथालयात समाधानकारक आहे. तर २८% ग्रंथालयातील ग्रंथपालानी असमाधानकारक असल्याच मत दिलेले आहे. आणि ० % ग्रंथालयांनी सांगता येत नाही असा प्रतिसाद दिलेला आहे.

प्रश्न क्रमांक ५.८ : ग्रंथ खरेदी कोणत्या प्रकारे केली जाते ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २४

ग्रंथ खरेदी विषयक माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	ग्रंथ विक्रेत्यांकडून	२	२८ %
२	एजंट माफत	०	० %
३	ग्रंथ प्रदर्शन	२	२८ %
४	प्रकाशकाकडून	१	१४ %
५	**कोटेशन**	**६**	**८६ %**

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २४ मधील माहितीनुसार असे दिसून येते की, ग्रंथ खरेदी विक्रेत्याकडून २८ % केली जाते. तर एजंटामाफत ० % ग्रंथालयात केली जाते तसेच ग्रंथ प्रदर्शनातून २८ % ग्रंथालयात खरेदी केली जाते प्रकाशकाकडून १४ % केली जाते व कोटेशन मागवून ८६ % ग्रंथ खरेदी करण्यात येतात.

प्रश्न क्रमांक ५.९ : ग्रंथ खरेदी करतांना खालील प्रकारचे कोणते ग्रंथ विकत घेतले जातात ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २५
ग्रंथ खरेदी प्रकाराची माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	क्रमिक ग्रंथ	६	८६ %
२	संदर्भ ग्रंथ	७	१०० %
३	सामान्य ज्ञान ग्रंथ	०	० %
४	स्पर्धा परीक्षा ग्रंथ	०	० %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणो

कोष्टक क्र. २५ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथ खरेदी करताना क्रमिक ग्रंथाची ८६ % ग्रंथालयात खरेदी केली जातात. तर संदर्भ ग्रंथ १०० % ग्रंथालयात खरेदी केली जातात. तर सामान्यज्ञान ग्रंथ व स्पर्धा परीक्षा ग्रंथ आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ० % ग्रंथ खरेदी केल्याचे दिसून येते.

प्रश्न क्रमांक ५.१० : ग्रंथ खरेदी करतांना खालील कोणत्या गोष्टींचा विचार करण्यात येतो? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती खालील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २६

ग्रंथखरेदी करतांना दिलेल्या गोष्टीची माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	डिस्काऊंट	३	४२ %
२	गरज	५	७० %
३	पैशाची उपलब्धता	१	१४ %
४	यापैकी नाही	०	० %

संदर्भ :– सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २६ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथ खरेदी करतांनी डिस्काऊंट याला ४२ % ग्रंथालयात महत्व दिले जाते. गरज ७० % ग्रंथालयांनी महत्व दिले जाते. पैशाची उपलब्धता या गोष्टीला १४% ग्रंथालयात महत्व देण्यात येते यापैकी नाही ० % ग्रंथालयानी प्रतिसाद दिलेला आहे.

प्रश्न क्रमांक ५.११ : आपल्या ग्रंथालयात नियमितपणे ग्रंथ विकत घेतले जातात का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २७

नियमितपणे ग्रंथ विकत घेतल्या विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	१ माहिण्यातून	०	० %
२	३ महिण्यातून	०	० %
३	वर्षातून	२	२८ %
४	मागणीनुसार	५	७२ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २७ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, एक महिन्यातून तसेच तीन महिन्यातून काहीच ग्रंथ विकत घेतली जात नाहीत. तर वर्षातून २८ % ग्रंथालयात ग्रंथ विकत घेतली जातात आणि वाचकाच्या मागणीनुसार ७२ % ग्रंथालयात ग्रंथ विकत घेतली जातात. वाचकांच्या मागणीचा विचार मोठ्या प्रमाणात ग्रंथालय ग्रंथ विकत घेतात ही खुप महत्वाची गोष्ट आहे.

प्रश्न क्रमांक ५.१२ :वाचकाकडून इलेक्ट्रॉनिक पुस्तकांची मागणी होते का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २८
इलेक्ट्रॉनिक पुस्तका विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमितपणे	२	२८ %
२	कधीतरी	३	४४ %
३	नाही	२	२८ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २८ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, वाचकाकडून इलेक्ट्रॉनिक पुस्तकांची मागणी नियमितपणे २८ % ग्रंथालयात होते कधीतरी ४४ % ग्रंथालयात मागणी होते. तर २८ % ग्रंथालयातील वाचक इलेक्ट्रॉनिक पुस्तकांची मागणी करत नाही.

प्रश्न क्रमांक ५.१३ : ग्रंथाच्या जास्तीत जास्त किती प्रती विकत घेतल्या जातात ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. २९

ग्रंथाच्या जास्तीत जास्त प्रती विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	विद्यार्थी संख्या नुसार	३	४३ %
२	गरजेनुसार	३	४३ %
३	बजेट नुसार	१	१४ %
४	आदेशा नुसार	०	० %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. २९ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथाच्या जास्तीत जास्त प्रती विद्यार्थी संख्येनुसार ४३ % ग्रंथालयात विकत घेतल्या जातात. गरजेनुसार ४३ % ग्रंथालयात घेतले जातात. बजेटनुसार १४ % ग्रंथालयात प्रती विकत घेतल्या जातात आणि आदेशानुसार याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

प्रश्न क्रमांक ५.१४ : ग्रंथ खरेदीमध्ये खालील प्रतिनिधीचा किती सहभाग असतो? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३०

ग्रंथखरेदी सहभागाविषयी माहिती

अ. क्र.	तपशिल	२५	५०	७५	१००	एकूण प्रतिसाद	टक्केवारी
१	प्राचार्य	०/० %	१/१४ %	०/० %	६/८६ %	७	१०० %
२	ग्रंथपाल	१/१४ %	०/० %	०/० %	६/८६ %	७	१०० %
३	विभाग प्रमुख	०/० %	२/२८ %	१/१४ %	४/५८ %	७	१०० %
४	विद्यार्थी	३/४४ %	०/० %	२/२८ %	२/२८ %	७	१०० %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३० मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ८६ % महाविद्यालय याला प्राचार्याचा ग्रंथखरेदी मध्ये १०० % सहभाग दिसून येतो. तर १४ % महाविद्यालयात प्राचार्य ग्रंथखरेदीमध्ये ५० % सहभागी आहेत. ८६ % महाविद्यालयात ग्रंथपालांचा ग्रंथखरेदी मध्ये १०० % सहभागी आहेत. तर १४ % महाविद्यालयात ग्रंथपालांचा ग्रंथखरेदी मध्ये २५ % सहभाग आहे. ५८ % महाविद्यालयात विभाग प्रमुख ग्रंथखरेदी मध्ये १०० % सहभाग असतो. तर २८ % महाविद्यालयात विभाग प्रमुख ग्रंथखरेदी मध्ये ५० % सहभागी आहेत व १४ % महाविद्यालयात विभाग प्रमुख ग्रंथखरेदीमध्ये ७५ % सहभागी आहेत.

४४ % महाविद्यालयात विद्यार्थी ग्रंथखरेदीमध्ये २५ % सहभागी असून २८ % महाविद्यालयात विद्यार्थी ग्रंथखरेदीमध्ये ७५ % सहभागी आहे. तर २८ % महाविद्यालयात विद्यार्था ग्रंथखरेदी मध्ये १०० % सहभागी आहेत.

प्रश्न क्रमांक ५.१५ :ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन भरविले जाते का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३१

ग्रंथ प्रदर्शना विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमितपणे	२	२८ %
२	कधीतरी	१	१४ %
३	नाही	४	५८ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.३१ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन नियमितपणे २८% ग्रंथालयात भरविले जाते. कधीतरी १४% ग्रंथालयात भरविले जाते व ५८ % ग्रंथालयांनी ग्रंथ प्रदर्शन भरविलेले नाहो.

प्रश्न क्रमांक ५.१६ : ग्रंथ निवडीसाठी कोण–कोणत्या साधनाचा वापर केला जातो? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढीलप्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३२

ग्रंथ निवड साधनाची माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	प्रकाशकाची सुची	६	८६ %
२	ग्रंथ विक्रेते	२	२८ %
३	ग्रंथ प्रदर्शन	१	१४ %
४	यापैकी नाही	०	० %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३२ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथ निवडीसाठी प्रकाशकांची सुचीचा ८६ % ग्रंथालयात वापर केला जातो. ग्रंथ विक्रेते २८ % ग्रंथालयात वापर केला जातो. तर ग्रंथ प्रदर्शनातून १४ % ग्रंथालयात ग्रंथ निवडी करण्यात येते.

क्रमांक ५.१७ : ग्रंथालयात ॲप्रुव्हलवरती पुस्तके मागवून मिळवता येतात का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३३

ग्रंथालयातील ॲप्रुव्हल ग्रंथासबंधी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपणे	२	२८ %
२	कधीतरी	५	७२ %
३	नाही	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३३ मधील माहितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, ॲप्रुव्हल वरती नियमितपणे २८ % ग्रंथालयात पुस्तके मागवून मिळवता येतात. कधीतरी ७२ % ग्रंथालयात ॲप्रुव्हल वरती पुस्तके मागवून घेतात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ॲप्रुव्हल वरती पुस्तके मागवून घेतली जातात ही खुप महत्वाची गोष्टी आहे.

प्रश्न क्रमांक ५.१८ : सि.सि. आय.एम.व एम. यु. एच.एस. यांनी शिफारस केलेले ग्रंथ ग्रंथालयात आहेत का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढीलप्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३४

सि.सि. आय.एम.व एम. यु. एच.एस. नुसार ग्रंथ निवडी संबंधी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	पुरेशी आहे.	६	८६ %
२	पुरेशी नाही	०	० %
३	विचाराधीन आहे	०	० %
४	काही प्रमाणात	१	१४ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३४ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की. सी.सी.आय.एम व एम.यु.एच.एस यांनी शिफारस केलेले ग्रंथ ८६% ग्रंथालयात उपलब्ध आहे. तर काही प्रमाणात १४% ग्रंथालयात ग्रंथ उपलब्ध आहे. सी.सी.आय.एम व एम.यु.एच.एस यांनी शिफारस केलेली ग्रंथ ग्रंथालयांनी घेऊन वाचकांना उपलब्ध करून दिली जातात ही खुप महत्त्वाची बाब आहे.

विभाग क्र. ६ : ग्रंथालयातील समिती विषयी माहिती:

ग्रंथालयाची उदिष्टे साध्य करण्यासाठी प्रत्येक ग्रंथालयात ग्रंथालय समितीची स्थापना करावी लागते. या समितीमध्ये प्राचाय अध्यक्ष, ग्रंथपाल सचिव, तीन विभाग प्रमुख हे सदस्य, तर विद्यार्थी प्रतिनिधी एक सदस्य असावी असे विद्यापीठ अनुदान आयोगाने सांगितले आहे. ग्रंथालय समितीच्या वर्षातुन किमान ४ सभा आयोजीत करून ग्रंथालयातील व्यावस्थापन नियोजन,नियंत्रण, त्याच प्रमाणे ग्रंथ निवड, या प्रकारचे कामकाज सुव्यवस्थित करण्यात मदत होते ग्रंथालयात कामकाज प्रत्यक्ष कशा प्रकारे चालते ग्रंथनिवड, समिती सभासदाची माहिती जाणुन घेण्यासाठी या विभागात ग्रंथालय समिती विषयी प्रश्न विचारले आहे.

प्रश्न क्रमांक ६.१ : ग्रंथाची निवडी करण्यासाठी निवड समिती आहे का? असा प्रश्न विचारला असता पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

कोष्टक क्र.३५

निवड समिती विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	६	८६ %
२	नाही	०	० %
३	विचाराधीन आहे	१	१४ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३५ मधील माहितीचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की. ग्रंथाची निवड करण्यासाठी ८६% ग्रंथालयात निवड समितीची स्थापन करण्यात आली आहे. १४% ग्रंथालयात ग्रंथाची निवड करण्यासाठी समिती नाही परंतु स्थापना करण्याचा विचार आहे.

प्रश्न क्रमांक ६.२ : ग्रंथालय समितीमध्ये खालील कोण कोणते सभासद आहे? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र.३६

ग्रंथालय समिती मधील सभासद विषयी माहिती


अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	प्राचार्य	६	८६%
२	ग्रंथपाल	६	८६%
३	शिक्षक प्रतिनिधी	७	१००%
४	विद्यार्थी प्रतिनिधी	३	४३%
५	अकाउन्टं	०	०%
६	इतर प्रतिनिधी	०	०%

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.३६ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, महाविद्यालयांचा ग्रंथालय समितीमध्ये प्राचार्य हे ८६% सभासद आहेत. ग्रंथपाल हे ८६% ग्रंथालयात सभासद आहेत. शिक्षण प्रतिनिधी १००% ग्रंथालयात सभासद आहेत. विद्यार्थी प्रतिनिधी ४३% ग्रंथालयात सभासद आहत, तर अकाउंट व इतर प्रतिनिधी कोणत्याही ग्रंथालय समितीत सभासद नाहीत.

आलेख. क्र.२

समितीमधील सभासदाविषयी आलेख



प्रश्न क्रमांक ६.३ : ग्रंथालयात ग्रंथाच्या जास्तीत जास्त किती प्रति घेण्यासाठी कोण ठरविते? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३७

ग्रंथाच्या जास्तीत जास्त प्रती घेण्याविषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	ग्रंथालय समिती	४	५८ %
२	विभाग प्रमुख	०	० %
३	ग्रंथपाल	४	५८ %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३७ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, ग्रंथालयात ग्रंथाच्या जास्तीत जास्त प्रती घेण्यासाठी ग्रंथालय समिती ५८% ग्रंथालयात ठरविते, तर ग्रंथपाल देखील ५८ % ग्रंथालयात ठरवितात तर ०% ग्रंथालयात विभाग प्रमुख ठरवित नाहीत.

प्रश्न क्रमांक ६.४ : ग्रंथालय समितीच्या सभा नियमितपणे होतात का? असा विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३८

ग्रंथालय समितीच्या सभाविषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	१ महिना	१	१४%
२	३ महिने	१	१४%
३	६ महिने	१	१४%
४	आवश्यकतेनुसार	४	५८%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३८ मधील माहितीचा अभ्यास करता अस दिसुन येते की, ग्रंथालय समितीच्या सभा महिण्यातुन १४% ग्रंथालयात होतात, तीन महिण्यातुन १४% ग्रंथालयात सभा होतात. सहा महिन्यातून १४ % ग्रंथालयात सभा होतात. तर आवश्यकतेनुसार ५८% ग्रंथालयात ग्रंथालय समितीच्या सभा होतात.

प्रश्न क्रमांक ६.५ : ग्रंथालय समितीमध्ये ठरलेल्या सर्व ठरावांची अमल बजावणी होते का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ३९


समिती मधील ठरावाच्या अमलबजावणी विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	सर्व १००%	४	५८%
२	जास्तीत जास्त ७५%	१	१४%
३	थोड्या फार २५%	२	२८%
४	कधीच नाही ०%	०	०%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ३९ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, ग्रंथालय समितीमध्ये ठरविलेल्या (सर्व) ठरावाराची अमलबजावणी ५८% ग्रंथालयात केली जाते. जास्तीत जास्त (७५%) ठरावाची अमलबजावणी १४% ग्रंथालयात केली जाते. तर थोड्या फार (२५%) ठरावाची अमलबजावणी २८% ग्रंथालयात करण्यात येते.

आलेख क्र.३
ग्रंथालय समितीमधील अमलबजावणी विषयी आलेख



विभाग क्रमाक ७ : ग्रंथालय सेवा विषयी माहिती :

ज्ञान आणि ज्ञानाच्या सर्व विषयांच्या क्षेत्रात झपाड्याने प्रगती होत आहे. ग्रंथालय सेवेच्या व्यावस्थापन कसे असेल याचे विवरण असे की ग्रंथालय व्यावस्थापनात होत असलेले सर्व व्यावहार हे ग्रंथालयसेवांचे आधार आहेत. ग्रंथाच्या पाठोपाठ नियतकालिके प्रचारात आली. वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचा अभ्यास करत असताना ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचे वाचकांना वेळच्या वेळी देवघेव, प्रचलित जागरूकता सेवा, निवडक प्रक्षारण सेवा, प्रतिनिधी सेवा, नवीन आलेल्या पुस्ताकांचे प्रदर्शन या बरोबरच ग्रंथालयानी ई.बुक्स. वाचन साहित्य माहिती विषयी. संदर्भसेवा झेरॉक्स सेवा, इत्यादी ग्रंथालयाने वाचकांना सेवा देताना प्रामुख्याने कमी वेळात उत्तम सेवा देण्याचा प्रर्यत्न करणे गरजेचे आहे. म्हणुन ग्रंथालयांनी कोणकोणत्या सेवा वाचकांना देतात हे जाणुन घेण्यासाठी अभ्यासकांनी काही प्रश्नाद्वारे माहिती जाणुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न क्रमांक ७.१ : ग्रंथालयात ई–बुक्स विकत घेतले जातात का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुठील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४०

ई– बुक्स विकत घेण्याविषयी माहिती


अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपणे	०	०%
२	गरजेनुसार	३	४४%
३	कधीतरी	२	२८%
४	नाही	२	२८%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४० मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, ग्रंथालयात नियमितपणे ई– बुक्स ०% ग्रंथालयात घेतले जातात म्हणजे नियमितपणे ई– बुक्स विकत कोणत्याही ग्रंथालयात घेतले जात नाही, गरजेनुसार ई–बुक्स ४४% ग्रंथालयात घेतली जातात. कधीतरी ई–बुक्स विकत २८% ग्रंथालयात घेण्यात येते. तर २८% ग्रंथालयात ई–बुक्स विकत घेतली जात नाही.

आलेख क्र. ४

ई- बुक्स विषयी आलेख



प्रश्न क्रमांक ७.२ : ग्रंथालयात ई-बुक्स वापरण्याची सोय आहे का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ४१

ई-बुक्स वापरण्याविषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	६	८६ %
२	नाही	१	१४ %
३	विचाराधीन आहे	०	० %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र.४१ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, ग्रंथालयात ई–बुक्स वापरण्याची सोय ८६% ग्रंथालयात आहे. ई–बुक्स वापरण्याची सोय १४% ग्रंथालयात नाही. तर विचाराधीन आहे असे कोणत्याही ग्रथालयात ग्रंथालयांनी म्हटले नाही.

प्रश्न क्रमांक ७.३ : ग्रंथालयात ई– बुक्स संग्रहाचे इलेक्ट्रॉनिक संग्रहाचे वर्गणीदार आहेत का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४२

ई–बुक्स संग्रहाचे वर्गणीदार विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	०	० %
२	नाही	५	७२ %
३	विचाराधीन आहे	२	२८ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४२ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयात ई–बक्स संग्रहाचे इलेक्टॉनिक वर्गणीदार कोणतेही ग्रंथालय नाही. परंतू २८ % ग्रंथालये विचाराधीन आहे.

प्रश्न क्रमांक ७.४ : ग्रंथालयातील वाचन साहित्या विषयी वाचकांना कशा प्रकारे उपलब्ध करून दिली जाते ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४३

वाचन साहित्या विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	तालिका	१	१४ %
२	ग्रंथ प्रदर्शन	१	१४ %
३	ग्रंथ परिक्षण	०	० %
४	ओपेक	४	५६ %
५	ग्रंथालय कर्मचारी	३	४२ %
६	न्यु. ॲप्रुव्हल लिस्ट	१	१४ %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४३ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयातील वाचन साहित्या विषयी माहिती वाचकांना तालिके माफत १४ % ग्रंथालयात दिली जाते. ग्रंथ प्रदर्शनाद्वारे वाचकांना १४ % ग्रंथालयात माहिती देण्यात येते. ओपेक द्वारे वाचकांना माहिती देणारे ५६ % ग्रंथालये आहे. तर ग्रंथालय कर्मचारी वाचकांना माहिती उपलब्ध करून ४२ % ग्रंथालयात दिली जाते व न्यु ॲप्रुव्हल लिस्ट द्वारे वाचकांना माहिती १४ % ग्रंथालयात दिली जाते.

प्रश्न क्रमांक ७.५ : ग्रंथालयात संदर्भ सेवा दिली जाते का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४४

ग्रंथालय संदर्भ सेवा विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	समाधान कारक	७	१०० %
२	असमाधान कारक	०	० %
३	नाही	०	० %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४४ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयात संदर्भ सेवा १०० % ग्रंथालयात देण्यात येते. संदर्भ सेवा ही ग्रंथालय सेवेतील महत्वाची सेवा आहे. सर्व ग्रंथालये आपल्या वाचकांना संदर्भ सेवा १०० % पुरवितात ही महत्वपुर्ण गोष्ट आहे.

प्रश्न क्रमांक ७.६ : ग्रंथालयात देण्यात येणाऱ्या झेरॉक्स प्रती सेवा आहेत का ? असा प्रश्न विचारला असता त्याचो माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४५

झेरॉक्स प्रती सेवा विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपणे	५	७२ %
२	गरजेनुसार	१	१४ %
३	नाही	१	१४ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४५ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयात देण्यात येणाऱ्या झेरॉक्स प्रती सेवा ७२ % ग्रंथालयात आहेत. गरजेनुसार झेरॉक्स प्रती सेवा १४ % ग्रंथालयात दिली जाते तर १४ % ग्रंथालयात झेरॉक्स प्रती सेवा देण्यात येत नाही.

प्रश्न क्रमांक ७.७ : इतर वाचकांना ग्रंथालयाची सेवा उपलब्ध आहे का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४६

इतर वाचक सेवा विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	५	७२ %
२	नाही	२	२८ %
३	शिफारशीनुसार	०	० %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४६ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, इतर वाचकांना ग्रंथालयाची सेवा उपलब्ध करून देणारी ७२ % ग्रंथालये आहेत. २८ % ग्रंथालयात इतर वाचकांना उपलब्ध देण्यात येत नाही. इतर वाचकांना ग्रंथालयात सेवा देण्यात येते ही महत्वाची बाब आहे.

प्रश्न क्रमांक ७.८ : अंतर ग्रंथालय देवघेव सेवा दिली जाते का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४७

अंतर ग्रंथालय देवघेव सेवा विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमितपणे	२	२८ %
२	गरजेनुसार	२	२८ %
३	नाही	३	४४ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

काष्टक क्र. ४७ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, अंतर ग्रंथालय देवघेव सेवा नियमितपणे २८ % ग्रंथालयात दिली जाते. गरजेनुसार सेवा २८ % ग्रंथालयात दिली जाते. तर अंतर ग्रंथालय देवघेव सेवा ४४ % ग्रंथालयात दिली जात नाही.

विभाग क्रमांक ८: ग्रंथालयाचे संगणीकरण विषयी माहिती

ग्रंथालय संगणकीकरण व्यावस्थापन हे ग्रंथालयाचा आकार, ग्रंथसंग्रह, वाचकसंख्या या गोष्टीवर अवलंबून असते. संगणकीकरणाच्या निमित्ताने अतिरिक्त गोष्ट लक्षात घेऊन निर्णय घेतल्यास ऐनवेळी व भविष्यात येणाऱ्या अडचणी टाकणे शक्य होते. ग्रंथालयात माहितीचे दळण वळण करणारी संगणकीय यंत्रणा आहे. इंटरनेट च्या माध्यमातून कोणतीही माहिती कधीही केव्हा ही कोणत्याही ठिकाणी पाठविता येते. संगणक व इंटरनेट या माध्यमाचा उपयोग करून ग्रंथालयातून वाचकांना १) ओपॅक २) देवघेव ३) ई–मेल ४) इंटरनेट ५) ई–नियतकालिके ६) आंतरराष्ट्रीय डेटाबेस या प्रकारच्या सेवा देणे त्वरीत शक्य होईल. त्याचप्रमाणे ग्रंथालयाचे व्यावस्थापन चांगल्या पध्दतीने करता येते. यासाठी अभ्यासकाने ग्रंथालयाचे संगणीकरणा विषयी काही प्रश्न या विभागात विचारण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न क्रमांक ८.१ : ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध आहे का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४८
ग्रंथालयात इंटरनेट विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपणे	६	८६ %
२	गरजेनुसार	०	० %
३	नाही	१	१४ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४८ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, इंटरनेट सेवा ८६ % ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात येते. तर १४ % ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्यात येत नाही. सर्वच ग्रंथालयानी आपल्या वाचकांना इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे.

प्रश्न क्रमांक ८.२ : ग्रंथालयात कॉम्प्युटरायझेशन द्वारा पुस्तकांची देवाण घेवाण होते का? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ४९

कॉम्प्युटररायझेशन द्वारा देवाणघेवाण विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपण	५	७२ %
२	गरजेनुसार	०	० %
३	नाही	२	२८ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ४९ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयात कॉम्प्युटररायझेशन द्वारा पुस्तकांची देवाणं–घेवाण ७२ % ग्रंथालयात नियमितपणे होत असते. तर २९ % ग्रंथालयात कॉम्प्युटररायझेशन झालेले नसल्याने देवाण घेवाण होत नाही.

प्रश्न क्रमांक ८.३ : ग्रंथालयात कोणते सॉफ्टवेअर आहे ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ५०

ग्रंथालयात सॉफ्टवेअर विषयी माहिती


अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	Auto Lib	३	४४ %
२	I-Tek	१	१४ %
३	Local Software	१	१४ %
४	कोणीच प्रतिसाद दिला नाही	२	२८ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५० मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयात Auto Lib हे सॉफ्टवेअर ४४ % ग्रंथालयात आहे. I. Tek सॉफ्टवेअर १४ % ग्रंथालयात वापरले जाते. तर Local Software स्थानिक महाविद्यालयाचे १४ % ग्रंथालयात आहे. २८ % ग्रंथालयांनी या प्रश्नाला प्रतिसादर दिलेला नाही.

आलेख क्र. ५

ग्रंथालय सॉफ्टवेअर



विभाग क्र. ९ : ग्रंथालयाचे ग्रंथ रद्दबातल धोरणा विषयी माहिती.

ग्रंथसग्रह अद्ययावत ठेवण्यासाठी, ज्ञानसाहित्य संग्रह विकास करण्यासाठी व वाचन साहित्याचा प्रभावीपणे उपयोग होण्यासाठी अनावश्यक वाचन साहित्य ग्रंथालयातून रद्दबातल करण्याची प्रक्रिया होय. कालबाह्य झालेले ग्रंथ, दिर्घकाळ वापरात नसलेली ग्रंथ, वापरून पाने जीर्ण झालेली ग्रंथ, पाठ्य पस्तकांच्या अनेक प्रती, क्रमिक पुस्तकांच्या अनेक प्रती, अनेक प्रकारचे कालबाह्य ग्रंथेत्तर वाचन साहित्य इत्यादी ग्रंथालयातून काढून टाकण्यात यावी म्हणजे नवीन ग्रंथाना जागा उपलब्ध करून देता येईल. परंतू ग्रंथ व ग्रंथेत्तर वाचन साहित्य रद्दबातल करतांनी त्याला सबळ व पटणारे कारण द्यावे लागते. या साठीच धोरणाची गरज असते. हे धोरण जेव्हा ग्रंथालय समिती, व्यावस्थापन मंडळ आणि प्रमुख (संस्थेचे अध्यक्ष, मुख्याध्यापक, प्राचार्य किंवा कुलगुरू इ.) यांनी मान्य केलेले असेल तर त्यानुसार ग्रंथ रद्दबातल केले असतील तर कोणी टिका किंवा अडचणी निर्माण करीत नाही

म्हणून ग्रंथालयाचे ग्रंथ रद्दबातल धोरण ठविणे गरजेचे आहे व ते धोरण वरिष्ठानी ठराव करून मान्य केलेले असेल पाहिजे.

ग्रंथालयानी ग्रंथ रद्दबातल धोरणा विषयी माहिती या विभागात अनेक प्रश्न विचारून जाणुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न क्रमांक ९.१ : ग्रंथालयात ग्रंथ रद्दबातल धोरण अवलंबिले जाते का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५१

ग्रंथ रद्दबातल धोरणाविषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	नियमितपणे	५	७२ %
२	गरजेनुसार	०	० %
३	नाही	२	२८ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५१ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथ रद्दबातल धोरण ७२ % ग्रंथालयात नियमितपणे अवलंबिले जाते व २८ % ग्रंथालयात ग्रंथ रद्दबातल धोरण अवलंबिले जात नाही.

प्रश्न क्रमांक ९.२ : ग्रंथालयातील ग्रंथ वाचकाकडून हरवल्यास काय केल जाते? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५२

हरवलेल्या ग्रंथ दंडाविषयी माहिती


अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	वाचकाकडून ग्रंथ मिळविण्यासाठी प्रयत्न केला जातो.	७	१०० %
२	ग्रंथाची आजची किंमत वसूल केली जाते.	२	२८ %
३	सभासदत्व रद्द केले जाते.	०	० %
४	यापैकी नाही	०	० %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५२ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, वाचकाकडून ग्रंथ हरवल्यास वाचकाकडून ग्रंथ मिळविण्यासाठी प्रयत्न १०० % ग्रंथालयात केला जातो. २८ % ग्रंथालयात ग्रंथाची आजची किंमत वसूल केली जाते. कोणत्याही ग्रंथालयात सभासदत्व रद्द करणे किंवा अन्य कोणताही दंड घेतला जात नाही. वाचकांच्या दृष्टीने खुप आवश्यक गोष्ट आहे.

आलेक क्र. ६

हरवलेल्या ग्रंथ दंडाविषयी माहिती



प्रश्न क्रमांक ९.३ : पाने फाटलेली, खराब झालेले ग्रंथ, ग्रंथालयातून नियमितपणे रद्दबातल केली जातात का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५३

जुने व खराब ग्रंथाविषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपणे	२	२८ %
२	गरजेनुसार	४	५८ %
३	नाही	१	१४ %
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५३ मधील माहितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, पाने फाटलेली, खराब झालेली ग्रंथ २८ % ग्रंथालयातून नियमितपणे रद्दबातल केली जातात, ५८ % ग्रंथालयातून मात्र गरजेनुसार रद्दबातल करण्यात येतात. तर १४ % ग्रंथालयात पाने फाटलेली, खराब झालेली ग्रंथ रद्दबातल करण्यात येत नाही.

प्रश्न क्रमांक ९.४ : ग्रंथाची वेळोवेळी ग्रंथ बांधणी केली जाते का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५४

ग्रंथाची ग्रंथ बांधणी विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	नियमितपणे	५	७२ %
२	गरजेनुसार	२	२८ %
३	नाही	०	० %
	एकुण	७	१०० %

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५४ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथाची वेळोवेळी ग्रंथ बांधणी नियमितपणे ७२ % ग्रंथालयात केली जाते. म्हणजे मोठ्या प्रमाणात ग्रंथालयात ग्रंथबांधणी नियमितपणे करण्यात येते. गरजेनुसार म्हणजे आवश्यक तेवढ्या ग्रंथाची ग्रंथ बांधणी २८ % ग्रंथालयात केली जाते.

प्रश्न क्रमांक ९.५ : ग्रंथालयातील ग्रंथाची मोजणी कधी केली जाते ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५५

ग्रंथमोजणी विषयो माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	सहा महिने	०	० %
२	१ वर्ष	२	२८ %
३	२ वर्ष	५	७२ %
४	३ वर्ष	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५५ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयातील ग्रंथाची मोजणी एक वर्षातून २८ % ग्रंथालयात करण्यात येते. तर २ वर्षातून ग्रंथाची मोजणी ७२ % ग्रंथालयात केली जाते. म्हणजे २ वर्षातून मोजणी करणारे मोठ्या प्रमाणात ग्रंथालय आहेत. ग्रंथालयात ग्रंथाची मोजणी करणारे सर्वच महाविद्यालये आहे.

विभाग क्रमांक १० : ग्रंथालय वेळा व वाचक संख्या विषयी माहिती

गथालय व्यावस्थापनात वाचन साहित्य संग्रहाचे व्यावस्थापन करत असताना ग्रंथालय वेळेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. संशोधनाची प्रक्रिया ज्या महाविद्यालयात सातत्याने सुरू आहे अशा संशोधन ग्रंथालयानी वेळेच्या बंधनात न अडकता वाचकांना सातत्याने सेवा पुरविणे गरजेचे आहे. ग्रंथालयांनी त्यांचा वाचन कक्ष रविवारी व सुट्टीच्या दिवशी व परिक्षेच्या कालावधीत किती वेळा उघडे ठेवले जाते तसेच वाचकांना जास्तीत जास्त सहकार्य केले जाते का ? हे जाणुन घेण्यासाठी या ग्रंथ विभागात काही प्रश्न विचारलेले आहे.

प्रश्न क्रमांक १०.१ : ग्रंथालय वाचन कक्षीची वेळ काय आहे ? असा प्रश्न विचारला असता त्याची पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५६

ग्रंथालयाच्या वेळेविषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	सकाळी ८.३० ते रात्री ८	१	१४ %
२	सकाळी ९ ते रात्री ८	१	१४ %
३	सकाळी ८.३० ते स. ५	३	४४ %
४	सकाळी १० ते स. ५	२	२८ %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५६ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालय वाचक यांच्यासाठी सकाळी ८.३० ते रात्री ८ पर्यंत १४ % ग्रंथालयात उघडे असते. सकाळी ९ ते रात्री ८ पर्यंत १४ % ग्रंथालय असते. सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५ पर्यंत ४४ % उघडे असते. सकाळी १० संध्याकाळी ५ पर्यंत २८ % ग्रंथालय उघडे असते.

प्रश्न क्रमांक १०.२ : ग्रंथालयातील वाचक संख्या ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ५७

ग्रंथालयातील वाचकांची संख्याविषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**संख्या**
१	शिक्षक	४६१
२	शिक्षकेत्तर कर्मचारी	२०७
३	विद्यार्थी	२४१०
	एकुण	**३०७८**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्रमांक ५७ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, सर्व ग्रंथालयाचे शिक्षक संख्या ४६१ आहे. शिक्षकेत्तर कर्मचारी संख्या २०७ आहे. तर विद्यार्थी संख्या २४१० आहे असे एकूण ३०७८ संख्या वाचकांची असल्याचे पाहणीतून समजले.

विभाग क्र. ११ : ग्रंथालयातील नियतकालिक विषयी माहिती:

नियतकालिक विभाग हा ग्रंथालयाचे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. नियतकालिकांमधुन संशोधनाच निष्कर्ष, सर्वप्रथम प्रकाशित होत असल्याने संशोधकांसाठी हे महत्त्वाचे साधन असते म्हणुन नियतकालिके ही संशोधन ग्रंथालयाचा आत्मा होय. जगात प्रकाशित होणाऱ्या विविध विषयांवरील नियकालिकांची संख्या अक्षरश: अमर्याद आहे. सर्वच नियतकालिके मागविणे कोणत्याही ग्रंथालयास शक्य नाही.

वाचकांचे संशोधनाचे विषय लक्षात घेऊन नियत कालिकेंची निवड करावी लागते. नियतकालिक विभागाच्या सहकार्याने काम करावे लागते. विशेष करून संदर्भ आणि प्रलेखन या विभागाशी सतत संपर्क ठेवणे गरजेचे आहे. ग्रंथ निवडी पेक्षा नियतकालिक निवड करणे फार कठीण काम आहे.

एखाद्या नियतकालिके स्विकारले की त्याची नियमितपणे वर्गणी पाठविणे, प्राप्त झालेल्या अंकाची नोंद करणे, अंक न मिळाल्यास स्मरण पत्र पाठविणे. नियतकालिक विभागाचे वाचन साहित्य संग्रह करणे, विकास करणे खुप आवश्यक आहे. म्हणुन या विभागात काही प्रश्न विचारले आहे.

प्रश्न क्रमांक ११.१ : नियतकालिकांची वर्गणी कोणामाफंत भरता? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाला.

कोष्टक क्र. ५८

नियतकालिक वर्गणी विषयी माहिती

अ.क्र.	**तपशिल**	**प्रतिसाद**	**टक्केवारी**
१	स्थानिक प्रतिनिधी	१	१४ %
२	प्रकाशक	६	८६%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ५८ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, नियतकालिकांची वर्गणी स्थानिक प्रतिनिधी यांच्यामाफ त १४% ग्रंथालयात भरण्यात येते. व प्रकाशका माफत ८६% ग्रंथालय वर्गणी भरतात . प्रकाशकाकडुन नियतकालिक भरण्यात ग्रंथालयांना सुरक्षितता वाटत असल्याने व एजंटामाफत वर्गणी भरल्यास जास्त पैसेखर्च होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

प्रश्न क्रमांक ११.२ : ग्रंथालयातील वर्गणी भरून आलेले नियतकालिक संख्या ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र.५९

ग्रंथालयात वर्गणी भरून मिळालेले नियत कालिका विषयी माहितो

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	१ ते २५ नियतकालिके संख्या	०	० %
२	२६ ते ५० नियतकालिके संख्या	५	७२%
३	५१ ते ७५ नियतकालिक संख्या	२	२८%
४	७६ ते १०० नियतकालिक संख्या	०	०%
	एकुण	**७**	**१००%**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्रमांक ५९ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, वर्गणी भरून आलेले नियतकालिक १ ते २५ संख्या असणारे ०% ग्रंथालय आहे. २६ ते ५० च्या दरम्यान वर्गणी भरून आलेल्या नियतकालिक संख्या ७२% ग्रंथालयात आहे. तर ५१ ते ७५ च्या दरम्यान असणारे २८% ग्रंथालयात आहे. परंतु ७६ ते १०० नियतकालिके संख्या ०% ग्रंथालयात येतात. ग्रंथालयानी नियतकालिकेची वर्गणी भरून संख्या वाढविण्यात यावी.

प्रश्न क्रमांक ११.३ : ग्रंथालयातील नियतकालिक ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ६०

ग्रंथालयातील नियतकालिका विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	भारतीय	५	७२ %
२	परदेशी	२	२८%
	एकुण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ६० मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की. ७२% ग्रंथालयात भारतीय नियतकालिके उपलब्ध आहे. तर २८% ग्रंथालयात परदेशी नियतकालिके उपलब्ध आहेत सवंच ग्रंथालयात भारतीय व परदेशी नियतकालिके दोन्ही प्रकारची नियतकालिके वाचकांना उपलब्ध करून द्यावी.

विभाग १२ : ग्रंथालय इमारती विषयी माहिती :–

ग्रंथालयाची इमारत वाचकांना सुविधा देण्याच्या दृष्टीने एक महत्वाची भौतिक गरज आहे. ग्रंथालयाची इमारत प्रशस्त व मोठी इमारत असणे पुरेसे नसते. ही इमारत भरपूर उजेड असणारी परंतू वाचन साहित्यावर सुर्यप्रकाश न पडणारी हवेशीर, सोयीस्कर असने आवश्यक असते. या इमारतीस ग्रंथ ठेवण्यासाठी ग्रंथदालन, नियतकालिकांसाठी स्वतंत्र दालन, चांगला वाचन कक्ष, दुर्मिळ ग्रंथासाठी स्वतंत्र कक्ष,

दृकश्राव्य साधनांचा कक्ष, संगणक आणि इतर सुविधा ग्रंथपालासाठी स्वतंत्र कक्ष तसेच पिण्याचे पाणी, स्वच्छता गृहे, छायाप्रती विभाग असे अनेक विभाग असणे आवश्यक आहे. सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीचा विचार करून दुरूस्तीसाठी खर्च कमी व्हावा. त्याच प्रमाणे किमान ५० वर्षाचा दुरदुष्टी डोळ्यासमोर ठेवून योग्य दिशा देऊन इमारत बांधण्यात यावी. म्हणून या विभागात इमारती विषयी अनेक प्रश्नांची माहिती जानुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न क्रमांक १२.१ : ग्रंथालयाकरीता स्वतंत्र इमारत आहे का ? असा प्रश्न विचारला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ६१

ग्रंथालय स्वतंत्र इमारती विषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	होय	२	२८ %
२	नाही	५	७२ %
३	प्रस्ताव विचाराधीन आहे	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्र. ६१ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, ग्रंथालयासाठो स्वतंत्र इमारत २८ % ग्रंथालयास आहे. ७२ % ग्रंथालयास स्वतंत्र इमारत नाही. म्हणजे ग्रंथालयास स्वतंत्र इमारत खुप कमी महाविद्यालयास आहे.

प्रश्न क्रमांक १२.२ : ग्रंथालयात ग्रंथ ठेवण्यासाठी पुरेशी जागा आहे. का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता त्याची माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झाली.

कोष्टक क्र. ६२
ग्रंथ ठेवण्यासाठी पुरेशा जागेविषयी माहिती

अ.क्र.	तपशिल	प्रतिसाद	टक्केवारी
१	समाधानकारक	७	१०० %
२	असामाधानकारक	०	० %
३	प्रस्ताव विचाराधीन आहे	०	० %
	एकूण	**७**	**१०० %**

संदर्भ : सर्वेक्षण पाहणी

कोष्टक क्रमांक ६२ मधील माहितीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, १००% ग्रंथालयात ग्रंथ ठेवण्यासाठी पुरेशी समाधानकारक व पुरेशी जागा आहे. ग्रंथ ठेवण्यासाठी जागा समाधानकारक आहे. ही खुप महत्त्वाची गोष्ट आहे.

विभाग क्र. १३ : ग्रंथालय अंदाजपत्रक किंवा बजेट विषयी माहिती :

वित्त हा कोणत्याही संस्थेचा जणु आत्माच आहे. प्रत्येक गोष्टींसाठी पैसा लागतो म्हणजेच सर्व साधनांचे मुल्य पैशांत करावे लागते. सेवकांचे मुल्य देखील पैशातच करावे लागते. पुरेपुर आर्थिक बळ असेल तर साधने सहजपणे मिळवता येतात.

